# सीताबर्डीची लढाई

(१८१७ च्या मराठे - इंग्रज तिसऱ्या लढाईची लष्करी कागदपत्रे)



डॉ. स. मो. अयाचित

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# सीताबर्डीची लढाई

लेखक डॉ. स. मो. अयाचित

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

**पुस्तकाचे नाव : सीताबर्डीची लढाई**

**लेखक : डॉ. स. मो. अयाचित**

**प्रथमावृत्ती : २०२१**

**प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदीर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

**© प्रकाशकाधीन**

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
नागपूर - ४४० ००१.

**किंमत ४५ रुपये**

(या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.)

# निवेदन

डॉ. स. मो. अयाचित यांनी संपादित करून लिहिलेल्या ‘सीताबर्डीची लढाई ’ या पुस्तकाचे प्रकाशन करताना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला आनंद होत आहे. मराठी राज्याच्या शेवटच्या पर्वात इंग्रज-मराठे युध्दाच्या तिस-या लढाईची सुरुवात प्रथम पुण्यात नोव्हेंबर, १८१७ मध्ये रेसिडन्सिच्या संगम बंगल्यावरील हल्ल्याने झाली आणि त्याचे पडसाद सीताबर्डी या नागपूरच्या रेसिडन्सी मधील हल्ल्यात त्याच महिन्यात उमटले. त्या लढाईची हकीकत मूळ इंग्रजी साधने त्या वेळेच्या मध्यप्रदेश सरकारने प्रथम मुद्रित केली. त्यामध्ये सीताबर्डीच्या लढाईची विस्तृत हकीकत आली आहे. डॉ. अयाचित यांनी सीताबर्डीच्या लढाईबाबत वरील माहिती व अन्य तपशील एकत्रित करून हे पुस्तक सिद्ध केले आहे. १९०७ च्या सुमारास शासनाने प्रकाशित केलेल्या १८१७-१८ च्या नागपुरला झालेल्या लढाईसंबंधी तत्कालीन ब्रिटिश सेनाधिका-यांच्या पत्र व्यवहाराचा हा अनुवाद असला तरी मूळ पुस्तक आता अतिशय दुर्मिळ झालेले आहे. या पुस्तकात या असंख्य व्यक्तींचा उल्लेख आहे. त्याबद्दलची माहिती परिशिष्टामध्ये लेखकाने दिली आहे.

‘सीताबर्डीची लढाई ’ ही मराठ्यांच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना होय. या पुस्तकामुळे तिची बरीचशी माहिती अभ्यासकांना उपलब्ध होऊ शकेल. या पुस्तकातील माहितीची अचूकता लेखक/संपादकाने शक्य तेवढी तपासून घेतलेली असली तरी त्यामध्ये काही त्रुटी असणे शक्य आहे. तरीही उपलब्ध असलेला इतिहास केवळ अभ्यासकांनाच नव्हे तर सर्वसामान्य वाचकांनाही महत्त्वाचा वाटेल अशी या मंडळाला आशा वाटते.



**बाबा भांड,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

# सीताबर्डीची लढाई

२६-२७ नोव्हेंबर १८१७ रोजी सीताबर्डीवर झालेल्या लढाईसंबंधी
आणि नागपूरजवळ झालेल्या नंतरच्या घडामोडीसंबंधी
कागदांचे पुनर्मुद्रण

नागपूर

मध्यप्रांत शासनाच्या आज्ञेनुसार शासकीय मुद्रणालयात
कार्यालयीन वापरासाठी पुनर्मुद्रित (अनुवाद)

१९०७

डॉ. स. मो. अयाचित



अप्पासाहेब भोसले



## मराठ्यांचा सेनापती मनभट उपाध्ये

(अंदाजे १७६८) १८२९

२५ नोव्हेंबर १८१७ रोजी लढाईला तोंड लागले होते. त्या दिवशीच्या हातघाईच्या लढाईत मनभटाने चिवटपणे पराक्रम गाजविला. २६ च्या सकाळी त्याच्या मार्गदर्शनाखाली अरब सैन्याने लहान टेकडी जिंकली. कॅसॅड्लर गोळी लागून पडला. रात्री अरबांच्या दारूकोठ्यात भडका झाला. त्या धुमश्चक्रीत मनभट पहाटे ३ पर्यंत लढला, गोळीबार थांबला. १८ डिसेंबरलाही शुक्रवार दरवाज्यावर मनभट लढाई लढला. मनभटाच्या सैन्याचे पगार अरबानी इंग्रजांकडून वसूल केले. २४ डिसेंबरला राजवाड्यावर इंग्रजांचे निशाण लागले व १ जानेवारी (१८१८) ला मनभटास कैद झाली. राजा कोठीत त्यांचा मोठा वाडा आहे, त्यात त्यांचे वंशज राहतात.

‘मनभट उपाध्ये सीताबर्डीच्या लढाईत मराठ्यांचे प्रमुख सेनापती होते. ही माहिती श्रीपाद चितळे यांनी मला उपाध्ये यांच्या महालातील घरात नेऊन मिळवून दिली. यांचे सर्व श्रेय श्रीपाद चितळे यांचे आहे’.

— माननीय रमेश उपाध्ये यांच्या सौजन्याने.



रैसिडेंट रिचर्ड जेकिन्स



सीताबर्डी किले के युद्ध का एक दृश्य (चित्र सौजन्य से)

भोंसलों ने स्वाधीनता की रक्षा के लिये अंगरेजों के पैर न जमने देने के लिये घोर प्रयास किया परन्तु वे असफल रहे

14.10.2008 01:03


COLOURING
British Cavalry
Enemy's Horse
Enemys Infantry
References for the Defence of
SEETABULDEE
on the 26th & 27th November 1817
By a British Detachment Commanded by
LIEUTT COLL H.S.SCOT
Against the Army of THE BHOOSLA
Enemy's Batteries
Enemy's Magazine
Seetabuldee Hill
Residency


ઉત્તર

# अनुवादकर्त्याचे निवेदन

नागपुरात मी व डॉ. भा. रा. अंधारे यांनी स्थापिलेल्या इतिहास/संस्कृत संशोधन केंद्रात, संस्कृतसंबंधी कार्य करीत असतांना साहचर्यामुळे व मुळातच आवड असल्यामुळे माझे इतिहासविषयक अभ्यासही वाढविण्याकडे लक्ष वेधू लागले. ‘ बॅटल् ऑफ सीताबर्डी ’ हे मध्यप्रदेश शासनाचे अत्यंत दुर्मिळ पुस्तक उपलब्ध झाले तेव्हा दोघांची चर्चा होऊन या पुस्तकाचा मराठी अनुवाद करावा असे आम्ही ठरविले व या कामाकडे मी वळलो. अनुवादाचा बराचसा अभ्यास असल्यामुळे मला फारशी अडचण आली नाही. अनुवाद तयार झाला. तो साहित्य/संस्कृति मंडळाकडे पाठवावा असेही सुचविण्यात आले. नंतर मात्र पत्रव्यवहारातील दिरंगाईमुळे व काही तांत्रिक अडचणीमुळे, मंडळाने मान्यता दिल्यानंतरही बराच काळ जावा लागला. प्रा. मधु मंगेश कर्णिक हे अध्यक्ष पदी आल्यानंतर मात्र गति येऊ लागली. त्यामुळे या प्रकाशनाचे सर्व श्रेय प्रा. कर्णिक साहेबांनाच द्यावे लागेल. फोनवरील भाषणात एकदा ‘ तुमचे पुस्तक महत्त्वाचे आहे,’ असे त्यांनी मला उत्स्फुर्तपणे सांगितले व या ऑक्टोबरातही फोनवरून पुस्तकाचा ‘ गेट् अप् ’ आणि नकाशे /चित्रे आदी आवश्यक साहित्याची भर यासाठी त्यांनी मला पूर्ण मुभा दिली. यावरून त्यानी या पुस्तकाविषयी दाखविलेल्या आत्मीयतेची कल्पना येईल. लेखी अनुमतीशिवायही त्यांनी पुस्तकाच्या अंतिम मुद्रणास व त्याच्या एखाद्या प्रकाशन कार्यक्रमासही परस्पर मंजुरी दिली होती. तथापि, रीतसर प्रक्रिया पूर्ण होणे हेही आवश्यक असतेच. त्यामुळे थोडा विलंब लागला तो केवळ तांबड्या फितीच्या कारभारामुळे लागला तेवढाच.

प्रा. कर्णिकसाहेबांचे मनापासून आभार मानत असतानाच, बसल्या-बसल्या एक चांगले कार्य पूर्ण झाले व ते आता इतिहासाभ्यासकांपुढे येत आहे, हा आनंदही मी व्यक्त करतो. नागपूरच्या शासकीय मुद्रणालयाचे व्यवस्थापक, श्री. एस. पी. मेश्राम, स. व्य. श्री. एस. एच. केदार या दोघा अधिका-यांनी व नियोजन विभागाचे प्रतिनिधी श्री. एम. टी. ठाकुर व त्यांचे सहकारी तसेच वाचन विभागाचे श्री. पी. जी. तुमसरे यांनी आपल्या सहका-यांकरवी काम उत्तम रीतीने पार पाडले. अनेक ठिकाणांच्या मुद्रण

(दोन)

कार्याचा मला बराच अनुभव असल्यामुळे त्यांचे कार्य व त्यांनी दिलेली स्नेहाची व चिकित्सापूर्वक तत्परतेची वागणूक मला आभारापलीकडची वाटत असली तरी त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देतो.

मनभट उपाध्ये यांचे चित्र उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. रमेश उपाध्ये (मनभटांचे पणतू) यांचे हार्दिक आभार; दोन नकाशांपैकी एक समकालीन आहे व दुसरा कै. या. मा. काळे यांच्या पुस्तकातून घेतला आहे. तसेच लढाईसंबंधीचे चित्र तत्कालीन मध्यप्रांत व-हाडचे मुख्यमंत्री रविशंकर शुक्ल यांच्या अभिनंदन ग्रंथातून या पुस्तकात अवश्य समाविष्ट करावे असे नागपुरातील ज्येष्ठ समाज कार्यकर्ते श्री. उमेशजी चौबे यांनी सुचविले व त्याचप्रमाणे उपलब्धही करून दिले. अप्पासाहेब भोसले व जेन्किंस यांची चित्रे डॉ. अंधारे यांनी मुद्रणासाठी दिली. याबद्दल मी दोघांचाही आभारी आहे.

नागपूर : **स. मो. अयाचित**

दिनांक १४-११-२००८

## टिपणी

१८१७ साली सीताबर्डी व नागपूर येथे झालेल्या शस्त्रसंघर्षासंबंधीचे विविध कागद या पुस्तिकेत पुनर्मुद्रित करण्यात आलेले आहेत. या नावांशी निगडित झालेली लढाई, मध्यप्रांतात कार्य करणा-या ब्रिटिश सैन्याचा ज्यात सहभाग होता, अतिशय गंभीर स्वरूपाची होती. तेव्हा या संघर्षाची सविस्तर माहिती देणा-या पुराव्यांचे संरक्षण हा थोडासा प्रांतिक महत्वाचा भाग होतो.

या उता-यांपैकी बहुसंख्य भारत शासनाच्या दप्तरखान्याचे माजी अधिकारी डॉ. डेनिसन् रॉस् यांच्या सौजन्याने उपलब्ध झाले. कार्य करणा-या विविध सैन्य विभागांची ओळख पटविणारी मनोरंजक माहिती देण्याबद्दल कर्नल बर्डवुड, सरसेनापतींचे लष्करी सचिव, आणि श्री. जी. डब्ल्यू. द-हे फिलिप, लष्करी विभागातील माजी सेवक, यांचे प्रशासन ऋणी आहे. श्री. फिलिप यांच्या विस्तृत ज्ञानामुळे त्यांना अधिक ठिकाणी सुधारणा सुचविता आल्या. त्यांच्या तत्पर साहाय्याची या प्रसंगाने नोंद करण्यात येत आहे.

## परिशिष्ट

# पत्रव्यवहारात निर्देशिलेल्या महत्त्वाच्या व्यक्ति

सर थॉमस हिस्लॉप

मेजर पिटमन (निजामाच्या सैन्याचा अधिकारी)

कर्नल गेहन

सोधबी (बंगाली घोडदळ)

सॅड्लर (— ” —) चोविसावे

डॉ. नेव्हन् (— ” —)

क्लॉर्क (— ” —) विसावे

लेफ्टनंट ग्रँट (— ” —) चोविसावे

(हे सर्व २६-११-१८१७ च्या धुमश्चक्रीत मारले गेले.)

ले. मॅक्स्वेल (किना-यावरील तोफखाना)

कॅप्टन लॉइड् (संरक्षक)

कॅ. स्टोन (विसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॅलियनचा नेता)

मे. मॅकेंझी (विसावी रेजिमेंट)

कॅ. प्यू

ले. डन्

कॅ. चार्ल्स्वर्थ् (चोविसाव्या रेजिमेंटचा ऑफिसर कमांडिंग)

थुलिअर (चोविसावी रेजिमेंट)

ले. बेली (अकरावे स्थानिक पायदळ)

कार्नेट्स् हिअरसे (सहावे बंगाली घोडदळ)

स्मिथ (— ” —)

कॅ. फिट्झेराल्ड (घोडदळ प्रमुख)

जेंकिन्स (नागपुरचा रेसिडेण्ट)

कॅ. मॅक्डोनाल्ड (कॅ. चार्ल्सवर्थच्या जागी)

(सहा)

कॅ. ब्रुक (विसाव्या रेजिमेंटच्या एका तुकडीचा नेता)

कॅ. बेले

लेफ्टनंट कर्नल एच. एस. स्कॉट

ले. क. कॉन्वे

ले. क. मॅक्लिऑड (मेजर, पृ. ५७)

ले. क. मॅक्केलर

ले. क. ई. आय. मॅक्ग्रेगार मुरे (शाही सेनेचा सहायक सेनापती)

मॅक्लिअर

ले. क. क्रॉस्डिल (राखीव तोफखाना)

ले. क. स्टीवर्ट (तेराव्या रेजिमेंटची दुसरी बटॅलियन)

कॅ. पेड्लर (सुधारित घोडदळ)

मे. वेल्डन

(जे.) डोव्हटन

ले. पोगनपोल (घोडदळी तोफखान्याचा प्रमुख)

ले. क. गोहन.

मे. मंक, कॅ. वेस्टन (घोडदळी तुकड्यांचे अधिकारी)

ले. क. फ्रेझर,

मे. परेरा,<br>
मे. पोलक,<br>
मे. मॅक्डोवाल,<br>
मे. मॅक्बियन,<br>
मे. गार्नर<br>
} (पायदळ व तोफखाना यातील तुकड्यांचे प्रमुख)

ले. हंटर (त्याच तुकडीचे)

कॅ. मॉर्गन

कॅ. एड्मंड्स्

ले. डेव्हिस (रणक्षेत्रावरील जेष्ठ अभियंते)

कॅ. लुकास
(कॅ. ग्रँट)

कॅ. निक्सन्

ले. डेव्डिड्सन्

ले. फेनव्हिक्

ले. शेरीफ

मॅच्लॉक्स्

जिंजाल्स्

मे. इलियट

ले. कॅमेरॉन

ले. काउल

# निवेदन

डॉ. स. मो. अयाचित यांनी संपादित करून लिहिलेल्या ‘सीताबर्डीची लढाई ’ या पुस्तकाचे प्रकाशन करताना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला आनंद होत आहे. मराठी राज्याच्या शेवटच्या पर्वात इंग्रज-मराठे युध्दाच्या तिस-या लढाईची सुरुवात प्रथम पुण्यात नोव्हेंबर, १८१७ मध्ये रेसिडन्सिच्या संगम बंगल्यावरील हल्ल्याने झाली आणि त्याचे पडसाद सीताबर्डी या नागपूरच्या रेसिडन्सी मधील हल्ल्यात त्याच महिन्यात उमटले. त्या लढाईची हकीकत मूळ इंग्रजी साधने त्या वेळेच्या मध्यप्रदेश सरकारने प्रथम मुद्रित केली. त्यामध्ये सीताबर्डीच्या लढाईची विस्तृत हकीकत आली आहे. डॉ. अयाचित यांनी सीताबर्डीच्या लढाईबाबत वरील माहिती व अन्य तपशील एकत्रित करून हे पुस्तक सिद्ध केले आहे. १९०७ च्या सुमारास शासनाने प्रकाशित केलेल्या १८१७-१८ च्या नागपुरला झालेल्या लढाईसंबंधी तत्कालीन ब्रिटिश सेनाधिका-यांच्या पत्र व्यवहाराचा हा अनुवाद असला तरी मूळ पुस्तक आता अतिशय दुर्मिळ झालेले आहे. या पुस्तकात या असंख्य व्यक्तींचा उल्लेख आहे. त्याबद्दलची माहिती परिशिष्टामध्ये लेखकाने दिली आहे.

‘सीताबर्डीची लढाई ’ ही मराठ्यांच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना होय. या पुस्तकामुळे तिची बरीचशी माहिती अभ्यासकांना उपलब्ध होऊ शकेल. या पुस्तकातील माहितीची अचूकता लेखक/संपादकाने शक्य तेवढी तपासून घेतलेली असली तरी त्यामध्ये काही त्रुटी असणे शक्य आहे. तरीही उपलब्ध असलेला इतिहास केवळ अभ्यासकांनाच नव्हे तर सर्वसामान्य वाचकांनाही महत्त्वाचा वाटेल अशी या मंडळाला आशा वाटते.

**मधु मंगेश कर्णिक,**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

# अनुवादकाचे मनोगत

नागपूर येथे इतिहास/संस्कृत संशोधन केंद्र या स्वनिर्मित अभ्यासमंडळात नागपूरातील माझे सहकारी सुविज्ञात इतिहासाभ्यासक प्रा. डॉ. भा. रा. अंधारे याजबरोबर, संस्कृत संबंधी लेखन करीत असतांना मलाही मधून-मधून माझ्या इतिहासाच्या उपजत आवडीमुळे असे वाटू लागले की आपणही इतिहाससंबंधी काही लेखन करावे. काही स्फुट लेखन मी केलेही, नंतर मला केंद्रातच **Battle of Seetabuldi** हे दुर्मिळ पुस्तक पाहावयास मिळाले, थोडीशी चर्चा केल्यानंतर त्याचा मराठी अनुवाद करावा हे सर्वमान्य झाले व मी कामास आरंभ केला.

* साहित्य/संस्कृति मंडळाबरोबर पत्रव्यवहार झाला. परंतु अनेक तांत्रिक कारणांनी संमतीला विलंब झाला. मंडळावर माजी अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक आल्यावर त्यांनी फोनवरच अतिशय त्वरित आणि चांगला प्रतिसाद दिला. प्रकाशन समारंभाला माझ्या अनुमतीसाठी थांबण्याची आवश्यकता नाही, आणि पुस्तक महत्वाचे आहे, असेही त्यांनी उत्स्फूर्तपणे सांगितले. गतवर्षीच (२००८) राम शेवाळकर यांच्या हस्ते प्रकाशन विदर्भ साहित्य संघातर्फे करावयाचेही ठरले होते. परंतु तो योग नव्हता. अनेक कारणांनी पुनः एकदा विलंब झाला आणि शेवटी गंगेत घोडे न्हाले. शेवट गोड ते सर्वच गोड असे म्हणतात ना.

नागपुरात असतांना मुद्रित तपासणीच्या कामी मला मदत करता आली. शासकीय मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. एस. पी. मेश्राम, स. व्य. श्री. एस. एच. केदार व त्यांचे श्री. ठाकूर आदि सर्व सहकारी यांचे सौजन्य, कार्यातील दक्षता आणि शुध्दलेखनाविषयी जागृतता प्रत्ययास येऊन अतीव आनंद झाला. त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. साहित्य/संस्कृति मंडळाने विलंब झाला असतानांही आपला पाठिंबा कायम ठेवला याविषयीही मी कृतज्ञता व्यक्त करतो.

नागपूर, १३-१२-२००९ **स. मो. अयाचित**

---

* १८१७ च्या अखेरीस नागपूर येथे भोसले व इंग्रज यात झालेल्या लढाईपूर्वी इंग्रजानी आपली व्यूहरचना कशी सिध्द केली व तिचा शेवट कसा झाला याविषयी तत्कालीन रेसिडेंट आणि इतर इंग्रज सेनापति यांचा या पत्र व्यवहारात सहभाग आहे. त्यामुळे त्या लढाईचा अभ्यास करणा-या इतिहासचिंतकांना याचा मोठाच उपयोग होणारा आहे.

## प्रस्तावना

१८१७ मधील सीताबर्डीच्या लढाईशी आणि नागपुरास झालेल्या संग्रामाशी संबद्ध किंवा कारणीभूत झालेल्या घटनांचा खाली दिलेला सारांश मुख्यतः ग्रँट डफचा ' मराठ्यांचा इतिहास '* यातून घेतला आहे.

१८१३ मध्ये मार्क्विस ऑफ हेस्टिंग्ज (तत्कालीन अर्ल ऑफ मॉइरा) यांनी लॉर्ड मिंटोकडून भारताच्या शासनाची जबाबदारी घेतली आणि त्यानंतर लौकरच, पेंढा-यांच्या आणि इतर लुटारूंच्या टोळ्यांनी मध्य भारतात धुमाकूळ घातला होता, त्याचा बंदोबस्त करण्याकडे लक्ष वळविण्यास आरंभ केला. परंतु नेपाळी युद्धामुळे त्यांचे बेत पार पाडण्यास थोडासा विलंब झाला.

त्या वेळी रघुजी भोसले हे नागपूरचे शास्ते होते, आणि त्यांच्याबरोबर संरक्षणाचा एक तह घडवून आणणे हा त्यांच्या विचाराधीन योजनेचा एक भाग होता. परंतु त्यांच्याकडे मांडलेल्या अटींना रघुजीने नकार दिला.

१८१६ च्या मार्चमध्ये नेपाळी युद्ध संपुष्टात आले. त्याच महिन्यात रघुजीचा अंत झाला, आणि त्याच्या जागी त्याचा मुलगा परसोजी आला. तो दुर्बल मनाचा होता. त्याचा चुलत भाऊ मुधोजी, हा अप्पासाहेब या नावाने जास्त चांगला परिचित आहे तो, रीजंट म्हणून निवडला गेला. त्याने रघुजीला सुचविण्यात आलेल्या संरक्षणाच्या करारात प्रविष्ट होण्यासाठी होकार दिला आणि १८१६ च्या मेमध्ये तहावर स्वाक्षरी झाली. त्यानुसार अप्पासाहेबांने तैनाती फौजेच्या खर्चापोटी दर वर्षी साडेसात लाख रुपये द्यावयाचे होते आणि घोडदळ व पायदळ अशी फौज ठेवावयाची होती.

या तहाचा पाठपुरावा म्हणून तैनाती फौज उभारली गेली व ती नागपूरात किंवा नागपूरच्या आसपास ठेवली गेली. इकडे अप्पासाहेब आपले वर्चस्व

---

*यापेक्षा सविस्तर माहिती पुढील ठिकाणी मिळेल—

ब्लॅकरकृत मराठा युध्दाचा इतिहास (यातूनच या पुस्तिकेत पुनर्मुद्रित केलेली योजना घेतली आहे).

प्रिन्सेपकृत मार्क्विस ऑफ हेस्टिंग्जच्या शासनकाळातील भारतातील राजकीय आणि लष्करी अहवाल.

विल्सनकृत मद्रास सैन्याचा इतिहास

पेंढारी आणि मराठा युध्दे यासंबंधीचे कागद (१८२४ मध्ये मुद्रित).

जमवीत होता व ऑक्टोबरपर्यंत त्याने ते पूर्णपणे प्रस्थापित केले. परंतु त्यानंतर पेशव्यांचे दूत त्याचेकडे आले आणि त्याला पुणे दरबाराचे विचार समजले. फेब्रुवारी १८१७ मध्ये परसोजीचा आकस्मिक अंत झाला, आणि नंतर हे उघडकीला आले की अप्पासाहेबाने त्याला हलविले होते, अप्पासाहेबाने केव्हाही ब्रिटिशांचा आधार धुडकावून दिला तर राज्यात विरोधी पक्षाचा उदय होण्यास प्रतिबंध व्हावा, असा त्याचा उद्देश असल्याचे समजले जाते.

१८१५-१६ मध्ये पेंढारी वाढत्या प्रमाणावर उद्योगी झाले, आणि आपले बेत कार्यवाहीत आणण्याचा व या लुटारूंचा पूर्ण पाडाव आणि समूळ विच्छेद करण्यासाठी १८१७ च्या पावसाळ्यानंतर उपाय करण्याचा गव्हर्नर जनरलने निश्चय केला. त्यासाठी त्याने केलेली राजकीय व्यवस्था मुख्यतः उत्तर हिंदुस्थानातील होती, तिचा या ठिकाणी निर्देश करण्याची आवश्यकता नाही. परंतु लष्करी व्यवस्थेची संक्षिप्त दखल घेतली पाहिजे. या कार्यासाठी अकरा डिव्हिजन्स आणि सैन्याच्या दोन स्वतंत्र ब्रिगेड्स् देण्यात आल्या होत्या. त्यापैकी सहा दक्षिणेत मद्रासेतील मुख्य सेनापति सर थॉमस् हिस्लॉप यांच्या आदेशाने संघटित करण्यात आल्या होत्या. एक डिव्हिजन गुजरातेत आणि दोन स्वतंत्र ब्रिगेड्स्सह (उरलेल्या) चार गव्हर्नर-जनरलच्या वैयक्तिक मार्गदर्शनाखाली तयार झाल्या होत्या. त्या उत्तर भारतातून सहकार्य करणार होत्या.

दक्षिणेतील आणि गुजरातेतील सैन्यात सत्तावन हजारावर माणसे होती, त्यापैकी ५२५५ घोडदळ होते. उत्तर भारतातील सैन्य ५००० घोडदळ जमेस धरून चौतीस हजारांचे होते. हे नेहमीचे सैन्य होते, आणि त्याखेरीज दक्षिणेकडील डिव्हिजन्स्मध्ये सुमारे तेरा हजार घोडदळ आणि उत्तरेत दहा हजार इतके होते.

दक्षिणेतील सैन्यापैकी सर थॉमस हिस्लॉप आणि सर जॉन माल्कम यांच्या आज्ञेखालील पहिली व तिसरी या डिव्हिजन्स् हंडियाजवळ नर्मदा पार करून माळव्यात पुढे शिरावयाच्या होत्या; डोव्हटन आणि स्मिथ या जनरल्सच्या हाताखाली दुसरी व चौथी या डिव्हिजन्स् व-हाडात आणि खानदेशात ठाणी काबीज करून बसणार होत्या, तर कर्नल अडॅम्स्च्या नागपूर येथील तैनाती फौजेची बनलेली पाचवी डिव्हिजन हुशंगाबादजवळून पुढे निघणार होती. गुजरातची

डिव्हिजन दोहदजवळ माळव्यात शिरावयाची होती. उत्तर भारतातील सैन्यापैकी दोन डिव्हिजन्स् राखीव धरल्या होत्या. दुस-या रीवारी, आगरा, काल्पी आणि कालिंजर या ठिकाणी किंवा जवळ पास एकत्र येणार होत्या.

यावेळी (राघोबाचा पुत्र) बाजीराव हा पेशवा होता. तो १७९८ मध्ये सत्तेवर आला. (१८०२ मध्ये) वसईचा तह त्याच्याबरोबर पार पाडलेला होता. त्या वर्षाच्या आरंभीच्या काळात त्याच्या कारस्थानानी पुण्याला बरीच चिंता निर्माण केलेली होती, आणि केवळ प्रखर धोरण स्वीकारून आणि बळाचा वापर करण्याची धमकी देऊनच एल्फिन्स्टनला मेमध्ये तहाला पेशव्यांची संमति मिळविण्यात यश आले. त्या अन्वये त्याने कोणत्याही विदेशी सत्तेबरोबर दळणवळण ठेवावयाचे नाही असे कबूल केले. तुंगभद्रा आणि नर्मदा यामधील स्वतःच्या प्रदेशाच्या सीमेपलीकडील सर्व हक्क सोडले, आणि गायकवाडांवरील भविष्यातील सर्व मागण्यांचा त्याग केला. वसईच्या तहामुळे आवश्यक झालेल्या पाच हजार घोडदळ व तीन हजार पायदळ या दस्त्याची व्यवस्था करण्याच्या बदली चौतीस लक्ष रुपये उत्पन्न देणारा प्रदेशही सोडून देण्याचे त्याने मान्य केले. पाणी सोडलेल्या प्रदेशात धारवाड, उत्तर कोकण, अहमदाबाद, आणि मेळघाटसुध्दा नर्मदेच्या उत्तरेकडील पेशव्यांचे सर्व हक्क अंतर्भूत होतात.

तथापि या व्यवस्थेला मान्यता देत असतानाच त्याने आपली कारस्थाने, विशेषतः तैनाती करवसुलीमध्ये/फौजभरतीच्या मार्गात अडथळे आणणे, चालूच ठेवले. आता आपण मनापासून ब्रिटिशांच्या बाजूला राहू असे त्याने सर जॉन माल्कमला पटवून दिले. त्याच वेळी जुलै ते सप्टेंबर अशा पुण्यातून बाहेर राहण्याच्या काळात आपली व्यवस्था पूर्ण होताच ब्रिटिश सत्तेविरुद्ध उघड युध्द करण्याची तयारी तो करीत होता. सर जॉन माल्कम् याने त्याला पेंढा-यांच्या युध्दात (ब्रिटिशांना) मदत करून आपली निष्ठा दाखवून देण्यासाठी सैन्यभरतीला उत्तेजन दिले, आणि या उत्तेजनाचा फायदा त्याने सैन्य वाढविण्यासाठी घेतला.

५ नोव्हेंबर रोजी त्याच्या योजना पूर्ण झाल्या, आणि त्याच दिवशी दुपारी त्याच्या सैन्याच्या तुकड्या पुण्याबाहेर पडल्या, रेसिडेन्सी लुटण्यात व जाळण्यात आली, आणि खडकीहून पुण्याला आलेल्या ब्रिटिश सैन्यावर हल्ला करण्यात आला. ब्रिटिश फौजेची संख्या २८०० सांगितली जाते, त्यापैकी ८०० युरोपियन होते. पेशव्यांच्या फौजेची संख्या १८,००० घोडदळ आणि ८००० पायदळ इतकी झाली असल्याचा समज आहे. ५०० मृत आणि जखमी इतक्या नुकसानीत तिचा पराभव झाला. जेत्यांनी ८६ गमाविले, त्यानंतर पेशव्याने पुणे सोडले, आणि पूर्ण हिवाळाभर शेजारच्या जिल्ह्यात आणखी संघर्ष झाले, त्या लढ्यात कोरेगावच्या संस्मरणीय संरक्षणाचा समावेश होतो. मराठा सैन्याचा पाठलाग करून देश जिंकण्यासाठी दक्षिणी सैन्याच्या दोन डिव्हिजन्स् मागे ठेवण्यात आल्या, आणि सरतेशेवटी जून १८१८ मध्ये बाजीरावाने सर जॉन माल्कमकडे आत्मसमर्पण केले. कानपूर जवळील बिठूर हे त्याच्यासाठी निवासस्थान म्हणून निश्चित करण्यात आले आणि तो १८५१ मध्ये निधनापर्यंत तेथे राहिला. त्याचा दत्तक पुत्र धोंडोपंत वारस म्हणून मान्य करण्यास ब्रिटिश सरकारने नकार दिला, तोच बंडातील नानासाहेब.

आता नागपूरकडे पुनः वळू. फेब्रुवारी १८१७ मध्ये परसोजीच्या मृत्यूनंतर अप्पासाहेब, मुधोजी भोसले या नावाने त्याचा वारस म्हणून जाहीर करण्यात आला. राजाच्या मृत्यूतील त्याचा सहभाग उघडकीस आला नाही. त्याचा पुण्याशी सतत पत्रव्यवहार होता, आणि पेशव्याने ब्रिटिश सैन्यावर हल्ला केल्याची वार्ता पोचताच, अप्पासाहेबाने त्याला मिळण्याचा निश्चय केला आणि सैन्य वाढविण्यास आरंभ केला. यावर जेन्किन्सने कर्नल अडॅम्स्च्या आज्ञेखाली डिव्हिजनची एक ब्रिगेड नर्मदेच्या दक्षिणेकडे राहावी, आणि एक तुकडी नागपूरवर चालून जाण्यासाठी तयार राखावी अशी व्यवस्था केली. मध्यंतरी अप्पासाहेबाने मित्रत्वाचा देखावा केला, परंतू नोव्हेंबरच्या २४ तारखेस त्याने पेशव्यांकडून मिळालेली खिलात आणि पदवी /बिरुद औपचारिकपणे स्वीकारण्यासाठी ठरविलेल्या समारंभास उपस्थित राहावे असे रेसिडेंन्टला कळविले. रेसिडेंटने निषेध करताच अप्पासाहेबांच्या सैन्याने रेसिडेन्सीला धमकी म्हणून आपली जागा घेतली. त्यावर श्री. जेन्किन्सने तेलंगखेडीजवळच्या छावणीतील सैन्य आणले, आणि

(जनरल डोव्हटनच्या) दक्षिणी सैन्याची दुसरी डिव्हिजन बोलाविण्यासाठी दूत पाठविले. ग्रँट डफ युद्धाची आणि नंतरच्या हालचालींची पुढील (प्रमाणे) माहिती देतो—

नागपूरचे सर्व सैन्य म्हणजे मद्रासच्या स्थानिक पायदळाच्या विसाव्या रेजिमेंटची पहिली बटॅलियन आणि चोविसाव्या रेजिमेंटची पहिली बटॅलियन अशा दोन बटॅलियन्सची एक ब्रिगेड, दोन्हीही आजारीपणामुळे कमकुवत झालेल्या, स्थानिक पायदळाच्या दोन कंपन्यांचे रेसिडेंटचे संरक्षक दल, *बंगालच्या स्थानिक घोडदळाच्या सहाव्या रेजिमेंटच्या तीन ट्रुप्स् आणि मद्रासच्या तोफखान्याच्या युरोपियनानी संरक्षिलेल्या चार सहा-पौंडी तोफा. लेफ्टनंट कर्नल होप्टन स्कॉट् हा जेष्ठ अधिकारी होता.

रेसिडेन्सी नागपूर शहराच्या पश्चिमेस असून ती उत्तर-दक्षिण धावणा-या सीताबर्डी नावाच्या एका खडकाळ टेकडीने शहरापासून विभक्त झाली आहे. या टेकडीच्या दोन्ही टोकांकडे आणि परस्परांपासून सुमारे तीस यार्ड अंतरावर दोन उंचवटे आहेत. उत्तरेकडील उंचवटा रेसिडेन्सीच्या जवळ असून बराच मोठा आणि दक्षिणेकडील उंचवट्यापेक्षा थोडा जास्त उंच आहे. परंतु दक्षिणेकडील पाया उपनगरांशी दळणवळण असलेल्या एका खेड्याच्या झोपड्याना लागून असल्यामुळे, आणि त्यातून अनियमित रहदारीला सुविधा मिळत असल्यामुळे, अतिशय महत्त्वाचा भाग होता. तेथे चोविसाव्या रेजिमेंटच्या कॅप्टन सॅड्लरच्या नेतृत्वाखाली एक सहा पौंडी तोफ व तीनशे शिपाई होते. घोडदळाच्या तीन ट्रुप्स्नी कॅप्टन फिट्झेराल्डच्या नेतृत्वाखाली रेसिडेन्सीच्या भोवती असलेल्या आवारात ठाण मांडले होते. मोठ्या टेकडीच्या मागे आणि अंशतः उजवीकडे रेसिडेन्सी असल्यामुळे, त्यावर उरलेले सैन्य टेकडीवर ठेवलेले होते. संध्याकाळी लष्करी काम करणारे ब्रिटिश तेथे असता एका टोळीवर खालच्या टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या खेड्याकडून

---

*बंगालच्या स्थानिक पायदळाच्या विविध बटालियन्समधून स्वेच्छेने आलेल्या बंगाली शिपायांनी रेसिडेंटचे संरक्षक दल बनले होते.

गोळीबार झाला. परंतु एखादी चूक झाली असेल अशी शक्यता लक्षात घेऊन त्यांनी प्रत्युत्तर न देण्याचा संयम दाखविला. आक्रमकता चालू राहिल्यावर मात्र त्यांनी आपला गोळीबार केला, आणि तोडेदार बंदुकातून जोरदार वर्षाव होऊ लागल्यावर ब्रिटिश ठाण्यावर हल्ला झाल्याचा तो सामान्य इशारा समजून छोट्या टेकडीचा आश्रय घेतला. रात्रीचे दोन वाजेपर्यंत दोन्ही बाजूनी कणखरपणे गोळीबार चालू होता. नंतर मराठ्यांच्या बाजूने तो कमी झाला तरी मोठ्या त्वेषाने तो पुनः पहाटे तोफगोळे आणि बंदुकांच्या फै-यांसह चालू झाला. आतापर्यंत ब्रिटिशांना सहन करावे लागलेले सर्वात जास्त नुकसान छोट्या टेकडीकडे झाले होते. अरबांकडून ते चालू ठेवण्याचे पुनःपुनः प्रयत्न होत होते, आणि कत्तलीच्या परिणामी वारंवार त्या ठाण्यावर जादा कुमक पाठविण्यात येत होती, शेवटी एका गाड्याचा चुकून स्फोट झाल्यावर थोडा गोंधळ निर्माण झाला, त्याचा अरबानी तत्काळ फायदा घेतला, हातात तलवारी घेऊन ते टेकडीवर धावून गेले, ती घेतली, आणि लगेच मोठ्या टेकडीविरूद्ध तोफ वळविली. त्या ठिकाणी घातपात दुःखदायक व दुःसह झाला. यशाने उत्साहित होऊन शत्रूच्या घोडदळाने व पायदळाने सर्व बाजूनी वेढा घातला आणि मोठा हल्ला करण्याची तयारी केली. या भयंकर निकराच्या स्थितीत भर म्हणून अरब ब्रिटिश सैन्याच्या तंबूत शिरले, आणि स्त्रियांच्या व मुलांच्या किंकाळ्या शिपायांच्या कानापर्यंत पोचल्या. ज्या ठिकाणी कॅप्टन फिट्झेराल्डची नेमणूक झाली होती त्या रेसिडेन्सीच्या भूमीवरही हल्ला झाला. तोफा आणल्या गेल्या, आणि घोडेस्वारांच्या टोळ्यांनी आत घुसण्याचे भय निर्माण केले. कॅप्टन फिट्झेराल्डने हल्ला करण्यासाठी वारंवार अनुमति मागितली आणि तितक्याच वेळा मुख्याधिका-याच्या आदेशानी त्याला प्रतिबंध केला. पण भावी विनाश पाहून त्याने अनुमति मिळविण्याचा एक अखेरचा प्रयत्न केला. कर्नल स्कॉटचे उत्तर होते— ‘ स्वतःच्या जबाबदारीवर त्याला हल्ला कर म्हणावे ’, हे उत्तर मिळताच उमदा फिट्झेरॉल्ड म्हणाला, ‘असू द्या माझ्या जबाबदारीवर ’, आणि तत्क्षणी त्याने

‘ आगे बढो ’ चा आदेश दिला.* आवार रिकामे केल्याबरोबर त्याने मुख्य घोडदळावर हल्ला केला, त्यांना ज्या दोन तोफांचा आधार होता त्या तोफांपासून त्यांना हाकलले, काही अंतरापर्यंत त्यांचा पाठलाग केला, त्यांच्या बरोबर असलेल्या पायदळाच्या तुकडीचा धुव्वा उडविला, आणि आपल्याबरोबर जिंकलेल्या तोफा घेऊन तो परत आला. टेकडीवर असलेल्या पायदळाने हा पराक्रम मोठ्याने हुर्रे करून पाहिला. त्यांच्यात खूप मोठे चैतन्य निर्माण झाले. घोडदळ परतल्याबरोबर लगेच छोट्या टेकडीवर चालून जावयाचे असा विचार पुढे आला. परंतु दक्षिणेकडील टेकडीवरील अरबांमध्ये दारूगोळ्याचा आणखी एक स्फोट, ज्या अपघाताने टेकडी हातची गेली होती, तोच होऊन माणसे आणि अधिकारी सरमिसळ होऊन पुढे घुसले. आवरता न येण्यासारख्या प्रेरणेमुळे त्यांनी आपल्यापुढे सर्व सामान हलविले, टेकडीखालपर्यंत अरबांचा पाठलाग केला, त्यांच्या दोन तोफा हस्तगत केल्या, त्या बधिर केल्या आणि आपल्या जागेवर परतले. अरब पुन्हा एकत्र झाले, आणि त्यांनी पुनः ती भूमि काबीज

---

*हा एक ‘ लोकप्रवाद ’ आहे, आणि संभवतः त्याला छावणीतील गप्पांशिवाय अधिक चांगला आधार नाही. त्या दिवशीच्या आदेशात (पेंढारी आणि मराठा युद्धासंबंधीचे कागद, पृष्ठ १३५) कर्नल स्कॉट ‘ हल्ला करण्यासाठी मोक्याचा क्षण पकडण्याचा त्याचा निर्णय आणि तत्परता ’ याबद्दल कॅप्टन फिट्झेराल्डची विशेष तारीफ करतो, आणि म्हणतो की, ‘ बंगाली घोडदळाच्या सहाव्या रेजिमेंटच्या तीन ट्रुप्सच्या या तुकडीने शत्रूच्या घोडदळाच्या इतक्या मोठ्या सैन्यावर हल्ला करण्यात यशाने स्वतःला धवलित केले आहे.’ अलीकडे प्रकाशित झालेल्या हिअरसे कुटुंबाच्या चरित्रातील सर जॉन हिअरसे याच्या आत्मचरित्रातील खालील उता-यांकडे श्री. डी. -हे. फिलिपे यांनी लक्ष वेधले आहे. जनरल हिअरसे याने सहाव्या बंगाली घोडदळात एक कनिष्ठ अधिकारी (कॉर्नेट) म्हणून या हल्ल्यात भाग घेतला आणि जखमी झाला. त्याच्या निवेदनावरून हल्ला करण्यासाठी आदेश कर्नल स्कॉटने स्वतः दिला. पृ. २५५— “ आमची माणसे आणि घोडे कापून काढले जातील आणि आपल्याला काहीही करायची संधी मिळणार नाही, हे लक्षात येताच कॅप्टन फिट्झेराल्डने मला आपण कोणत्या स्थितीत आहोत ते ब्रिगेडिअर स्कॉटच्या निदर्शनास आणून त्याना आम्हाला देण्यासारखे आदेश असतील ते घेऊन येण्यास पाठविले. हल्ला करण्यासाठी (मिळेल ती) पहिली संधी घ्या असा कॅप्टन फिट्झेराल्डला आदेश देण्यास ब्रिगेडिअर स्कॉटने मला सांगितले. पृष्ठ २५७- शत्रूवर हल्ला करण्यासाठी जी पहिली अनुकुल संधि निर्माण होईल ती घेण्यास कॅप्टन फिट्झेराल्डला आदेश देण्यास ब्रिगेडियर स्कॉटने मला बोलाविले.”

करतो असा निश्चय दाखविला. परंतु ते पुढे येण्याची तयारी करीत होते तोच कॉर्नेट स्मिथच्या [१] नेतृत्वाखालच्या एक घोडदळी ट्रुपने टेकडीच्या पायथ्याभोवतालून हल्ला केला, त्यांना बाजूला सारले, आणि त्यांची पांगापांग केली. नंतर ब्रिटिश सैन्य टेकडीकडून पुढे आले आणि त्याने शेजारच्या झोपड्यातून पायदळ हाकून लावले. दुपारपर्यंत कोरेगावच्या संरक्षणासाठी केलेल्या युद्धातील संघर्षाशीच ज्याची तुलना होईल असा हा दुःसह संघर्ष पूर्णपणे संपुष्टात आला. पॅटिन्सन सारख्यांच्या पराक्रमाला तुल्यबळ अशा शौर्याची उदाहरणे देता येण्यासारखी आहेत. विशेषतः चोविसाव्या रेजिमेंटचा ॲड्जूटंट लेफ्टनंट जॉन ग्रँट [२], हा दोन तीक्ष्ण घाव होऊन विकल झाला असताही छोट्या टेकडीवरील हल्ल्यात सर्वात पुढे होता, ठाणे घेत असताना त्याला तिसरी आणि घातक जखम झाली.

सीताबर्डीच्या रक्षणाच्या कर्तव्यासाठी लायक अशी १४०० [३] माणसे ब्रिटिशांजवळ नव्हती, अप्पासाहेबांच्या सैन्यात १८००० माणसे असून त्यापैकी निम्मी पायदळात होती, त्यापैकी ३००० किंवा ४००० अरब होते, ते पुष्कळ निकराने लढले. ब्रिटिशांचे ३३३ [४] मृत आणि जखमी इतके नुकसान झाले, त्यापैकी बारा युरोपियन अधिकारी होते (यातच मारला गेलेल्या सिव्हिल सर्व्हिसमधील रेसिडेंटच्या पहिल्या सहायकाचा—सोथ्बीचा —समावेश आहे.) मराठ्यांच्या नुकसानीची संख्या जवळजवळ तितकीच होते. नागपूरचे हे विषम प्रमाण पुण्यापेक्षा जास्त मोठे नाही. परंतु एका युरोपियन रेजिमेंटची उपस्थिती आणि स्वतःहून हल्ला करण्याचा फायदा यामुळे संघर्षाला खूपच वेगळे स्वरूप प्राप्त झाले.

---

[१] एके काळी 'स्किनर्स हॉर्स'चा अधिकारी, आणि नंतरचा लेफ्टनंट कर्नल लुसियस् हॉर्टन् स्मिथ.

[२] त्याचे नाव जॉर्ज ग्रँट असे होते.

[३] चूक. उपस्थितांची संख्या (आजारी, निशस्त्र नवागत, आणि रिक्रुट छोकरे वजा करिता) १७९५ होती हे पृष्ठ ३७ वरील कोष्टकात दाखविले आहे.

[४] चूक. हताहतांची संख्या ३६४ पर्यंत झाली, यात सोळा ब्रिटिश अधिका-यांचा समावेश आहे, पृष्ठ ३८ वरील कोष्टकात दाखविले आहे.

आपल्या विश्वासघाती प्रयत्नात फसल्यावर अप्पासाहेबाने दुःख प्रदर्शित करण्यासाठी, आणि आपण हल्ला करण्यास सांगितले नाही असा नकार दर्शविण्यासाठी वकील पाठविले. परंतु श्री. जेन्किन्स् याने युद्ध थांबविण्यास मान्यता दिली तरी सद्यःपरिस्थितीत सैन्य काढून घेईपर्यंत त्याचेशी काहीही बोलण्यास नकार दिला. सर्व दिशांनी नागपूरला कुमक येऊ लागली. कर्नल ॲडम्सच्या डिव्हिजनपैकी एका ब्रिगेडसह लेफ्टनंट कर्नल गेहन २९ नोव्हेंबरला दाखल झाला, मेजर पिटमन एका तुकडीबरोबर ५ डिसेंबरला येऊन पोचला, आणि जनरल डोव्हटन पूर्ण दुसरी डिव्हिजन घेऊन डिसेंबरच्या मध्यांपर्यंत नागपूरला आला.

१५ डिसेंबरला सकाळी जेन्किन्सने अप्पासाहेबाकडे संपूर्ण शरणागतीची मागणी केली. सैन्याला निरोप देणे, आपला प्रदेश ब्रिटिश सरकारच्या अधीन करणे, आणि या अटीं अंमलात येण्यासाठी स्वतःला ओलीस म्हणून ताब्यात देणे, असे त्याच्याकडून मागितले. परंतु त्याच वेळी त्याला असे सांगण्यात आले की, हे पूर्ण झाल्यावर, तैनाती फौजेचा खर्च भागविण्याइतका प्रदेश सोडून देणे आणि यापुढे अशा विश्वासघातास आळा घालता येईल इतके अंतर्गत कारभारावर नियंत्रण यापेक्षा जास्त कठोर अटी लादण्यात येणार नाहीत. दुसऱ्या दिवशी पहाटेच्या चार वाजेपर्यंत इतका वेळ या अटी मान्य करण्यास दिला गेला, सहा वाजता अप्पासाहेबाना आपल्या इच्छेप्रमाणे रेसिडेन्सीकडे येण्यास सैन्य परवानगी देत नाही असे कळविण्यात आले. तीन दिवसांचा अवधी मागितला, पण फक्त तीन तास मान्य करण्यात आले. वेळ संपताच सैन्य पुढे चालू लागले. तेव्हा अप्पासाहेब आले, आणि त्यांचे सैन्य निवृत्त करण्यात आले आहे व तोफा दिल्या गेल्या आहेत या आशेने सैन्याला थांबविले गेले. जितक्या तोफा भांडागारात होत्या तेवढ्या हवाली केल्या गेल्या, परंतु इतरांचा ताबा घेण्यासाठी पुढे जाताच ब्रिटिश सैन्यावर तोफांचा मारा सुरू झाला. त्याबरोबर सैन्य सज्ज झाले, आणि तोफांवर हल्ला होऊन त्या घेतल्या गेल्या; परंतु त्यात १४१ माणसे मारली गेली किंवा जखमी झाली,[१] अप्पासाहेबांचे दोन अधिकारी गणपतराव आणि मनभट ही अशी माणसे होती की ज्यांनी हा प्रतिकार चालू

[१] अपघातींचा अचूक आकडा १४४ हा आहे.

ठेवला, आणि तोही प्रचलित समजुतीप्रमाणे धन्याच्या आदेशाशिवाय. गणपतराव नंतर पेशव्यांच्या प्रदेशाकडे गेले आणि अगोदर सांगितल्याप्रमाणे सोलापूरजवळ बाजीरावास मिळाले. परंतु मनभट अरबांबरोबर नागपूरच्या किल्ल्याकडे परतला. त्या ठिकाणी चोवीस डिसेंबरला एका दरवाज्यावर धडक देण्याचा प्रयत्न झाला व तो परतवला गेला, मृत व जखमी अशा २६९ जणांच्या नुकसानीसह [१] अरबानी नंतर शरणागतीची तयारी दर्शविली. त्यांना आपली मालमत्ता कुटुंबकबिला, आणि शस्त्र घेऊन बाहेर जाण्याची परवानगी मिळाली होती. अटी मंजूर झाल्या कारण वेळ महत्वाचा होता, आणि तोफखान्यासाठी कार्यक्षम तुकडी हाताशी नव्हती. ”

जानेवारीच्या सहा तारखेला गव्हर्नर-जनरलची संमति कळेपर्यंत अप्पासाहेबांना पूर्ववत पदासीन करणारी एक तडजोड लादली गेली. तैनाती फौजेऐवजी व काही प्रदेश सोडून देण्यासाठी, तसेच आपला कारभार रेसिडेंटच्या सल्ल्याप्रमाणे चालविण्यासाठी व मागणी होईल त्याप्रमाणे काही किल्ले देण्यासाठी आणि सीताबर्डीवर लष्करी कामे उभारण्यास परवानगी देण्यासाठीही अप्पासाहेबांची संमती आवश्यक होती. गव्हर्नर-जनरलने अप्पासाहेबाना पुनः सत्तेवर स्थापण्यास नकार दिला, परंतु करार पक्का झाला पाहिजे असे ठरविले. तथापि अप्पासाहेबाने आपली कारस्थाने पुनः चालू केली. उपद्रव देण्यास गोंडाना चिथावण्याचा प्रयत्न केला, आणि साहाय्यासाठी बाजीरावाकडे अर्ज केला. मार्चमध्ये त्याला अटक झाली, आणि अलाहाबादला पाठविण्यात आले. परंतु वाटेतच तो पळाला आणि महादेव टेकड्यांवर गोंडांकडे त्याला आश्रय मिळाला. तेथे चितू पेंढारी त्याला मिळाला. परिणामी त्याला उत्तर भारताचा मार्ग मोकळा झाला, आणि १८६० मध्ये राजपुतान्यात तो मृत्यु पावला.

या पुस्तिकेत अंतर्भूत केलेले उतारे मुख्यतः सीताबर्डीवरील लढाईची माहिती देणा-या, गॅझेट्स्मध्ये किंवा लष्करी हकीकतीत प्रकाशित झालेल्या कागदांचे पुनर्मुद्रण आहे.

रेसिडेंटच्या मदतीसाठी ज्या तुकड्या निघाल्या त्यात रॉयल् स्कॉट्स्ची दुसरी बटॅलियन होती, ही रेजिमेंट अलीकडे कामठीला ठेवण्यात आली आहे. या

---

[१] हा आकडा बरोबर नाही. अपघातींची संख्या ३०७ होती.

रेजिमेंटच्या दप्तरातील एलिचपूरहून निघालेल्या मोर्चाची काही माहिती देणारा एक उतारा कर्नल मरे (दुस-या बटॅलियनचे मुख्याधिकारी) यानी दयाळूपणे पुरविला तो या पत्रसंग्रहात समाविष्ट केला आहे. त्याबरोबर १६ डिसेंबरच्या संग्रामासाठी जनरल डोव्हटनने केलेल्या व्यवस्थेची एक प्रत आहे. (डोव्हटनचा) हा दस्तऐवज नागपूरच्या रेसिडेन्सीच्या जुन्या दप्तरात सापडला, तो थोडाफार उपयोगीही आहे.

१८१७ च्या नोव्हेंबरात आणि डिसेंबरात नागपूरला आणि आसपास लढाईत उपयोजिलेल्या कित्येक तुकड्या निश्चित करणे पुष्कळाना आवश्यक वाटेल यात संशय नाही. निरनिराळ्या प्रसंगी काम केलेल्या तुकड्या पुढील याद्यात दाखविल्या आहेत. त्या प्रत्येकीच्या बाबतीत, आजही चालू असलेल्यांचे सध्याचे नाव, व सैन्याच्या यादीतून काळाच्या ओघात ज्या अंतर्धान पावल्या त्यांची अखेरची स्थिती दाखविणा-या पदटीपा जोडल्या आहेत—

**सीताबर्डी, २६ व २७ नोव्हेंबर १८१७**

१. मद्रास स्थानिक तोफखाना (तुकडी) [१८६४ मध्ये एका कंपनीखेरीज बंद झाली; ती कंपनीही १८७० पर्यंत ठेवून नंतर विभाजित झाली.]

२. मद्रास अंगरक्षक (तुकडी) [याच नावाने सध्याही आहे.]

३. सहावे बंगाली स्थानिक घोडदळ (तीन ट्रुप्स्) [ ७ जून १८५७ रोजी जालंधर येथे बंड करून दिल्लीला गेले.]

४. विसाव्या मद्रासी स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन [ १८२४ मध्ये ३९ वे मद्रासी स्थानिक पायदळ बनले व १८८२ मध्ये निवृत्त झाले.]

५. चोविसाव्या मद्रासी स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन [सीताबर्डीवर आपल्या शौर्याच्या आचरणाची शाबासकी म्हणून १८१८ मध्ये पहिल्या मद्रासी स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन बनून मूळच्या दर्जावर पुनः गेली. १८०६ मध्ये वेल्लोर मुक्कामी पहिल्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॅलियन बंडात भाग घेतल्याबद्दल तिचा तो दर्जा काढून घेतला होता. १८२४ मध्ये पहिले मद्रासी स्थानिक पायदळ बनले. आता त्यालाच ६१ वे प्रिन्स् ऑफ वेल्सचे खाजगी पायोनियर म्हणतात.]

६. रेसिडेंटचे संरक्षक दल [१९ डिसेंबर १८०५ च्या लष्करी शासनाच्या आदेशानुसार (G.O.C.C.) आज्ञेवरून तयार झाले. बंगाली सैन्याच्या स्थानिक पायदळाच्या रेजिमेंटस्मधून स्वयंसेवकांच्या दोन कंपन्या त्यात होत्या. सीताबर्डीवरील निकराच्या संग्रामात पूर्ण गुंतून लढणा-या कोणत्याही तुकडीपेक्षा संख्याबळाच्या मानाने अधिक नुकसान सोसले तरी त्या दिवसाच्या आदेशात सैन्याच्या सेवेचा उल्लेख करूनही कर्नल स्कॉटने संरक्षक दलाचा आणि त्याने प्रथमपासून अखेरपर्यंत दाखविलेल्या नैष्ठिक शौर्याचा मुळीच उल्लेख केला नाही. ६ जून १८२० च्या लष्करी शासनाच्या आदेशाने हे दल मोडले गेले. सीताबर्डीवरील त्याचा मुख्याधिकारी कॅप्टन लॉइड् हाच नंतरचा प्रसिद्ध हिमालय संशोधक सर विल्यम लॉइड्]

७. नागपूर बटॅलियन [ अप्पासाहेबानी राखावयाच्या तैनाती फौजेचा भाग म्हणून उभारलेली ही एक पलटण होती. बंगाली तोफखान्याचा कॅप्टन चार्ल्स् ई. ओ. जेन्किन्स हा सीताबर्डीच्या लढाईत या पलटणीचा अधिकारी होता. या नियुक्तीचे वेळी त्याला मेजरचा स्थानिक दर्जा असावा असे दिसते. मुंबई नागरी सेवेपैकी (नंतर सर रिचर्ड) जेन्किन्स या रेसिडेंटचा हा धाकटा भाऊ होता. ही कोअर अस्तित्वात नाही.]

## नागपूर १६ डिसेंबर १८१७

८. मद्रास तोफखाना, युरोपियन आणि स्थानिक (तुकड्या) [ १८६२ मध्ये मद्रास युरोपियन तोफखाना रॉयल तोफखान्यात विलीन करण्यात आला. स्थानिक तोफखाना १८६४ मध्ये बंद झाला आणि (शेवटची उरलेली कंपनी) १८७० मध्ये बंद झाली ]

९. मद्रास सॅपर्स आणि मायनर्स (तुकडी) [ ही कोअर मद्रास युरोपियन रेजिमेंटमधील ३२ स्वयंसेवक व मद्रास स्थानिक पायोनियर्समधून ५० यानी मिळून युद्धकाळातील सेवेसाठी १८१७ मध्ये बनविली होती. १८१८ मध्ये स्थापनेत वाढ करून तिची पुनर्रचना करण्यात आली. परंतू ही वाढ प्रत्यक्षात केव्हाच अंमलात आली नाही. १८२१ मध्ये कोअर बंद करण्यात आली.]

१०. सहावे बंगाली स्थानिक घोडदळ [ वर क्र. ३ पहा ]

११. सहावे मद्रासी स्थानिक घोडदळ [ १८६० मध्ये बंद झाले.]

१२. निजामाचे सुधारित घोडदळ (रिफॉर्म्ड हॉर्स्) (एक रिसाला) [ १८२६ मध्ये निजामाच्या घोडदळाच्या तीन रेजिमेंट्स् बनविल्या, त्याचा हा भाग. १८५४ मध्ये हैद्राबादच्या तैनाती फौजेच्या घोडदळात या तीन कोअर्सची पहिली, दुसरी, व तिसरी अशा तीन रेजिमेंट्स् झाल्या आणि त्यांचा अस्तित्वात राहिलेला एकमेव प्रतिनिधी हेच सध्याचे २९ वे लान्सर्स (दक्षिणी घोडदळ) या नावाचे कोअर.]

१३. पहिल्या पायदळाची दुसरी बटॅलियन (आठ कंपन्या) [ म्हणजेच आताची रॉयल स्कॉट्स् (लोथियन रेजिमेंट) ची दुसरी बटॅलियन. सर थॉमस हिस्लॉप याच्या हाताखालच्या सैन्यात फ्लँक कंपन्या उपस्थित नव्हत्या, त्या २१ डिसेंबर १८१७ ला महीदपूरच्या लढ्यात गुंतलेल्या होत्या. ]

१४. बाविसाव्या बंगाली स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन. [तेच १८२४ मध्ये त्रेचाळीसावी बंगाली स्थानिक पायदळ बनले. सहावे जाट छोटे पायदळ या नावाने आजही ते आहे.]

१५. दुस-या मद्रास स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन (फ्लँक कंपन्या) [ हीच १८२४ मध्ये दुसरे मद्रास स्थानिक पायदळ बनली, यालाच अलीकडे ‘बासष्टावे पंजाबी ’ (पायदळ) म्हणतात.]

१६. अकराव्या मद्रास स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन [ १८२४ मध्ये एकविसावे मद्रास स्थानिक पायदळ बनले, सध्याचे नाव ‘एक्यांशियावे पायोनियर्स ’]

१७. बाराव्या मद्रास स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन [१८२४ मध्ये तेविसावे मद्रास स्थानिक पायदळ झाले, सध्याचे नाव त्र्याऐंशियावे वलाजाहबाद छोटे पायदळ.]

१८. तेराव्या मद्रास स्थानिक पायदळाची दुसरी बटॅलियन (फ्लॅक कंपन्या) [ १८२४ मध्ये हेच सव्वीसावे मद्रास स्थानिक पायदळ. शहाँशियावे कर्नाटक पायदळ या नावाने सध्या अस्तित्वात आहे.]

१९. चौदाव्या मद्रास स्थानिक पायदळाची दुसरी बटॅलियन (एक कंपनी) [ १८२४ मध्ये अठ्ठाविसावे मद्रास स्थानिक पायदळ बनले. अठ्ठयांशियावे कर्नाटक पायदळ हे सध्याचे नाव आहे. रेजिमेंटचा उरलेला भाग सर थॉमस् हिस्लॉप यांच्या सैन्याबरोबर होता.]

२०. चोविसाव्या मद्रास स्थानिक पायदळाची दुसरी बटॅलियन [ उपरिनिर्दिष्ट परिस्थितीत १८१८ मध्ये हीच पहिल्या मद्रास स्थानिक पायदळाची दुसरी बटॅलियन झाली, १८२४ मध्ये हेच सतरावे मद्रास स्थानिक पायदळ बनले, आणि सध्या सत्याहत्तरावी मोपला रायफल्स् या नावाने विद्यमान आहे.]

## नागपूर, १९ ते २४ डिसेंबर १८१७

२१. मद्रास तोफखाना (तुकडी).

२२. मद्रास सॅपर्स आणि मायनर्स (तुकडी).

२३. पहिले मद्रास पायोनियर्स (तुकडी) [ आरंभी १७८० मध्ये उभारली गेली, पुढील वर्षातून तिच्यात वाढ करण्यात आली, आणि १८३१ मध्ये मद्रास सॅपर्स आणि मायनर्सच्या कोअरमध्ये तिचे रूपांतर करण्यात आले.]

२४. पहिले पायदळ (रॉयल स्कॉट्स्) ची दुसरी बटॅलियन (आठ कंपन्या).

२५. बाविसाव्या बंगाल स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन.

२६. दुस-या मद्रास स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन. (फ्लँक कंपन्या)

२७. अकराव्या मद्रास स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन.

२८. बाराव्या मद्रास स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन.

२९. तेराव्या मद्रास स्थानिक पायदळाची दुसरी बटॅलियन. (फ्लँक कंपन्या)

३०. विसाव्या मद्रास स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन. (फ्लँक कंपन्या)

३१. चोविसाव्या मद्रास स्थानिक पायदळाची पहिली बटॅलियन. (फ्लँक कंपन्या)

३२. चोविसाव्या मद्रास स्थानिक पायदळाची दुसरी बटॅलियन.

३३. निजामी सैन्यापैकी मेजर पिटमनची ब्रिगेड. [ व-हाड पायदळाच्या दोन रेजिमेंट्स् मिळून ही बनली होती. त्यातील एक म्हणजे तिसरी रेजिमेंट नंतरच्या काळात हैदराबादी तैनाती फौजेच्या पायदळाची चौथी रेजिमेंट बनली, आणि तीच सध्याही ‘ सत्याण्णवावे दक्षिणी पायदळ ’ या नावाने विद्यमान आहे.]

## शासकीय वार्तापत्रे (गॅझेट्स्) आणि इतर साधने यातील सीताबर्डी व नागपूर येथील लढाई संबंधीचे उतारे

### शासनाच्या वार्तापत्राचे परिशिष्ट, गुरुवार, १८ डिसेंबर १८१७.

गिर्वा नदीहून २९ तारखेला तयार झालेल्या एका पत्रात नागपूर येथे उद्‌भवलेल्या खळबळजनक घटनांचा उल्लेख आहे. आपल्या सैन्याबरोबर मोकळेपणाने संपर्क टिकविताना काही अडथळा आलाच तर निकराचा प्रतिकार करता यावा किंवा शत्रुसैन्यावर हल्ला करता यावा या हेतूने रेसिडेंट जेन्किन्स् आपल्या अधिकारातील सर्व सैन्य एकत्रित करीत असल्याची माहिती या पत्रात आहे. गिर्वा येथे फक्त चार कंपन्या होत्या, आणि काही मैलातच सुमारे चार हजार शिपाई होते. अलीकडच्या बातम्या मात्र सांगतात की सर थॉमस् हिस्लॉप् यांच्या आज्ञेनुसार हंगामी घोडदळ आणि पायदळाच्या तुकड्या या निजामाच्या सैन्याचा अधिकारी मेजर पिटमन अमरावतीपर्यंत पोचला आणि त्याने जोरदारपणे नागपूरकडे कूच केले आहे. कर्नल गेहन हाही रेसिडेंटच्या मदतीसाठी घोडदळ आणि पायदळाच्या समर्थ तुकड्या बरोबर घेऊन एकवीस तारखेला हुसेनाबादहून निघाला. राजेसाहेबांच्या सल्लागारांकडून विरोधी कृती घडलीच तर त्याचे अनिष्ट परिणाम टाळण्याच्या दृष्टीने ही कुमक वेळेवर आली असे म्हणण्यास जागा आहे. आम्हाला मात्र अद्यापि असे वाटते की पेशव्यांच्या बंडाळीचे फलित म्हणजे व-हाडातील असंतुष्टाना पुरेशी ताकीद मिळेल. तसे झाल्यास राजधानीतून रेसिडेंटची

उचलबांगडी करण्याचा एखादा प्रयत्न निराशेपोटी करण्याचे धाडस ते करतील हे संभाव्य वाटत नाही; मग त्यांच्या बेगुमान प्रवृत्तीविषयीच्या बातम्या पूर्णतया ख-या असल्याचे शाबीत का होईना.

हे लिहीत असताना अशी माहिती मिळाली आहे की नागपूरच्या रेसिडेंटकडे चार बटॅलिअन्स आणि घोडदळाची एक रेजिमेंट इतके सैन्य आहे. यावरून तिकडील प्रकरणासंबंधी साशंकता सर्वथा दूर व्हावी.

## शासनाचे असाधारण राजपत्र, मंगळवार सकाळ, २३ डिसेंबर १८१७, कलकत्ता

नागपूरहून तिथल्या घडामोडीसंबंधी अधिकृत बातमी आल्यावरून आम्ही आमच्या वाचकांची उत्कंठा दूर करण्यासाठी त्यांना त्वरेने कळवीत आहोत की रेसिडेंन्सी आणि तिचे उदार त्राते सुखरुप आहेत. २६ नोहेंबरच्या संध्याकाळी राजानी आमच्या सैन्यावर हल्ला करण्यास सुरुवात केली. त्यांचा अग्निवर्षाव दुस-या दिवशी दुपारी अकरा वाजेपर्यंत थांबला नाही. अपेक्षेप्रमाणे आमचे अधिकारी आणि सैनिक उच्चतम धैर्याने लढले. एक वेळ अशी आली होती की ते जवळजवळ पूर्णपणे घेरले गेले असते, परंतु बंगाली घोडदळाच्या तीन तुकड्यांनी अत्यंत निर्णायक पराक्रमाने आणि जलद गतीने हल्ला केला आणि शत्रूला परतवून लाविले, तेव्हा थोड्याच वेळात शत्रूने सर्व दिशाना पळ काढला. आमच्या बाजूला लढणारे फक्त बाराशे होते, आणि त्यापैकी तीनशे मारले गेले अथवा जखमी झाले. मारले गेलेल्यांपैकी सोध्बी, कॅप्टन सॅड्लर् (चोवीसावे), डॉ. नेव्हन्, लेफ्टनंट क्लार्क (विसावे) आणि लेफ्टनंट ग्रँट (चोवीसावे) यांच्या नावाचा उल्लेख आम्हाला खेदाने करावा लागत आहे. शत्रूवरील या झगझगीत पराभवानंतर लौकरच बंगाल पायदळाच्या सहा कंपन्या आणि बंगाल घोडदळाच्या तीन ट्रुप्स त्यांच्या स्वारांसह घेऊन कर्नल गेहन नागपूरला पोचले. उरलेल्या चार कंपन्या तोफांसह २९ तारखेला पोचतील अशी अपेक्षा आहे. ही आणि दुसरी येणारी कुमक राजेसाहेबांकडून बंडाळी पुनः झाली तर ती परिणामकारकरीत्या थोपवील असे वाटते.

## शासनाच्या राजपत्राचे परिशिष्ट, गुरुवार १ जानेवारी १८१८

## २६ व २७ नोव्हेंबरला झालेल्या नागपूरच्या लढाईचा आणखी तपशील

२६ नोव्हेंबर रोजी किना-यावरील तोफखान्याचे लेफ्टनंट मॅक्स्वेल् यांच्या निर्देशनाखाली मद्रासच्या नेटिव पायदळाच्या विसाव्या रेजिमेंटची पहिली बटालियन आणि चोविसाव्या रेजिमेंटची पहिली बटालियन या ४ तोफांसह नागपूरला राहिलेल्या तुकड्या, तसेच बंगालच्या नेटिव घोडदळापैकी सहाव्या रेजिमेंटच्या तीन तुकड्या आणि रेसिडेंसीचे संरक्षक सुमारे १२० शिपाई यानी रेसिडेंसीजवळ टेकडीवर आणि टेकडी व नागपूर शहर यांच्या बरोबर मध्यभागी आपापल्या जागा घेतल्या. दिवसभर ब्रिटिश स्थानाच्या पायथ्याशी असलेल्या झोपड्या ताब्यात घेताना आणि त्यासमोरच सहा तोफा बसविताना बरेचसे अरबांचे समूह दिसत होते. चोविसाव्या रेजिमेंटची पहिली बटालियन डाव्या बाजूला एका लहान टेकाडावर ठेविली होती, आणि उरलेली फौज उजव्या बाजूला मुख्य आणि सर्वात मोठ्या टेकडीवर उभी होती.

सूर्यास्ताच्या सुमारास पहारेकरी आपापल्या जागांवर बसविणे चालू होते, तेवढ्यात अरबानी अचानक गोळीबार चालू केला आणि तत्काळ ब्रिटिशांच्या ठाण्यावर एकदम हल्ला सुरू झाला. हल्लेखोरांचे सर्वात जास्त प्रयत्न डाव्या बाजूच्या टेकडीच्या दिशेने होते. कॅप्टन सॅड्लर् आणि चोविसावी रेजिमेंट यानी धिटाईने आणि यशस्वी रीत्या संरक्षण केले, परंतु एक वेळ अशी आली की ते जवळ जवळ पूर्णपणे दबावात आले, म्हणून चोविसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॅलियनमधून तीन युरोपियन अधिकारी आणि सत्तर शिपाई अशी कुमक त्यांच्या साहाय्यास पाठविली. अरबानी तर एकदा संरक्षक फळीत जवळ जवळ शिरकावही करून घेतला होता. या हल्ल्यामध्ये कॅप्टन सॅड्लर् मारले गेले आणि त्यांचा ॲड्जूटंट लेफ्टनंट ग्रॅण्ट याना दोन जखमा झाल्या. उजव्या हाताला हल्ला प्रामुख्याने शहराकडे तोंड करून असलेल्या टेकडीच्या भागाविरुद्ध होता. त्यासाठी दहा तोफा आणून लाविल्या होत्या, आणि पाच तासपर्यंत जबरदस्त गोळीबार चालू ठेविला होता. मागच्या झोपड्यातून बाहेर येऊन अरब गोळीबार करीत आणि परत फिरत. अचानक दारूच्या दोन

गाड्यांचा स्फोट झाला आणि त्याचा फायदा घेऊन अरबानी टेकडीवर चढण्याची एकच गर्दी केली. त्यांना अत्यंत कणखरपणे विरोध केला गेला आणि ते परतले. कित्येकाना स्फोटामुळे जखमा झाल्या. त्यांच्या आणि जखमींच्या किंकाळ्या, त्यातच भरीस भर म्हणून हल्ल्यासाठी पुढे सरसावणा-या अरबांच्या गर्जना, यामुळे तो देखावा कमालीचा भेसूर झाला. छोट्याशाच पण धीराच्या सैन्याने यशस्वीपणे हल्लेखोरांविरुद्ध निकराचा लढा दिल्यावर हल्लेखोर मागे फिरले, पण त्यानी रात्रभर दोन्ही टेकड्यांवर सतत गोळीबार चालू ठेवला; त्यांच्या तोफा त्यांनी उपयोगात आणल्या आणि त्यांचे अग्निबाणही सर्व दिशाना फिरत होते. सकाळच्या सुमारास चोवीसाव्या (रेजिमेंटची) पहिली बटॅलियन आपल्या ठाण्याचे रक्षण करताना अविरत श्रमाने इतकी थकून गेली होती की, तिच्या साहाय्याला रेसिडेन्सी संरक्षकांना कॅप्टन लॉईड बरोबर पाठविले गेले.

सत्तावीस तारखेला सकाळी ब्रिटिश ठाणे घोडे आणि पायदळाच्या मोठ्याल्या तुकड्या यांच्या गर्दीने पूर्णपणे गराडा घातलेले होते. दहा वाजण्याच्या आतच सुमारे एक मैलपर्यंत सर्वच्या सर्व मैदान त्यानी झाकून टाकलेले होते. ज्यात स्त्रियाना ठेवलेले होते त्या घराच्या परिसरात काही घोडेस्वार शिरले. सुदैवाने त्या क्षणी कॅप्टन फिट्झ्रेराल्डने आपल्या तीन ट्रुप्ससह अत्यंत प्रखरपणे व यशस्वी रीत्या त्यांच्या मोठ्या समूहावर हल्ला केला. तो त्यांच्या मधून दोनदा पुनःपुनः फिरला, आणि बरेच नुकसान झाले तरी त्याना विस्कळीत करून टाकले; नंतर त्याने हल्ला केला व दोन तोफाही घेतल्या. या यशाने टेकडीवरील ट्रुप्समध्येही नवा हुरूप भरला. अकरा वाजण्याच्या सुमारास शत्रूची एक ब-याच मोठ्या संख्येची तुकडी हळुहळु पुढे सरकली आणि तिने सुटसुटीतपणे क्रमाने डावीकडील छोट्या टेकडीकडे कूच केले. जवळ पोचताच अरबांची एक मोठी फळी धावत वर आली, आणि हातात तलवारी घेऊन त्यांनी संरक्षक सैन्य गाठले. तत्काळ त्यांनी अनेक तोफा वरपर्यंत चढविल्या, आणि टेकडीखाली उतरणा-या चोविसाव्या रेजिमेंटवर व पहारेक-यांवर भयानक संहार करणारा अग्निवर्षाव चालू केला. पायथ्याशी जमाव तयार झाला, आणि शत्रूचा एक गाडा स्फोटाने हादरताच त्याचा आमच्या शूर ट्रुप्सनी तत्क्षणी

फायदा घेतला. त्या हल्लेखोरांवर चालून गेल्या, त्यांची जागा काबीज केली, आणि शत्रूची सर्व दिशाना वाताहत करून टाकिली. विसाव्या रेजिमेंटची पहिली बटालियन मोठ्या संख्येने कॅप्टन स्टोनच्या हाताखाली त्याच वेळी अरबांच्या दुस-या तुकडीवर जाऊन आदळली. त्यांचीही दाणादाण केली, आणि त्यांच्याकडून तिने दोन तोफा व बारा कैदी घेतले. आपल्या हल्ल्याचा उपयोग होत नाही हे पाहून आणि आमच्या सैन्याचे यश लक्षात घेऊन नंतर शत्रू पूर्णपणे निरुत्साह झाला, आणि तो आणखी हल्ल्याचा विचार सोडून दूर मागे सरला. लहान टेकड्यांवरील हल्ल्यांमध्ये चोविसाव्या रेजिमेंटचा लेफ्टनंट ग्रँट यांना तिसरी जखम झाली, आणि ती प्राणघातक ठरली. लेफ्टनंट क्लार्क, डॉ. नेवेन आणि श्री. सोध्बी हे तोफांच्या भडिमारात मारले गेले; सोध्बी तर शौर्याने संरक्षक फळी जमविण्याची शिकस्त करीत होता. कॅप्टन लॉइड हा चांगलाच जखमी झाला.

अरबांनी मध्यंतरी टेकडीचा ताबा घेतला होता. तेवढ्या वेळात ते चोविसाव्या रेजिमेंटच्या रुग्णालयात शिरले, आणि त्यानी रानटीपणाने त्यातल्या प्रत्येकाची हत्या केली.

एकंदरीत ब्रिटिशांची हानी झाली ती अशी—नऊ युरोपियन तोफखान्यावरील माणसे आणि तीनशेच्या वर स्थानिक लोक मारले गेले आणि जखमी झाले. चोविसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॅलियनमधील १४९ नष्ट झाले; विसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॅलियनपैकी ६३ आणि संरक्षक ४५. मारले गेलेले अधिकारी— चोविसाव्या रेजिमेंटचे कॅप्टन सॅड्लर्; चोविसाव्या पैकीच लेफ्टनंट आणि ॲड्जूटंट ग्रँट; पंचविसाव्या रेजिमेंटच्या मदतीसाठी पाठविलेल्या तुकडीपैकी विसाव्या रेजिमेंटचे लेफ्टनंट क्ष ार्क; संरक्षण दलाचे डॉक्टर नेव्हेन, आणि श्री. सोध्बी.

जखमी झालेले अधिकारी— विसाव्या रेजिमेंटचे मेजर मॅकॅन्झी, थोड्या प्रमाणात; त्याचे रेजिमेंटचे कॅप्टन प्यू, जबरदस्त प्रमाणात; त्याच रेजिमेंटचे (चोविसाव्या रेजिमेंटकडे पाठविलेल्या दलातही असलेले) लेफ्टनंट डन, थोड्या प्रमाणात; चोविसाव्या रेजिमेंटचे कॅप्टन चार्ल्सवर्थ्, जबरदस्त प्रमाणात; चोविसाव्या

रेजिमेंटचे लेफ्टनंट थुलिअर, जबरदस्त प्रमाणात ; (रेसिडेन्सीला जोडलेल्या) अकराव्या स्थानिक पायदळाचे लेफ्टनंट बेली, जबरदस्त प्रमाणात; संरक्षक दलाचे कॅप्टन लॉइड, जबरदस्त प्रमाणात; सहाव्या बंगाल घोडदळाचे कॉर्नेट्स् हिअरसे, आणि स्मिथ, दोघेही जबरदस्त प्रमाणात.

(कलकत्ता राजपत्र)

## शासकीय राजपत्र, गुरुवार १ जानेवारी १८१८

नागपुरात झालेल्या चमकदार झुंजीत कॅप्टन फिट्झेराल्ड यानी घोडदळाचे नेतृत्व केले हे नमूद करण्यातच त्यांच्या धैर्याचे साजेसे वर्णन होईल.

मागच्या महिन्यात २७ तारखेला नागपुरच्या राजाचा जो विलक्षण पराभव झाला त्याचा त्यांच्या मनावर जबरदस्त परिणाम झाल्यासारखे वाटते. त्यामुळे त्यांच्या नावाने उभे केलेल्या विद्रोही उद्योगाच्या यशस्वितेची शक्यता त्यांच्या मनात भरविली गेली असेल तर ती त्यांचे धोरण पूर्णपणे बदलण्यास कारणीभूत झाली आहे. राजे आता सर्वांशानी नमले आहेत असे सांगितले जात आहे. तथापि त्यांची वचने प्रामाणिकपणाची असोत किंवा टाळाटाळी करणारी असोत, आमची शस्त्रसामग्री इतकी आश्वासक वाटते की त्यांच्या स्वतःच्या विश्वासामुळे किंवा त्यांच्या असंतुष्ट परिवाराच्या द्वेषपूर्ण प्रभावामुळे एखादा संघर्ष उद्‌भवेल अशा आशंकेला मुळीच स्थान नाही. सत्तावीस तारखेच्या चकमकीनंतर लगेच रघोजी भोसल्यांच्या विधवेने, बाईने, शांततेचा भंग घडवून आणणा-या कृत्यात आपला सहभाग नाही, आणि आपणाला संरक्षण मिळावे असा संदेश मि. जेन्किन्स्कडे पाठविला.

## शासकीय राजपत्राची पुरवणी, गुरुवार ८ जानेवारी १८१८

सैन्याच्या मध्यवर्ती विभागाची कानपूर येथील रोजकीर्द (पुढे चालू) दि. १७- थांबलो. आज संध्याकाळी नागपुरच्या राजाच्या सैन्यावर ब्रिटिश सैन्यदलानी मिळविलेल्या निर्णायक विजयाप्रीत्यर्थ तोफखाना मैदानातून बादशहास सलामी दिली.

## शासकीय राजपत्राची पुरवणी, गुरुवार ८ जानेवारी १८१८

### भव्य सैन्यदल

[२६ आणि २७ नोव्हेंबर रोजी घडलेल्या घटनांचा तपशील असलेल्या नागपूरच्या एका अधिका-यांच्या पत्रातील उतारा—]

“ २५ तारखेला रेसिडेन्सीजवळ फौजेने हालचाल केली, आणि जेन्किन्स्ने अधिक वाट पाहायची नाही असे ठरविले. लगेच छावणीतून सैन्याच्या तुकड्याना बोलाविले गेले, रेसिडेन्सीच्या पायथ्यापासून वर दोन टेकाडांवर सैन्यानी आपआपली जागा घेतली. मोठ्या टेकडीवर विसावी रेजिमेंट आणि संरक्षक दल राहिले, आणि त्याच्या दोन्ही टोकांकडे सहा-पाउंडर होती. चोविसावी रेजिमेंट दोन सहा-पाउंडर बरोबर छोट्या टेकडीवर राहिली. बंगाली घोडदळाच्या तीन तुकड्या खाली रेसिडेन्सीजवळ होत्या.

शत्रूने टेकडीखालच्या सर्व झोपड्यांत दीड ते दोन हजार अरब घुसविलेले होते ते टेकडीच्या माथ्यापासून दीडशे यार्डांच्या आत असल्याने त्यानी सैनिकांद्वारा पूर्णपणे तो भाग व्याप्त केला होता. मोठ्या संख्येने घोडेस्वारानी रेसिडेन्सी भोवतीचा सर्व भाग भरून गेला होता, आणि इकडे सुमारे पंचवीस वेगवेगळ्या सामर्थ्यांच्या तोफा टेकडीवर सतत मारा करीत होत्या. चोवीसावी रेजिमेंट लहान टेकडी काबीज करून बसली होती, पण तेथे त्यापैकी अर्धे सैनिकही मावले नाहीत. डोक्यापासून पायापर्यंत ते चांगला आश्रय घेतलेल्या अरबाना दिसत होते, कारण अरब त्यांच्यापासून चाळीस-पन्नास यार्डांच्या आतच होते. सव्वीस तारखेला संध्याकाळी सहा वाजता गोळीबार सुरू झाला, आणि त्या सर्व स्थानावर एकाच वेळी तोफानी, रॉकेटनी आणि बंदुकीच्या निशाणबाजीने हल्ला झाला. तो रात्री दोन वाजेपर्यंत, मग थोडा वेळ बंद पडला. मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे चोविसावी रेजिमेंट उघडी पडल्यामुळे या दरम्यान त्यांचा कमाडिंग ऑफिसर कामी आला, ॲड्टंट ठार झाला, त्याच्या खालचा अधिकारी भयानक रीत्या जखमी झाला, तसेच शंभरावर शिपायांसह दुस-या अधिका-याचीही तशीच गत झाली. गोळीबारातून जी थोडीशीच सुटका झाली, तिचा फायदा घेऊन टेकडीवर तांदळाची काही पोती आणण्यात आली. त्याचा आश्रयस्थानाप्रमाणे

इतका परिणाम झाला की नंतर त्यांना दहापेक्षा जास्त माणसांचे बळी द्यावे लागले नाहीत. पहाट फुटण्याच्या सुमारास कॅप्टन लॉइड्च्या हाताखाली दीडशे लोकांच्या संरक्षक दलाने आणि विसाव्या पलटणीच्या पन्नास जणानी त्यांना बदली दिली. सत्तावीसच्या सकाळी सहाच्या सुमारास झटापटीस पुनः सुरुवात झाली. मोठ्या टेकडीच्या ज्या ठिकाणाहून कॅप्टन बेले मार्गदर्शन करीत होता त्यावर देखील जोराचा हल्ला झाला आणि अरबांच्या निशाणबाजीमुळे आणि दारूच्या तोफांमुळे बरेच नुकसान झाले. या जागी एका दारूच्या गाड्यावर स्फोट झाला आणि तो पुष्कळ नुकसान, भय, आणि गोंधळ याना कारण झाला. त्याचा फायदा घेऊन मोठ्याने आरोळ्या ठोकीत अरब टेकडीवर घुसले व त्यानी जवळ जवळ ते स्थान काबीजही केले.

आता आणीबाणीचा प्रसंग जवळ आला होता. दहा वाजण्याच्या सुमारास संरक्षक दलाने, विसाव्या पलटणीच्या एका समूहाने, आणि एका तोफेने व्यापलेल्या मोठ्या टेकडीवर जिचे पूर्ण नियंत्रण होते त्या लहान टेकडीवर अरबांच्या एका जमावाने अग्निवर्षाव केला आणि तिचा ताबा घेण्यात यशही मिळविले. त्या वेळी अरबानी आमच्याच एका सहा-पौंडी तोफेचे तोंड आमच्याकडे वळविले, इतकेच नव्हे तर त्यांच्या काही चार-पौंडी तोफाही आणून त्यांनी त्या मोठ्या टेकडीकडे वळविल्या. आमच्याकडे राहिला. असा तेवढाच एक भाग होता. दोन्ही टेकड्यांच्या मधल्या जागेकडे ते वेगाने पुढे झाले, आणि मोठ्या टेकडीवर पन्नास यार्डापेक्षाही कमी अंतरावरून त्यानी आमच्या सैन्यावर गोळीबार करण्यास आरंभ केला.

आमच्याच सहा-पौंडी तोफेचा मारा त्यांनी आमच्यावर चालू केला, त्याने खूपच काम केले. पहिल्याच गोळ्याने डॉ. नेविन आणि लेफ्टनंट क्लार्क यांची डोकी उडविली गेली, आणि एकाच ग्रेपच्या फेरीने श्री. सोथ्बी, दुसरा सहायक, आणि त्याच्याबरोबर आणखी चार जण मारले गेले. अरबानी टेकडीचा ताबा घेतलेला दिसताच माळावरील घोडेस्वारानी ठाण्याच्या सर्व बाजूनी एकच गर्दी केली आणि ते रेसिडेन्सीच्या परिसरातच शिरले. हा क्षण कसोटीचा होता, आणि थोडेसेच कमीअधिक झाले असते तर सर्वच खेळ संपला असता. दैवयोगाने

त्याच वेळी सहाव्या बंगाली घोडदळाच्या तीन ट्रुप्सनी (दक्षिणेकडे आणि आग्नेयेकडे) शत्रूच्या घोडदळावर हल्ला केला आणि मोठ्या ऐटीत त्याना आपल्या पुढे सळो की पळो करून सोडले. अर्ध्या दलाने पळणा-या शत्रूचा पाठलाग केला, तर दुस-या अर्ध्याने राजांच्या आग्नेयेकडील दोन तुकड्यांवर हल्ला करून त्यांचा निःपात केला आणि त्यांच्या तोफा घेतल्या. सैनिकाना तोफा कशा वापरायच्या ते माहीत होते. त्यानी शत्रूवर त्या सफाईने उलटविल्या, तेव्हा सर्व मैदानावर गोंधळ झाला होता.

अरबांच्या ताब्यात असलेल्या छोट्या टेकडीवर शस्त्रांचा एक गाडा मोठा स्फोट होऊन हादरला. दैवयोगाने झालेल्या या अपघाताने उत्तेजित होऊन आणि घोडदळाच्या वीरश्रीयुक्त उदाहरणाने प्रेरित होऊन चोवीसाव्या पलटणीचे काही शिपाई आणि संरक्षक दल मोठ्या टेकडीवर जवळ असलेल्या सर्व अधिका-यांच्या नेतृत्वाखाली धावले, आणि त्यांनी शत्रूवर हल्ला करून अरबाना हाकून लाविले, आणि त्यांचे ठाणे पुनः हस्तगत केले. या वेळी घोडदळाच्या एका ट्रुपने टेकडीवर हल्ला केला, आणि अरबांवर बाजूने चालून जाऊन पूर्ण यश मिळविले. ही चीत-पट जशी सर्वस्पर्शी होती तशीच ती पूर्ण शेवट करणारी होती. मैदान भरून टाकणारी असंख्य कलेवरे लगेच दूर करून मैदान साफ केले गेले. हा खरोखरीचा गौरवाचा क्षण आमच्या बाजूला निर्णयात्मक रीत्या आला. एकूण ३३३ मृत किंवा जखमी ही हानि झाली, तीत १४ अधिकारी म्हणजे चतुर्थांशांपेक्षा जास्त होते. घोडदळाच्या दमदार/तेजस्वी उदाहरणाने त्या दिवसाला निर्णायकपणे वेगळे वळण दिले. श्री. जेन्किन्स्––किंबहुना प्रत्येक अधिकारी आणि प्रत्येक नागरिकच—वीराप्रमाणे वागले. त्यांनी स्वतःला संकटात झोकून देण्यात कोणतीही बाकी ठेविली नाही. राजेबहादुरांची छावणी समोर दृष्टिपथात आहे, पण आम्ही नवी कुमक येईपर्यंत संरक्षक पवित्र्यात राहूनच हालचाल करीत आहोत. आम्हाला वाटते की आम्ही त्या वेळी त्याना त्यांच्या विश्वासघाताचे फळ भोगावयास लावू. राजेबहादुराना आपण यातूनही मार्ग काढू असे वाटते आहे. (मिरर)

## लष्करी दैनंदिनी खंड तिसरा यातील उतारा— पृष्ठे १५१-१६६

नागपूरच्या संरक्षक दलाने १८१७ च्या मराठा युद्धात नाव घेण्यासारखा भाग घेतला, आणि तो विशेषतः सीताबर्डीच्या लढाईत होता. या लढाईत कॅप्टन लॉइड चार वेळा जखमी झाले. त्याच्या अगदी अगोदर ज्या घटना घडल्या आणि ज्यामुळे त्या संस्मरणीय लढाईला तोंड लागले त्या घटना पुढीलप्रमाणे—

२३ नोव्हेंबर १८१७ या दिवशी राजानी रेसिडेंटना दुस-या दिवशी पेशव्यांनी आपणाकडे पाठविलेली खिलात (—मानाची वस्त्रे) स्वीकारण्याची इच्छा बोलून दाखविली, व विनंति केली की त्यांनी या समारंभाला उपस्थित राहून मान द्यावा, किंवा बरे वाटत नसल्यास दुस-या कोणाला उपस्थित राहण्यास सांगावे. त्या प्रसंगी ब्रिटिश छावणीत तोफांची सलामी दिली जावी अशीही इच्छा त्यांनी व्यक्त केली. परंतु याच सुमारास ब्रिटिश सरकार पेशव्यांच्या विरुद्ध युध्दाच्या पवित्र्यात असल्यामुळे त्या सरकारच्या प्रतिनिधि राजांच्या इच्छेला होकार देण्याची शक्यता नव्हती हे स्पष्ट होते; कंपनी आणि नागपूरचे राज्य यात त्या वेळी असलेल्या मित्रत्वाचा विचार केला तर हेही तितकेच सरळ होते की राजे पेशव्यांकडून वस्त्रे स्वीकारण्यात त्यांचा आदर करीत होते, व यामुळे ब्रिटिश सरकारची चांगलीच आगळीक काढली असे सिद्ध होत होते. राजे जी गोष्ट करायला निघाले होते त्या कृत्याबद्दल अशा प्रकारचा अभिप्राय त्यांच्या दरबारी रेसिडेंट असलेल्या श्री. जेन्किन्स्ने त्याना अधिकृतरीत्या कळविला होता.

२४ नोव्हेंबरच्या दिवशी राजांची मनोवृत्ति निर्णायकपणे शत्रूत्वाची झाली होती. रेसिडेंटच्या सल्ल्याच्या पूर्ण विरोधात जाऊन, जे मंत्री इंग्रजांशी शत्रुत्व बाळगणारे होते अशा मंत्र्यानी शिफारस केलेला धोरणात्मक मार्ग अनुसरावयास ते प्रवृत्त झाले. बाजीराव पेशव्यांनी पाठविलेली मानाची वस्त्रे त्यांनी जाहीरपणे धारण केली, आणि त्यांना मराठा सैन्याचा सरसेनापति करणारे पुण्याहून आलेले अधिकारपत्रही स्वीकारले. नंतर हत्तीवर बसून त्यांनी आपल्या प्रमुख सरदारांपुढे भाषण करून सांगितले की, आता आमचा मान तुमच्या हाती सोपविलेला आहे व आम्ही तुमच्यावरच केवळ विश्वास ठेवीत आहोत. भोवताली

सैन्याच्या पलटणी घेऊन ते मोठ्या दिमाखात सक्करद-याला छावणीकडे निघाले. राजांचे निशाण जरीपटका थाटात डोलत होते. सैन्य शिस्तीत पसरलेले होते. छावणीच्या जवळच्या तोफखान्याच्या ठिकाणापासून सलामी दिली जात होती. आणि, थोडक्यात म्हणजे, समारंभाच्या डामडौलात भर पाडील अशी कोणतीही बाब वगळण्यात आली नव्हती.

२५ तारखेच्या सकाळी रेसिडेन्सी आणि शहर यातील सर्व दळणवळणावर निर्बंध घातले गेले. दरबाराकडे पत्र घेऊन जाण्यास रेसिडेंटच्या हरक-यास परवानगी मिळाली नाही. इंग्रजी सैन्य आणि त्यांच्या बरोबरचे इतर लोक यांना बाजार बंद करण्यात आला, आणि अशी संभाव्यता दिसू लागली की मराठा छावणीत काय चालले आहे याची वार्ता काढण्यात येणा-या अडथळ्यांमुळे रेसिडेन्सीवर आकस्मिक हल्ला टाळण्यासाठी घेण्यात येणारी खबरदारी उपयोगी पडणार नाही. तरीही निर्णायक उपाय जितक्या उशीरा करिता येईल तितका पुढे ढकलावा हेच उत्तम असे ठरविले गेले.

दुपार जवळ आली तेव्हा राजांच्या घोडदळापैकी सुमारे दोन हजारांची एक तुकडी शहराच्या ईशान्येकडे पाच मैलांवरील बोकूरची छावणी सोडून रेसिडेन्सीकडे आली. गणपतराव सुभेदारांच्या हाताखालचे घोडदळ शस्त्रसज्ज झाले, आणि पेंढारी जवळपासच्या भागात आले असून त्यांनी नागपूरला भय उत्पन्न केले आहे अशा बातम्या बाहेर पसरल्या. तेव्हा नागपूर म्हणजे त्रेधातिरपीट, गोंधळ, आणि भीती असे दृश्य दिसू लागले. पेंढा-यांपासून काही भय आहे अशी नागरिकांची कल्पना नव्हती, पण ब्रिटिशांवर हल्ला करून त्यांना आपल्या मुलखातून हाकलून देण्याचा राजांचा बेत आहे अशी सार्वजनिक चर्चा होती, आणि यावर सर्वांचा विश्वासही होता. रेसिडेन्सीचे लोक ज्या ठिकाणी नेहमी येत त्या बाजार विभागात ही भीति पसरली, आणि लौकरच बाजार जवळ-जवळ निर्मनुष्य ओसाड झाला, गरीब आणि श्रीमंत दोन्ही वर्गानी सीताबर्डीजवळून आपापली कुटुम्बे आणि चीजवस्तू हलविली.

या सर्व परिस्थितीवरून, आणि कदाचित लोकांना माहीत न झालेल्या इतरही ब-याच विचारानी रेसिडेन्सीवर हल्ला होण्याची रेसिडेंटला भीती वाटू लागली हे अगदी बरोबर होते. दुपारी अडीच वाजता त्याने लेफ्टनंट-कर्नल स्कॉट्ला

आदेश पाठविले की ती मैलावर असलेल्या आपल्या तेलंखेडी छावणीतून तत्काळ निघून सीताबर्डी टेकडीवर सर्व ब्रिटिश सैन्यासह हजर व्हावे. छावणीतून त्या तुकड्या येऊन पोचण्यापूर्वीच शत्रूने ठाणे बळकावू नये, अशा पूर्वदक्षतेने कॅप्टन लॉइड्च्या आधिपत्याखाली असणा-या रेसिडेन्सीवरील पलटणीही त्याच वेळी शस्त्रसज्ज झाल्या. नागपूरच्या संरक्षक दलापैकी सुमारे चारशे शिपाई, दोन बाहेरील तुकड्या, आणि लेफ्टनंट बेले यांच्या अधिकाराखालील दोनशे शिपाई एवढे हे दल होते.

दुपारी तीन ते चारच्या दरम्यान बेलेला कळविण्यात आले की, अरबांची तुकडी सीताबर्डीकडे चालून येत आहे. हल्ल्याच्या भीतीने त्याने मोठ्या टेकडीच्या पूर्वेकडील टोकाकडे असलेल्या श्मशानभूमीवर ठाण मांडले. या अवधीत लेफ्टनंट कर्नल स्कॉट सहाव्या रेजिमेंटच्या तीन ट्रुप्स, बंगाली घोडदळाच्या तीन ट्रुप्स, दोन सहा पौंडी तोफा, आणि पायदळाच्या दोन मामुली तुकड्या, व त्यांच्या मागून येणारे सैन्याच्या छावणीतले सेवक बरोबर घेऊन फुल मार्च मध्ये येत होता. सुदैवाने शत्रूने कवायती मार्गात अडथळा आणला नाही, व मराठा सैन्याच्या समक्ष सीताबर्डीच्या दोन्ही टेकड्यांवर तळ देण्यास ब्रिटिशांना चालू दिले. अत्यंत अनपेक्षित असलेल्या या धीट कृत्याने राजे आश्चर्यचकित झाले असले पाहिजेत. दिवस मावळण्याच्या अगोदर राजधानीजवळच असलेल्या अत्यंत मोक्याच्या जागेचा ब्रिटिशांनी शांतपणे ताबा घेतला आहे असे त्यांना दिसले.

२६ तारखेला भल्या सकाळी टेकडीच्या रक्षणासाठी पलटणीना आपापल्या जागा नेमून दिलेल्या होत्या. लहान टेकडी मजबूत करण्यासाठी प्रयत्न केला, पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. टेकडीच्या भोवताली आपला पुष्कळसा तोफखाना आणण्यात शत्रू व्यग्र होता. त्या कामी त्यांना कोणताही उपद्रव करण्यात आला नसला तरी शत्रूत्व आरंभिणे ब्रिटिशांना योग्य वाटले असते तर प्रत्येक तोफ सहजपणे त्यांच्या हाती पडली असती, कारण त्यांच्या मदतीस सैन्य नव्हते. सूर्यास्ताच्या सुमारास शत्रूची सर्व तयारी पूर्ण झाली होती. अशा वेळी राजानी आपले दोन मंत्री आपल्या तक्रारी मांडण्यासाठी श्री. जेन्किन्स्कडे पाठविले, आणि ते चर्चेत व्यग्र असतांनाच युद्ध सुरू झाले ते आकस्मिकपणे, रेसिडेंन्सीकडे पाठविलेल्या मंत्र्यांना त्याची कल्पना नव्हती असे मानले जाते.

सीताबर्डीच्या मोठ्या टेकडीवर ब्रिटिशांचा अधिकार होता, सरळ उत्तरेला चारशे यार्ड अंतरावरील खुजी टेकडी त्यांच्या डाव्या बाजूला होती, आणि त्यांचा सीताबर्डीशी संबंध एका वर्तुळाकार मार्गाने आला होता. दोन्ही टेकड्या सभोवतीच्या जमिनीच्या पातळीपासून वर सुमारे शंभर पावले उंच आहेत. त्यांची शिखरे एकदम वेगळी आहेत. सीताबर्डी समतल आहे, समाध्या आणि थडगी यांनी वेष्टिलेली आहे, लांबीला पूर्व-पश्चिम २८० यार्ड, आणि रुंदी १२० ते ५० यार्डांच्या दरम्यान बदलली आहे. छोट्या टेकडीला सुळका असून त्याची उंची १०० फूट लांब आणि १७ फुट रुंद आहे. उत्तर, दक्षिण, आणि पश्चिमेकडे ती संथ उतरत गेली आहे. शिखरापासून ३० यार्ड पूर्वेकडे खोल आणि विस्तृत खड्डे निर्माण होऊन ओबडधोबड बनली आहे. सीताबर्डीचे उतारही तसे चालायला सोपे आहेत. दक्षिणेकडे मात्र ते तुटलेले असले तरी पायदळ जाऊ शकते. वरच्या टोकापासून ८० ते १०० यार्डांच्या अंतरावर पूर्वाभिमुख असलेल्या बराचशा भागात खड्डे निर्माण झालेले आहेत, नागपूरच्या संरक्षक दलाच्या रांगा पश्चिमेकडील छोट्या टेकडीच्या पायथ्याच्या कडेकडेने गेल्या आहेत, आणि खोलगट भागाच्या पलीकडे उत्तरेच्या आणि पूर्वेच्या बाजूला शहराचे उपविभाग जोडले गेले आहेत. पूर्वेकडील बाजूला सीताबर्डी टेकडीचा पायथा झोपड्यानी झाकलेला आहे. पायथ्याच्या बाजूने दक्षिणेकडे एक विस्तीर्ण खेडेच पसरले आहे, व रेसिडेंन्सीच्या नागरिकांच्या घरानी पश्चिमेकडील बाजूचा तळ व्यापला आहे. नागपूर शहर या टेकड्यांच्या पूर्वेकडे आहे. त्यापलीकडे मराठा छावणी पूर्वेकडून दक्षिणेच्या अंगाने ब्रिटिश ठाण्यापासून सुमारे तीन मैल अंतरावर आहे.

ब्रिटिश ठाण्याच्या स्थानासंबंधीच्या या तपशिलावरून हे लक्षात येईल की डावीकडील छोटी टेकडी ही त्यांची दुबळी बाजू होती, आणि शत्रूला मिळालेल्या भूमीचा सर्व फायदा घेण्याच्या दृष्टीने सैन्य फारच थोडे होते. चोवीसाव्या रेजिमेंटची पहिली बटॅलियन दोन सहा-पौंडी तोफांसह छोट्या टेकडीच्या उत्तरेकडील उतारावर सज्ज राहिली. पूर्व-पश्चिम अशी त्यांची रांग पसरली, शहराच्या उपविभागाला जोडलेले तेलीपुरा हे खेडे त्यांच्या समोर साठ किंवा ऐंशी यार्डापेक्षा अधिक दूर नव्हते. विसाव्या रेजिमेंटची पहिली बटॅलियन आणि चोवीसाव्या

रेजिमेंटची एक तुकडी दक्षिणेकडे आणि पूर्वेकडे तोंड करून सीताबर्डीवर एकत्र झाली, आणि नागपूरच्या संरक्षक दलाचे शंभर शिपाई एका सहा-पौंडी तोफेसह त्याच टेकडीचे पश्चिम टोक धरून राहिले. उरलेली तोफ विरुद्ध टोकाला ठेवली. नागपूरच्या तुकडीपैकी ज्यांच्याजवळ शस्त्रे होती असे शिपाई, संरक्षक दलाचा अविशिष्ट भाग, आणि विसाव्या रेजिमेंटचा छोटासा भाग, याना रेसिडेंटचा बंगला, राजदूताच्या माणसांची घरे, आणि स्मशानभूमि यात घालविले आणि सहाव्या बंगाली घोडदळाच्या तीन तुकड्या शत्रूजवळ शेतात प्रविष्ट झाल्या. सीताबर्डीच्या पूर्वेकडील शत्रूच्या झोपड्यातून आणि खाणीतून बंदुकीच्या तिखट फैरीनी युद्धाला सुरुवात झाली. त्याबरोबरच तोफांचा जोरदार भडिमार झाला, आणि नंतर थोड्याच वेळात ब्रिटिश ठाण्याच्या डावीकडील चोवीसाव्या रेजिमेंटच्या समोरील झोपड्यातून बंदुकीची विनाशक निशाणबाजी आरंभिली गेली. अशा रीतीने युद्ध उघडपणे सुरू झाले.

जेथे संरक्षक दलाची स्थापना झाली होती त्या जागेवर हल्ला केला जाईल अशी संभाव्यता नसल्यामुळे कॅप्टन लॉइड् आपल्या सैनिकांची एक तुकडी घेऊन टेकडीच्या पूर्वेकडील टोकाला आला आणि त्या ठिकाणी संरक्षण करणा-या ट्रुपला मिळाला. तेथे त्याला निरनिराळ्या स्थानांवर बरीच अव्यवस्था झालेली दिसली. शिपाई आपापल्या रांगात न राहता एकत्रितपणे खूप दाट गर्दी करीत होते. काही जण मागील थडग्यांकडे आश्रयाकरिता धावत होते. अरबांचा गोळीबार थांबत नव्हता. आणि हा गोंधळ पूर्ण करण्यासाठी सहा-पौंडी तोफगाडीवर सुमारे साडेनऊला स्फोट होऊन दोन्ही टेकड्या उजळल्या आणि स्फोटाच्या परिसरातील सर्व काही नष्ट झाले हे लक्षात आले. दुसरी तोफ त्या ठिकाणी ओढून आणली, शत्रूवर तिचा मोर्चा रोखला, आणि बंदुकीच्या फैरी सतत चालू असल्यामुळे ते झोपड्या आणि खबदाडे यातून बाहेर निघेनात.

मध्यरात्र होऊन जाईपर्यंत कॅप्टन लॉइड्ची फळी तेथे राहिली. टेकडीच्या शिखरावरून फक्त पाहण्याइतकी माघार घेण्यामुळे, ते फारसे धोक्यात नव्हते. त्यांना बसून राहण्याचा आदेश होता.

हा सर्व वेळ ठाण्याच्या डावीकडील बाजूचे रक्षण चोवीसाव्या रेजिमेंटची पहिली बटॅलियन विशेष धैर्याने करीत होती. समोरील झोपड्यांचा ताबा घेऊन अरब त्या आडून गोळीबार करीत होते, व तो काही काळ निर्णायकपणे परिणामकारक होऊन बरीचशी प्राणहानीही घडवून आणीत होता. सैनिक तितक्याच निश्चयाने त्याला उत्तरही देत होते. दोन सहा पौंडी तोफा मदतीला असल्यामुळे युद्ध सुरू झाल्यावर थोड्याच वेळात त्या जागी आगीचा भडकाही ते उडवू शकले. परंतु शत्रु पुनः झोपड्यात जाऊन पूर्वीप्रमाणे ब-याच जोमाने गोळीबार करू लागला, पण त्याचा तितका परिणाम होईना; कारण कॅप्टन चार्ल्स्‌वर्थ् याने कॅप्टन सॅड्‌लर् पडल्यावर अधिकार स्वीकारून बटॅलियनला काही पावले मागे सरून खाली बसण्याचा आदेश दिला होता. ही चाल अत्यंत विवेकपूर्ण होती. त्यामुळे तो स्वतः आणि गाव यामध्ये टेकडीचा पसारा आड येऊन त्याच्या शिपायाना बरेचसे झाकता आले. तरी चोविसाव्या रेजिमेंटला लेफ्टनंट डनच्या हाताखालील विसाव्या रेजिमेंटच्या स्फोटकधारी तुकडीचे साहाय्य देऊन ती मजबूत करणे आवश्यक आहे असे ठरले. दुपारचा एक वाजेपर्यंत या प्रशंसनीय पलटणीला इतका तीव्रपणे त्रास भोगावा लागला की, ठाण्याच्या उजवीकडे तिला हलविण्याचा निर्णय झाला.

रात्री दहा वाजण्याच्या सुमारास शत्रूच्या घोडदळाचा एक मोठा ताफा तोफांसह मराठा छावणीतून येऊन पोचला आणि त्याने उत्तरेस, दक्षिणेस आणि पश्चिमेस आपापली जागा पकडली व एका मोठ्या वर्तुळाचा वक्राकार भाग रेखला गेला. परंतु तरीही त्यांनी आमच्या घोडदळाजवळ येऊन संघर्ष करण्याचा प्रयत्न केला नाही. तोफांचा भडिमार आणि चकमकी एवढ्यावरच त्यांनी आपल्या हालचाली मर्यादित ठेवल्या. मधून मधून त्यांनी अग्निबाण फेकले, त्यांचे लांब प्रकाशमान मार्ग विविध दिशांनी क्षितिजापलिकडे जाऊन अत्यंत चित्रविचित्र देखाव्यांचा परिणाम साधीत होते.

[* या वेळी राजांबरोबर शत्रूच्या छावणीत राहिलेल्या तुकड्यांशिवाय दहा हजार घोडदळ, सहा हजार पायदळ, आणि तोफखान्यापैकी पसतीस तोफा, पलटणीला घेरून होते. सभोवतीच्या प्रदेशाशी सर्व दळणवळण बंद पडले होते. शिपायांच्या बायका-मुलांसह छावणीचे लोक, आणि रेसिडेंटच्या

निवासातल्या युरोपियन अधिका-यांची कुटुंबे सुद्धा शत्रूच्या गोळीबाराच्या टप्प्यात होती. पुरवठा फक्त काही दिवस पुरेल इतकाच होता, आणि दारूगोळाही मुळीच भरपूर नव्हता. अशा परिस्थितीत, लेफ्टनंट कर्नल गेहन शिपायांची एक पलटण व घोडदळाच्या तीन तुकड्या हुशंगाबादहून घेऊन येत होते. तसेच मेजर पिटमनची व-हाडात एक फौजेची तुकडी होती, त्यांना परिस्थितीची कल्पना देणे अत्यंत महत्वाचे होते. हे काम साहसाचे होते, पण तरीही ते कॅप्टन लॉइड्चे दोन व्यक्तिगत सेवक आणि नागपूरच्या संरक्षक दलाचा एक शिपाई यांनी स्वीकारले. ते तिघेही शत्रूच्या घोडदळातून कोणाचे लक्ष न जाता फिरले.]

मध्यरात्री डावीकडील पलटणी माघारी घेण्याचा निर्णय झाला. अधिकारी आणि शिपाई यांचा मोठा नाश होण्याची झळ या पलटणीना सहन करावी लागली होती. त्या थकलेल्या होत्या, आणि लढाई ज्या मजबूत आवरणाआडून केली त्यापासून अरबाना काढून लावण्याचे सामर्थ्य त्यात उरले नव्हते. म्हणून नागपूरच्या संरक्षक दलाचे शंभर लोक आणि विसाव्या रेजिमेंटचे पन्नास लोक यांना त्या पलटणीस विश्रांती देण्याचे आदेश निघाले.

एक-दीड वाजण्याच्या अगोदर छोट्या टेकडीच्या दक्षिणेकडील उतारापर्यंत ते पोचू नयेत यासाठी जमवाजमव करून नवी तुकडी बनविण्यास काही वेळ लागला. टेकडीच्या माथ्यावर त्यांना दोन सहा पौंडी तोफा आढळल्या. चोवीसाव्या रेजिमेंटची तुकडी उत्तरेकडील उतारावर शत्रूला भिडली होती. कॅप्टन मॅक्डोनाल्ड याने कॅप्टन चार्ल्स्वर्थ् जखमी झाल्यावर कमांडिंग ऑफिसर म्हणून त्यांच्या जागी अधिकार स्वीकारला होता. तो धान्याच्या पोत्यांसाठी घाईने करावयाच्या लहानशा बांधकामावर देखरेख करीत होता. पण हे काम टेकडीच्या उतारावर इतके खाली होते की, बाकीच्या गैरसोयी सोडल्या तरी मोठे कुंपण बनविण्यासाठी पुरेशी संख्याही नव्हती. या स्थितीची कॅप्टन मॅक्डोनाल्डला जाणीव नव्हती, आणि पहाटेपूर्वी काम पूर्ण करण्याइतका वेळही नव्हता. जे काही थोडेसे काम झालेले होते ते नष्ट करावयाचे होते, कारण कॅप्टन लॉइड्ने हे बांधकाम फक्त टेकडीच्या माथ्यापुरतेच मर्यादित करण्याचे ठरविले होते, यापेक्षा अधिक काही करावयाचे नव्हते.

शत्रूने ताब्यात घेतलेल्या झोपड्या दीडशे यार्डापेक्षा अधिक दूर नव्हत्या. ते तेथून अधिकच आनंदाने उत्तम नेम धरून गोळीबार करीत होते. परंतु कॅप्टन मॅक्डोनाल्डच्या साहाय्याने अडीच वाजेपर्यंत कामात काही वाढ झालेली होती, आणि या वेळीच तो चोविसाव्या रेजिमेंटच्या आणि विसाव्या रेजिमेंटच्या तुकड्यांच्या उजवीकडे एक सहा पौंडी तोफ घेऊन गेला. ही हालचाल लक्षात आल्यावर शत्रु झोपड्यातून आरोळ्या ठोकीत आणि सर्व प्रकारे आनंद प्रदर्शित करीत बाहेर आला. ब्रिटिश आणि गाव यातील जमिनीवर सरशी झाल्याचा आसरा घेऊन त्याने आपली फळी मोठी केली आणि गावातील जागेवरून सतत गोळीबार चालू ठेवला होता तो आता एकाच केंद्रावर मर्यादित केला.

चोविसाव्या रेजिमेंटची पन्नास माणसे आणि संरक्षक दलाचे दोन भाग समाविष्ट असलेल्या राखीव सैन्याचे तीन भाग करून त्यांची योजना अगोदरच दक्षिणेच्या बाजूला टेकडीच्या मागे केलेली होती. शिपाई आणि मार्गदर्शक असाधारण शांततेने परिश्रमपूर्वक काम करीत होते त्यांच्या रक्षणाकडे त्यांनी लक्ष दिले. कारण धान्याची पोती घेतलेले बैल संकटाची जाणीव असल्याने कोणत्याही प्रकारे टेकडीच्या माथ्याकडे आणणे शक्य नव्हते. ते आपला भार माथ्यापासून काही अंतरावर खाली टाकत. याला दोन किंवा तीन अपवाद कौतुक करण्यासारखे होते.

पहाट होईपर्यंत टेकडीच्या माथ्यावर तात्पुरते बांधकाम म्हणता येण्यासारखे तयार झाले. साडेतीन फूट उंचीच्या या जागेत जेमतेम शंभर माणसे मावली असती. सर्वजणांना गच्चीच्या भिंतीला टेकून जवळजवळ बसावे लागत होते. दुर्दैवाने टेकडीच्या माथ्याच्या लांबीवरून नव्हे तर सतरा फूट रुंदीकडून शत्रू दिसत होता. अर्थात् सरळ रेषेत जास्तीत जास्त दहा माणसे गोळीबार करू शकली असती, परंतु सहा पौंडी तोफ वाटेत होती. त्या स्थितीत ब्रिटिशांचा अचूक मारा जवळजवळ शून्यवत् झाल्यासारखाच होता.

पहाटेअगोदर थोडाच वेळ कॉर्नेट स्मिथने कॅप्टन लॉइड्च्या विनंतीवरून आपली तुकडी टेकडीच्या मागे आणली, परंतु तो पुढे आल्याबरोबर उघडा पडल्यामुळे काहीही करू शकला नाही. अरब झोपड्यातून पळाले, ते तो

जाईपर्यंत बाहेर येईनात. जरी तो थोडाच वेळ तेथे राहिला, तरी (तेवढ्यात) पलटणीचे दोन घोडे तोफेच्या गोळ्याने मारले गेले, तीन जखमी झाले आणि आणखी दोन तोड्याच्या बंदुकांच्या गोळ्यांनी जखमी झाले.

आता मात्र प्रथमच मराठा सैन्याची संख्या आणि स्थान यांची ब्रिटिशांना स्पष्ट कल्पना आली. घोडदळ स्वार होऊन जवळ जवळ आले, रांगा आणि ओळीतून नव्हे तर मोठ्याल्या घोळक्यातून त्यांच्या ब-याच तोफा अधिक अनुकूल स्थानांकडे सरसावलेल्या होत्या, आणि त्यांना पायदळाची मदत होती. अरब नेहमीपेक्षा अधिक उद्योगी झाले होते, आणि सात वाजेपर्यंत ब्रिटिश सैन्याला अधिक चांगला नेम धरलेला आणि भारी असा गोळीबार युद्धाच्या त्या पूर्वीच्या काळापेक्षा जास्त सहन करणे भाग पडले.

आठ आणि नऊ वाजण्याच्या दरम्यान शत्रूने नऊ तोफा छोट्या टेकडीवरून उपयोगात आणल्या. त्यापैकी दोन अरबांजवळ ८० किंवा १०० यार्डांच्या आतच होत्या. टेकडीचा उंचवटा नसता तर ब्रिटिश पाव तासातच झटकून टाकले गेले असते. जखमींची स्थिती आता गंभीर झाली होती. तोफेच्या एकाच गोळ्याने दोघेजण ठार झाले होते. तिस-याला जखम न होता त्याची पगडी फक्त उडवून लावली गेली. थोडक्यात शत्रूला मा-याची जागा इतकी अचूक मिळाली होती की अगदी जवळ असलेल्या दोन तोफा हाती लागल्या नसत्या तर अत्यंत गंभीर परिणाम होण्याचे संकट पुढे होते, कारण धान्याच्या पोत्यांचे तडकाफडकी उभारलेले बांधकाम तोफांचा मारा सहन करू शकणार नव्हते.

कॅप्टन लॉइड्ने तोफाना धडक द्या असा आपल्या तोटक्या राखीव दलाला आदेश दिला. परंतु काहीतरी गफलत होऊन शिपायांपैकी तीस जण अगोदरच गेलेले होते, आणि उरलेले असे काही करण्यास पुरेसे नव्हते. तथापि, त्यांच्या विनंतीवरून विसाव्या रेजिमेंटची एक हलकी तुकडी बरोबर घेऊन कॅप्टन ब्रुक

ही कामगिरी अंमलात आणण्यास आला. संधि तर निघून गेली होती. काय घडणार आहे याची कल्पना येताच अरबानी आपल्या बंदुका झोपड्यातून मागे घेतल्या. कॅप्टन ब्रुक मोठ्या शौर्याने प्रयत्न करण्यास तयार झाला, परंतु अरब मोठ्या संख्येत आणि बलवान जागांवर होते. तेव्हा उजवीकडे सरकून माघार घ्यावी हे ब्रुकच्या दृष्टीने आवश्यक आहे असा निर्णय झाला. परंतु जागा सोडण्यापूर्वी कॅप्टन लॉइड्ने विनंती केली की, समोर असलेल्या अरबाना संरक्षक स्थलापासून दूर हटविण्यासाठी उपाय केले नाहीत तर, बांधकाम तोफखान्यापुढे टिकाव धरण्याच्या दृष्टीने अत्यंत कमजोर असल्यामुळे, आणि सहा-पौंडी तोफ उघड्यावरच्या त्या परिस्थितीत अगदीच निरुपयोगी असल्यामुळे, (स्वीकारलेल्या) स्थानाचे रक्षण करता येणार नाही असे त्यांनी कमांडिंग ऑफिसरला सांगावे.

नऊ ते दहा वाजण्याच्या दरम्यान आहे त्या ठिकाणाहून लवकरच हलविली जाण्याची भिती असल्यामुळे सध्याच्या ठिकाणाहून मागच्या बाजूला तोफ परत नेण्याची आवश्यकता तोफखान्याच्या अधिका-याने कॅप्टन लॉईड्ला पटवून दिली. कॅप्टन लॉइड्चे मतही तसेच असल्यामुळे तो उपाय तात्काळ अंमलात आणला गेला. या वेळेपर्यंत शत्रूने नागपूरच्या संरक्षक दलाच्या रांगाना आग लावलेली होती. समोरच्या तुकड्या मागे जाताना दिसताच त्यांची अशी कल्पना झाली की, ब्रिटिश जागा सोडण्याच्या तयारीत आहेत. तेव्हा त्यांनी ब्रिटिशांच्या आघाडीवर आणि दोन्ही बाजूना वेगाने गोळीबार केला. हा मारा इतका क्षणार्धात झाला की, तो परतवून लावण्यासाठी कोणतीच व्यवस्था करता आली नाही. कॅप्टन लॉइड्ला फक्त फायर म्हणून आपल्या लोकांना आदेश देण्याइतपतच वेळ मिळाला, आणि त्याने आपल्या मागून लोक येत आहेत समजून अरबांशी भिडण्यासाठी भिंतीवरून उडी मारली. शत्रूच्या जवळजवळ संपर्कात असूनही त्याला आधार देण्याला त्या बांधकामातून एकही मनुष्य बाहेर आला नाही. एक गोळी त्याच्या डाव्या बाहूला चाटून गेली, आणि आपत्ति पूर्ण

करण्यासाठी की काय संरक्षक दलानेही शत्रूवर मारा करण्याऐवजी थोडासा विस्कळित गोळीबार केला व ठाण्याच्या उजवीकडे टेकडीच्या बाजूला घाईघाईने माघार घेतली. खेळ खलास झाला. अधिकारी आणि माणसे एकत्रितच बांधकामातून घाईने बाहेर आले. अरबांनी तलवारी आणि खंजीर वापरीत त्याचा जवळून पाठलाग केला. ब्रिटिशांनी दोनदा उभे राहण्याचा प्रयत्न केला, तो निरर्थक होता. काही अधिक शूर लोक वळले, परंतु ती धांदल सार्वत्रिक असल्याने उपाय करणे शक्य नव्हते, फक्त नवी फौज जलदीने पुढे आली असती (तर काही वेगळे होऊ शकले असते) संरक्षक दल उजवीकडे ब-याच जबरदस्तीने सरकले.

मध्यरात्रीपासून ते युध्दाच्या या वेळेपर्यंत शत्रूने हा हल्ला सीताबर्डीवर मोठ्या जोषाने पूर्वेच्या बाजूने चालू ठेवला होता, आणि सकाळी त्यांनी दक्षिणेकडील बाजूलाही एक खेडे ताब्यात घेतले होते, तेथून त्यांनी तिखट गोळीबार सुरू ठेवला. त्याला पहिली बटॅलियन, विसावी व चोविसावी रेजिमेंट यांनी त्वेषाने उत्तर दिले. त्यांनी या टेकडीवर तलवारी घेऊन कब्जा करण्याचा प्रयत्न मात्र केला नाही. त्याचा हल्ला लहान शस्त्रे आणि एक छोटी तोफ यापुरताच मर्यादित होता, व त्याचा उंची व सपाटी यामुळे टेकडीवर थोडासाच परिणाम होत होता. शत्रु आता ब्रिटिश ठाण्याच्या मोठ्या जागी येऊन ठाकल्यामुळे त्याने आपल्या फळत्या नशिबाचा तत्काळ फायदा घेतला. बळकाविलेल्या सामग्रीचा उपयोग त्यांनी सीताबर्डीकडे वळविला आणि परिणामकारकपणे मारा केला. लेफ्टनंट क्लार्क आणि असिस्टंट सर्जन निवेन दोघेही एकाच फटक्यात ठार झाले. दोघांचीही मुंडकी भिरकावली गेली. आणि याच वेळी सोथबी एका तोफेच्या गोळ्याने मर्माघाती जखमी होऊन पडला. इतरांपेक्षा धाडसी असलेल्या तीन-चार अरबांनी ब्रिटिशांपासून सत्तर यार्डांच्या आत आपले निशाण रोवले, आणि बाकीच्यांनी नागपूर संरक्षक दलाच्या रांगा आणि छावणी, तसेच अरब आणि छोटी टेकडी, यामधील जागा बळकावली.

पायदळाच्या यशाने शत्रूच्या घोडेस्वारांची सर्व पलटण हर्षोत्फुल्ल झाली आणि तिने पश्चिमेकडून सीताबर्डीच्या बाजूला धडक मारली. त्याच वेळी कर्तबगारीच्या शिखरावर नेणारे अवसान येऊन उत्साहाने कॅप्टन फिट्झेराल्ड याने त्यांच्यावर घोडेस्वारांच्या पलटणीचा हल्ला चढविला आणि लेफ्टनंट हिअरसे याने अर्ध्या तुकडीसह त्यांच्या दोन तोफांवर धाव घेतली. दोन्ही हल्ल्यांना यश मिळाले. लेफ्टनंट हिअरसे याने हस्तगत केलेल्या तोफा परिणामकारकपणे शत्रूच्या घोडदळाकडे वळविल्या. त्यांना कॅप्टन फिट्झेराल्ड येऊन मिळाल्यामुळे दोघेही विजयचिन्हे घेऊन रेसिडेन्सीकडे परतले. [“कॅप्टन फिट्झेराल्डने योग्य वेळेवर केलेला हल्ला या मोहिमेत मिळविलेल्या अनेक प्रकाशमान पराक्रमांमध्ये उठून दिसतो. अप्पासाहेबाना जर ही ब्रिगेड तोडण्यात यश मिळाले असते तर नेपाळसह सर्व भारतात त्याचा जनमतावर प्रभाव पडला असता. पण ते सोडले तरी आजच्या दिवशी यशाच्या भरतीला वळण देणे आणि परिणामी नागपूर प्रांताच्या अंतर्गत आमच्या हितसंबंधाची सोडवणूक करण्यात मुख्यतः योगदान करणे सामान्यतः मान्य झाले.” —प्रिन्सेपकृत भारतातील राजकीय आणि लष्करी व्यवहाराचे कथन, पृष्ठ २५९.]

सीताबर्डी टेकडीवरील पायदळाने हा झगझगीत विक्रम पाहिला. घोडदळाचे अनुकरण करून त्यांनी अरबांवर जळजळीत गोळीबार सुरू केला, व संरक्षक दलाच्या फळीने उभारलेल्या आश्रयाच्या आड जाणे त्यांना भाग पाडले. त्याच वेळी छोट्या टेकडीवरील तोफेची बैठक उडाली. ब्रिटिशांच्या दृष्टीने यापेक्षा अधिक दैवी अनुकूलता कोणतीच नव्हती. संरक्षक दल, आणि बहुधा चोविसाव्या व विसाव्या रेजिमेंटची तितकीच माणसे हल्ल्यासाठी पुढे धावली. त्यांना चारशे यार्डांचे अंतर चालून जावयाचे असल्याने, ते ज्या सुटसुटीत क्रमाने निघाले तो जास्त काळ टिकविता आला नाही व त्या समूहाचे एका छोट्या आघाडीच्या विस्कळीत रांगेत रूपांतर झाले. थोड्या पावलांवरच ब्रिटिश चढून येईतोपर्यंत अरबांनी टेकडीच्या माथ्यावर आपले झेंडे रोवले. इकडे कॅप्टन लॉइडला उजव्या खांद्यावर गोळी लागली, आणि चोवीसाव्या रेजिमेंटचे लेफ्टनंट ग्रँट मारले गेले. सुदैवाने लॉइड अगदीच कामातून गेला नाही. (बरोबरीची) माणसे मोठ्या उत्साहात असल्याने ते वेगाने बांधकामापर्यंत

पोचले. दारूगोळ्याची पिपे उडवून आणि शत्रूवर हल्ला करून, त्यांनी एकंदर झुंजीत अतिशय सतावून सोडणा-या (अरबांना) गावातून बाहेर काढीत झुंजीचा शेवट करण्याचा निश्चय केला. चोविसाव्या रेजिमेंटचा कॅप्टन डब्लू स्टोन यानेही असाच निश्चय केला होता, कारण दोघांनीही एकाच वेळी टेकडीच्या चढणीवरील शत्रूच्या दोन पितळी तोफा ओलांडून गावात बरोबरच प्रवेश केला, हा जोरदार हल्ला अरब सहन करू शकले नाहीत. ते सर्व दिशांना पळाले. गावातील एक गल्ली पार करताना कॅप्टन लॉइडच्या शरीरात एक गोळी घुसली. (परंतु) शिपायांनी आपले काम आखल्याप्रमाणे चालू ठेवले आणि थोड्याच वेळात संगिनी रोखून शत्रूला आपल्या जागेवरून हाकलले. ही गोष्ट इथेच संपली नाही. चोविसाव्या रेजिमेंटची एक छोटी तुकडी घेऊन कॅप्टन स्टोन सीताबर्डीकडे परत वळला, आणि विसाव्या रेजिमेंटच्या लेफ्टनंट रिचीच्या हाताखालील शिपायांच्या दुस-या पार्टीला मिळून, रिचीबरोबर असलेल्या सर्जन जे. गार्डनसह दोन अवजड पितळी तोफा हस्तगत करून त्या रोखल्या. आता कॅप्टन लॉइड थकला होता. जास्त वेळ त्याच्याने काम करवेना, तेव्हा तो साहाय्यासाठी उजव्या बाजूस माघारी वळला. त्याच वेळी शिपाई हस्तगत केलेल्या दोन पितळी तोफा सुरक्षित जागी ओढून नेत होते.

या हालचालींमुळे छोटी टेकडी आणि समोरील खेडे यातून जवळजवळ पूर्णपणे सैन्य काढले गेले होते, हे लक्षात येताच एकत्र येऊन अरब झोपड्या पुनः ताब्यात घेऊ लागले. यावेळी संरक्षक दलाचे कॅप्टन मॉक्सन त्या जागेवर अधिकारी होता, त्याने उपाययोजना इतकी चांगली केली की अरब आपल्या आडपडद्याच्या बाहेर येण्याचे धाडस करू धजत ना. खंबीरपणे पूर्ववत् होण्याला वेळ मिळायच्या आतच कॉर्नेट स्मिथ घोडदळाची एक तुकडी घेऊन आला, आणि त्याने गावातून हल्ला केला, शत्रूच्या वीस ते तीस जणांवर पिस्तुले रोखली व त्यांना आला बालेकिल्ला पूर्णपणे सोडण्यास भाग पाडले.

आता दुपार झाली होती. अरबांची सर्व केंद्रांवर पूर्णपणे हार झाली होती. घोडदळ टेकड्यांपासून योग्य अंतरावर विसाव्यासाठी मागे सरले होते. त्यांच्या तोफखान्याचा गोळाबार मंदावला, व तो अडीच-तीन वाजेपर्यंत पूर्णपणे थांबला.

अशा रीतीने भारतात पुष्कळ वर्षे लढल्या गेलेल्या आणि परिणामी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या युद्धांपैकी सीताबर्डीची लढाई संपली.

कमांडिंग ऑफिसरने २९ नोव्हेंबर १८१७ ला काढलेल्या आदेशात गफलतीमुळे/नजरचुकीमुळे नागपूर संरक्षक दलाच्या सेवेचा उल्लेख राहून गेला. तसेच तो सर टी. हिस्लॉप यांना पाठविलेल्या युद्धाच्या अहवालातही गळून गेला. सेनाप्रमुखाचे आभारप्रदर्शन या अहवालावर व तत्पूर्वी युद्धात अधिकारी असलेल्या व्यक्तीच्या आदेशांवर आधारलेले असते, म्हणून सर टी. हिस्लॉप आपल्या १४ डिसेंबर १८१७ च्या आदेशात संरक्षक दलाचा उल्लेख करीत नाहीत.

[हे खरे आहे की, काही काळ छोटी टेकडी त्यांच्या हातून गेली; परंतु तोफखान्याची माणसे, मार्गदर्शक, आणि विसाव्या रेजिमेंटची एक तुकडी, संरक्षक दलाचे राखीव बनलेले दोन छोटे विभाग, आणि कदाचित बांधकामाच्या मध्यभागातील व पिछाडीकडील दहा-बारा अधिकचे लोक यांनी संरक्षक दलाच्या बहुसंख्य गोटाच्या अगोदर ती (टेकडी) सोडून दिली होती. याउलट केवळ टेकडी आणि दोन तोफा एवढेच नव्हे तर समोरील खेडे पुनः प्राप्त करण्यात, आणि शत्रु जवळ येऊन भिडल्यावर कॅप्टन मॉक्सन्च्या आदेशाखाली हे महत्त्वाचे ठाणे टिकवून धरण्यात संरक्षक दलाने अतिशय उठावदारपणे भाग घेतला. २६ तारखेला सकाळी ७ पासून तो मध्यरात्रीपर्यंत मोठ्या टेकडीच्या उजव्या हाताला या तुकडीचा मोठा भाग कामात व्यस्त होता. हेही विसरता कामा नये की, संरक्षक दलाने रात्री दोनपासून २७ तारखेच्या (सकाळच्या) दहापर्यंत ठाण्याच्या मुख्य भागाचे रक्षण केले, आणि त्यांच्याजवळील तोफांपेक्षा एक सहा-पौंडी अधिक घेऊन एका बटॅलियनने त्यांच्या पूर्वी तेच काम केलेले होते, व तेही अंधारात, की ज्यावेळी त्यांनी (= संरक्षक दलाने) दुहेरी गैरसोयीखाली कित्येक तास परिश्रम केलेले होते; दिवसाला लढायचे आणि तेही त्या केंद्राचे ज्यांनी संरक्षण केले त्या पहिल्या तुकड्यांना काढून लावल्याबद्दल फुगून गेलेल्या शत्रूबरोबर. कोणतीही संधि न सोडण्याच्या तयारीत असलेल्या दहा हजार घोडदळाचे दृश्य म्हणजे एक भीतिदायक देखावाच. शिवाय संरक्षक दल

थोडेसेच बांधकाम असलेल्या एका छोट्या जागेत कोंडले गेले होते, ती जागा तोफेपासून सुरक्षित नव्हती, आणि तेथून त्यांना सरळ रेषेत आग ओतताही येत नव्हती.]

[हा अहवाल पुढीलप्रमाणे—

"महाराज, माननीय प्रमुख सेनानी यांना २६ तारखेची माहिती कळविण्याचा मान मला मिळाला आहे. माहिती अशी की, माझ्या आदेशाखाली असलेल्या सैन्याच्या तुकड्यांनी एक दिवस अगोदर रेसिडेंट साहेबांच्या विनंतीवरून छावण्या सोडल्या होत्या. रेसिडेन्सी आणि नागपूर शहर दोन्ही ज्यावरून दिसते अशा सीताबर्डीच्या टेकडीवर त्यांनी आपले स्थान ग्रहण केले, आणि त्याच वेळी चोविसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या तुकडीच्या साहाय्याने आपल्या स्थानाच्या डावीकडे असलेल्या ३०० यार्डांवरील एका टेकडीचा ताबा घेतला. सीताबर्डीचा ताबा टिकवून धरण्यासाठी या टेकडीचा अत्यंत उपयोग होणार होता. २६ तारखेला मला आवश्यक वाटलेली सर्व व्यवस्था केल्यावर, त्या दिवशी संध्याकाळी ६ वाजता नेहमीच्या स्वरूपाची फक्त लष्करी दक्षतेची बाब असल्याचे अगोदर कळविले असताही, आणि त्यासाठी त्यांनी संमति दिलेली असतानाही, व त्यांना त्रास देण्याचा माझा उद्देश नसतानाही, खेड्यातल्या अरबांनी, कॅप्टन बेलेबरोबर टेकडीच्या माथ्यावर ठेवलेले तसेच टेकडीच्या पायथ्याशी अरबांच्या खेड्यासमोरील रक्षक, त्या खेड्यात आम्हाला दिवसभरात दिसले. त्या ठिकाणी अगोदरच ठेवलेल्या राजांच्या पायदळाच्या एका तुकडीला साहाय्य देण्यासाठी तेथे पाच तोफांसह पाठविण्यात येणारे अरबांचे मोठाले समूह आम्हाला दिसले असताना, खेड्यातील अरबांनी त्या छोट्या टेकडीवर गोळीबार चालू केला. युद्धाला आरंभ करण्याचा त्यांचा निश्चय आणि माझ्या बरोबरच्या छोट्या तुकडीने दाखविलेली आत्यंतिक सहनशीलता पाहिल्यावर, हा वेळपावेतो त्यांनी एकही गोळी झाडलेली नसल्यामुळे, मी त्यांना गोळीबार करण्याचा आदेश दिला व खेड्यात ठेवलेल्या सर्व तुकड्यांच्या अग्निवर्षाखाली टेकडीच्या वरपर्यंत माघार घेतली. लगेच झटापट दोनही बाजूनी चालू झाली, ती अप्रतिबद्धपणे दुस-या दिवशी बारा वाजता थांबेपर्यंत चालूच राहिली. त्यांचे बरेच नुकसान आणि श्रम यांच्या परिणामी चोविसाव्या रेजिमेंटची पहिली बटॅलियन, आणि त्याबरोबर असलेली

विसाव्या रेजिमेंटची पहिली बटॅलियन या महिन्याच्या २७ तारखेच्या रात्री सकाळच्या पाच वाजता त्यांना साहाय्य करीत होती. या तुकड्यांना मागे घेणे आणि धान्याच्या पोत्यांसाठी एक बांधकाम रातोरात पक्के केले होते त्या टेकडीवरील डाव्या बाजूस संरक्षणकार्य प्रथम शिखराचा ताबा घेण्यावर मर्यादित करणे आवश्यक वाटल्यावरून त्यासाठी मी कॅप्टन लॉइड, त्याच्या बरोबरच्या रेसिडेंटच्या संरक्षक दलाची शंभर माणसे, एका युरोपियन अधिका-याच्या हाताखाली स्थानिक पायदळ, आणि विसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॅलियनपैकी पन्नास माणसे वेगळी केली होती. कॅप्टन लॉइडने त्याच्या माणसांना आपले कर्तव्य बजावण्यास व ठाणे आपल्याकडे ठेवण्यास प्रयत्न करिताना आत्यंतिक शौर्य दाखविल्यावर, टेकडीच्या समोरून वरपर्यंत दडपून टाकण्याइतक्या सैन्याने हल्ला करून सकाळी आठ वाजता अरबांच्या एका समूहाने ठाण्यावर कबजा मिळविला. या वेळी कॅप्टन फिट्झ्गेराल्डला एका स्थानिक अधिका-याची व मद्रासच्या अंगरक्षक दलाच्या २५ बारगिरांची कुमक मिळाली. त्याने शत्रूच्या उत्तम घोडदळाच्या प्रचंड समूहावर हल्ला चढविला, त्यांच्या बंदुका पकडून लगेच त्या त्यांच्यावर उलटविल्या, आणि त्याला मैदानाचा ताबा मिळाला. सर्व दिशांनी शत्रू त्या मैदानाबाहेर पळून जात होता. शत्रूच्या बंदुकांना प्रतिकार करण्यासाठी मी कॅप्टन फिट्झगेराल्डला स्पाइक्स पाठविता याव्यात अशी वाट पाहत होतो. अरबांच्या ताब्यातील टेकडीवर पायदळाच्या हल्ल्यासाठी साहाय्यास त्याला बोलाविण्याचा माझा विचार होता. (तेवढ्यात) त्यांच्यात एक स्फोट झालेला दिसला, आणि सर्व तुकड्या एकदमच हल्ल्याच्या बाजूला धावल्या. अत्यंत कठिण होते तरी त्यांना घोडदळाकडे लक्ष देण्यास आग्रह केला. आम्ही ज्या टेकडीवर होतो ती सोडावी लागू नये यासाठी मला आत्यंतिक परिश्रम करणे आवश्यक आहे असे आढळून आले. आमच्या तुकड्या जवळ येताच अरब आपल्या दोन तोफा तेथेच टाकून पळून गेले. मॉक्सन् आणि जे. मॅक्डोनाल्ड हे दोन कॅप्टन, आणि वॅट्सन्, डब्लू मॅक्डोनाल्ड व कँपबेल् हे तिघे लेफ्टनंट यांच्या साहाय्याने कॅप्टन लॉइड्ने टेकडीचा ताबा घेतला. लेफ्टनंट व अ‍ॅड्जूटंट ग्रँट चोविसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या तुकडीत असलेला, टेकडीच्या संरक्षणात रात्री दोनदा जखमी झाला होता, तो येथेच मेला. माझी स्तुति सुमनांजलि

मी त्याला वाहतो, व एका अतिशय शूर अधिका-याच्या हानीबद्दल खेद व्यक्त करतो. त्यानंतर लौकरच ब-याच संख्येमध्ये अरब टेकडीच्या समोर जमू लागले. त्या वेळेपर्यंत पकडलेल्या बंदुकांसहित घोडदळ रेसिडेन्सीकडे परतले होते. कॉर्नेट स्मिथच्या नेतृत्वाखाली घोडदळाच्या एका तुकडीने टेकडीच्या पायथ्याच्या भोवताली हल्ला केला, त्यात त्याने अनेकांना कापून काढले. याचा परिणाम इतक्या पूर्णपणे त्यांची हिंमत/मनोधैर्य खचण्यात झाला की त्यानंतर सर्व दिशांचे त्यांचे हल्ले कमजोर होऊ लागले आणि बारा वाजता पूर्णपणे थांबले.

या प्रसंगी सैन्याने दाखविलेल्या वर्तनाबद्दल मी माझी कौतुकाची भावना पुरेशी कधीच व्यक्त करू शकणार नाही. सेकंड-इन-कमांड मेजर मॅकेन्झी आणि त्या ठिकाणी काम करणारे सर्व अधिकारी व इतर लोक यांना मी धन्यवाद देतो. त्या प्रसंगी मी दिलेल्या आदेशातून ही भावना मंदपणे प्रकट झाली आहे. या पत्राची एक प्रत व रेसिडेंट जेन्किन्स यांच्याही पत्राची एक प्रत सोबत जोडिली आहे. जेन्किन्स युद्धाचा सर्व काळ उपस्थित होते आणि त्यांच्या प्रोत्साहक वर्तनाने पुष्कळच प्रमाणात सैनिकांना आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी चेतना देण्यास उपयोग झाला. त्याचा मुख्य सहकारी व एक शूर सद्‌गृहस्थ श्री. सोथ्बी यांच्या निधनाबद्दल मला खेद वाटतो. आरंभापासून तेही उपस्थित होते. प्रत्येक परिस्थितीत त्यांनी स्वतःला धोक्यात घातले, युद्धाच्या शेवटी-शेवटी गंभीरपणे जखमी झाले, आणि त्या दिवशी पुढे मरण पावले.

उद्याच्या टपालापर्यंत मी मृतांची व जखमींची नियमित संख्या कळवीन. मला सांगावयास वाईट वाटते की ती बरीच मोठी आहे. चौदा अधिकारी व ३३३ मृत आणि जखमी सर्व थरातील आहेत.

**एच्. एस्. स्कॉट,**
लेफ्टनंट कर्नल,
नागपूर अधिकारी.

मुक्काम नागपूर,
३० नोव्हेंबर १८१७.

**ताजा कलम.—** मी मिळवू शकलेल्या खात्रीलायक माहितीप्रमाणे, आणि माझ्या निरीक्षणानुसार शत्रूने ३५ पेक्षा अधिक तोफा आमच्यावर रोखल्या. त्यांच्या घोडदळाची संख्या १२,००० पर्यंत जाते असे म्हणतात. तसेच त्यांचे पायदळ ८,००० असावे, त्यापैकी ३,५०० अरब आहेत, व त्यांच्यापासूनच आम्हाला मोठे नुकसान सोसावे लागले.

**रिचर्ड टेलर,**
ब्रिगेड-मेजर

या गफलतीमुळे योग्य अधिका-यांकडे एक निवेदन जाणे भाग पडले, आणि लेफ्टनंट कर्नल कॉन्वे यांच्याकडून एक पत्र व-हाडच्या दरबारी ब्रिटिश रेसिडेंटकडे २० फेब्रुवारी १८१८ तारखेस गेले, त्यात नागपूर संरक्षक दलाबद्दल हिज एक्सलन्सी कमांडर-इन-चीफ यांनी आभार कळविले. परंतु हे पत्र उशीरा आले, सैन्याला ते कळविले गेले नाही, आणि संरक्षक दलाला ते संतुष्ट करणारे असले तरी त्या सैनिकांच्या तुकडीचे कार्य गुणप्रदर्शक असूनही त्यावर जनतेचे लक्ष खिळवून ठेवू शकले नाही.

[लेफ्टनंट कर्नल कॉन्वे, सैन्याचे ॲड्जूटंट जनरल, यांनी २० फेब्रुवारी १८१८ रोजी श्री. जेन्किंस् यांना पाठविलेल्या पत्रातील उतारा—

हिज एक्सलन्सी सेनाप्रमुख (कमांडर-इन्-चीफ) यांनी मला आणखीही त्यांना वाटलेल्या भावना कळविण्यास आदेश दिला आहे. नागपूर संरक्षक दल आणि राजांची नेहमीची बटॅलियन यांनी २६ व २७ नोव्हेंबर या स्मरणीय दिवसाच्या मानात आणि वैभवात अतिशय समरसून भाग घेतला. हिज एक्सलन्सींची अशी इच्छा आहे की आपण त्यांच्या या भावना त्यांना कळवून, आपल्या पात्रतेने त्यांची (= सेना प्रमुखांची) पसंती व प्रशंसा त्यांना मिळाल्याचे आश्वासन देण्याची व्यवस्था करावी.]

[२४ व्या रेजिमेंटच्या पहिल्या धाडसी बटॅलियनची प्राणहानि १४९ मृत व जखमी इतकी झाली; परंतु नागपूरच्या संरक्षक दलात फक्त १२४ जण असताही ४३ मृत व जखमी असे नुकसान झाले, व ते प्रत्येक पलटणीच्या बलाच्या प्रमाणात अधिक होते.]

१८२० मध्ये नागपूर संरक्षक दल बरखास्त करण्यात आले, परंतु शासनाने कॅप्टन लॉइड् यांना वकिलातीशी संबद्ध राहण्यास अनुमति दिली. या संरक्षक दलाने बजाविलेल्या लष्करी सेवेचे स्वरूप आणि महत्त्व ब्रिटिश रेसिडेंट (श्री. जेन्किंस्) यानी व-हाडच्या दरबारात कॅप्टन लॉइड् याना लिहिलेल्या पुढील पत्रावरून दिसून येते.—

"महोदय, सरकारी आदेशानुसार बरखास्तीसाठी हुशंगाबाद येथे नागपूरचे संरक्षक दल पाठविण्याच्या प्रसंगी, माझे व्यक्तिगत संरक्षक म्हणून इतका अधिक काळ माझ्याजवळ असलेल्या चिरपरिचयाच्या आणि स्वभावाच्या बंधनानी, तसेच आपल्या सद्‌वर्तनाने व आरक्षकत्वाच्या शिस्तीने, मला सतत समाधान मिळवून देणा-या, ज्या लोकांनी सार्वजनिक आणि व्यक्तिगत अशा दोन्ही दृष्टीनी माझ्याकडून आदरभावना हक्काने प्राप्त केली आहे, त्यांना निरोप देताना मला वाटणारा खेद व्यक्त न करणे मला अशक्य झाले आहे. विदेशातील दरबारातून सरकारी अधिका-याला शरीरसंरक्षक म्हणून सामान्यतः अपेक्षित असलेल्या कर्तव्यांची अंमलबजावणी हे काही फक्त नागपूरच्याच संरक्षक दलाच्या वाट्याला आलेले नाही. देशाच्या अस्वस्थ स्थितीमुळे नागपूरला आल्यापासूनच्या पंधरा वर्षांपैकी दहा वर्षांच्या अवधीत त्यांना सावधतेचे आणि ठामपणाचे प्रसंग लष्करी संस्था म्हणून सतत येत गेले, आणि बहुधा नेहमीच युद्धकाळी युद्धातील सैनिकांच्या वाट्याला येणारी म्हणून सामान्यतः समजली जाणारी, अधिक जेरीस आणणारी कार्ये पार पाडण्याचे प्रसंगही नेहमीचे झाले होते. या सर्व काळात थकवा आणणारी कामे त्यांनी ज्या आनंदाने स्वीकारली, व प्रसंगी अधिक लष्करी सेवेची आवश्यकता पडली असता त्यांनी जे धैर्य व शौर्य दाखविले ते मला निखालसपणे स्तुत्य वाटलेले आहे. नंतरच्या युद्धाअगोदर इतका दीर्घ काळ त्यांचे गुण असे असल्याने, सीताबर्डीच्या संस्मरणीय लढाईतील त्यांचे शौर्य आणि निष्ठा याविषयीच्या माझ्या उच्च भावना कोणतेही शब्द पूर्णपणे व्यक्त करू शकत नाहीत. त्या प्रसंगी सर्वोच्च लष्करी अधिका-यांनी स्तुतीचे शब्द उच्चारल्यावर त्या वेळी आपण विशेष धाडसाने जे उत्तम उदाहरण त्यांच्यापुढे ठेविले त्याबद्दल आपणाविषयी किंवा त्यांच्याविषयी मी कितीही स्तुति केली तरी ती पुरी पडणार नाही. म्हणून नागपूर संरक्षक दलाच्या ज्या व्यक्ति अधिक

व्यापक सेवेचा मार्ग स्वीकारतील त्यांना भविष्यकाळी समृद्धि व कीर्ति लाभो, आणि जे निवृत्त होतील त्यांना स्वस्थता व सुख लाभो, अशा हार्दिक सदिच्छा देणे एवढेच मी करतो. या पत्रात समाविष्ट असलेल्या सामान्य भावना आणि सदिच्छा सैनिकांना कळविण्याची विनंती करीत असतानाच मी इतका सर्व दीर्घकाळ आपण त्यांचेवर ताबा ठेवलात या आपल्या कार्याविषयी मी माझे उत्तम समाधान व्यक्त करण्याची परवानगी घेतो, आणि कॅप्टन मॉक्सन बाजूला झाल्यावर केलेल्या सेवेबद्दल लेफ्टनंट स्मिथ यांनाही धन्यवाद देतो.

(सही)

नागपूर,
१७ ऑगस्ट १८२०.

**आर्. जेन्किंस्,**
रेसिडेंट.

[“पुण्याप्रमाणेच नागपूर येथेही गव्हर्नर-जनरलचे सर्व लक्ष पेंढा-यांशी मुकाबला करण्यात गुंतलेले आहे असे पाहून ब्रिटिश रेसिडेन्सीवर अचानक हल्ला करण्यात आलेला होता. रेसिडेंट श्री. जेन्किंस् यांनी तितक्याच कडवेपणाने उलट प्रतिकार यशस्वीरीत्या केला, लष्करी गुणवत्तेबरोबरच राजनैतिक नैपुण्याची आनंददायक जोड दिल्याचे आणखी एक उदाहरण जेन्किंसने घालून दिले. त्यांचे धैर्य आणि निष्ठा त्यांनी पूर्वी मराठा युद्धानंतर शिंदे दरबारी रेसिडेंटच्या पदावर असताना अत्यंत कठिण परिस्थितीत व्यक्त केली होती. लेफ्टनंट कर्नल स्कॉटच्या नेतृत्वाखाली नागपूरला असलेल्या थोड्या पलटणीनी शत्रूची संख्या अधिक असताना त्याविरुद्ध धैर्याने तोंड दिले. हल्ल्याची अगोदर कल्पना असती तरी देखील शत्रु ब्रिटिश सैन्याला घेरून जेरीस आणण्याला पुरेसा होता. या प्रसंगी दिसलेली वैयक्तिक शौर्याची उदाहरणे यथायोग्य रीत्या लष्कराच्या वृत्तांतात नोंदली गेली आहेत.”

—४ मार्च १८१९ रोजी कॉमन्स सभेत कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष श्री. कॅनिंग यांनी दिलेले भाषण.]

## लष्करी कालपटाच्या तिस-या खंडातील उतारा

पृष्ठे ४५४-४५९

लंडन गॅझेटच्या मंगळवार, १४ जुलै १८१८ ची पुरवणी

हिंदुस्थान बोर्ड, १३ जुलै १८१८

लेफ्टनंट जनरल सर थॉमस हिस्लॉप यांच्या दक्षिणेकडील सैन्याच्या मुख्य शिबिराच्या पानबहार मुक्कामाहून ओगीन पासून उत्तरेस सात मैलावरून १९ डिसेंबर १८१७ रोजी गव्हर्नर-जनरल व कमांडर-इन-चीफ याना पाठविलेल्या पत्रातून उतारा.

महाराजांपुढे नागपूरला झालेल्या अत्यंत तडफदार युद्धाची हकिगत सविस्तर ठेवण्यास आता मला विशेष आनंद होत आहे. राजधानीस असलेल्या ब्रिटिश हितसंबंध अतूट धैर्याने व चिकाटीने मद्रासला असलेले लेफ्टनंट कर्नल एच्. एस्. स्कॉट यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या सैन्याच्या पाचव्या तुकडीपैकी एका लहानशा भागाने उदात्तपणे राखले.

या अत्यंत समाधानाच्या प्रसंगी सैन्याला दिलेला सर्वसामान्य आदेश नियुक्त केलेल्या सैन्याचे कौतुकास्पद वर्तनाविषयीची माझी भावना आपणाला दाखवून देईल. शत्रूची बरीच मोठी संख्या आणि त्याचा तोफखाना याविषयी, किंवा नागपूरच्या सैन्याला परतवून लावीपर्यंत आमच्या शूर शिपायांनी लढाईत घालविलेला वेळ या विषयी माझी कल्पना वास्तविक कशीही असली तरी २६ व २७ नोव्हेंबरच्या झोंबी भारतविषयक वार्षिक अहवालात उज्ज्वलतम पृष्ठ म्हणून नोंद करण्यालायक आहेत, आणि ही कामगिरी यशस्वी करणारे शूर सैन्य सरकारच्या अत्यंत हार्दिक कृतज्ञतेस व कौतुकास पात्र आहे असे आपण मानाल, याबद्दल मला खात्री वाटते. अशा प्रसंगी आपल्या परिस्थितीच्या योगे ज्यांनी विशेष कर्तबगारी दाखविण्याची संधी मिळविली अशा अधिका-यांची नावे घ्यावयाची म्हटले तर त्याला अंत नसतो. आपल्या शिपायांनी केलेल्या प्रयत्नांना मिळणारे यश हेच, त्यांचा सेनापति लेफ्टनंट कर्नल स्कॉट यांच्या धारिष्टाविषयी व वर्तनाविषयी स्तुतीचे शब्द कितीही निरवशेष असले तरी, त्यापेक्षा जास्त, पुरावा

देणारे असते. तसेच मद्रासच्या स्थानिक पायदळापैकी विसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॉलियनचे मेजर मॅकेंझी यांचेही तडफदार प्रयत्न माझ्याकडून उत्तम आभार व स्तुति मिळविण्याच्या पात्रतेचे आहेत. याखेरीज बंगालच्या घोडदळापैकी सहाव्या रेजिमेंटच्या तीन ट्रूप्स्नी फिट्झेराल्डच्या नेतृत्वाने ज्या बेदरकारपणे व चातुर्याने, पराभूत झालेल्या शत्रूच्या घोडदळाच्या ब-याच मोठ्या संख्येवर हल्ला चढवून त्या दिवशीच्या परिणामाच्या दृष्टीने अत्यंत मोक्याच्या अशा क्षणी त्यांच्याच तोफा त्यांच्यावर उलटविल्या, हे आपल्या नजरेस विशेषेकरून आणल्याशिवाय मला समाधान व त्या अधिका-यांना न्याय मिळणार नाही.

मृत व जखमी यांच्या संख्येवरून आपल्या लक्षात येईल की आपले फार नुकसान झालेले आहे. आपल्या देशासाठी सन्मानाने धारातीर्थी पडलेल्या कित्येक शूर अधिका-यांच्या वीरगती बद्दल मी खेद व्यक्त करितो.

या ठिकाणी मला महाराजांजवळ माझे निश्चित मत सांगितल्याशिवाय राहावत नाही. ते हे की केवळ धैर्यच नव्हे तर निष्ठादेखील कडक परीक्षणाखाली आणि सध्याच्या प्रसंगापेक्षा स्थानिक सैन्याने अधिक उज्ज्वल यश दाखविले असे एकही उदाहरण नाही. आपल्या फळीला त्याच गोळीबाराच्या खाली दबावे लागण्याचा प्रसंग असतानाच आपली बायका-मुले देखील तेथेच संकटाला उघडी पडत असलेली पाहावे लागत होते, अशा वेळी या धाडसी जवानांना आपले स्थान कायम राखण्यास साहाय्य व्हावे यासाठी या दोनही गुणांचा असाधारण वापर करण्याची खरोखर जरूरी होती. अशी परीक्षा सर्वसाधारण शिपायांच्या नशिबी येणा-या अपयशापेक्षाही अधिक कसोटीची होती, आणि तेच नागपूर येथे उदात्तपणे तोंड देऊन दृढ केले गेले.

या संस्मरणीय कामगिरीचा पूर्ण विचार करिताना मला असे वाटते की ज्या सरकारची त्यानी एवढी उत्तम सेवा केली त्या सरकारकडून त्या मद्रास पायदळाच्या विसाव्या आणि चोविसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या तुकडीला त्यांच्या शौर्याच्या कृत्यांबद्दल एखादे लक्षात राहण्यासारखे (उठावदार) व टिकाऊ स्मारकचिन्ह मिळेल अशी आशा व्यक्त करण्याचे राहिले तर माझ्या कर्तव्यात उणीव राहील. बंगालच्या घोडदळाच्या तुकडीचाही यासारख्याच सन्मानावर असलेला हक्कही आपल्या नजरेतून सुटणार नाही याविषयी मला खात्री आहे.

## दक्खन सैन्याचे मुख्यालय, मुकाम गुनी, १४ डिसेंबर १८१७

सरसेनापतींना, ज्यास आदेश देण्याचा मान मिळाला आहे अशा एका प्रसिद्ध सैन्य विभागाच्या कौतुकास्पद वर्तनाचे आणखी एक उदाहरण सैन्यासाठी प्रकाशित करण्याचे आनंददायक कर्तव्य आता सेनापतीस करावयाचे आहे.

नागपूरला असलेल्या पाचव्या विभागाच्या तुकडीवरील अधिकारी लेफ्टनंट कर्नल एच एस स्कॉट यांच्याकडून हिज एक्सलन्सीना अधिकृत अहवाल मिळाला आहे की, राजधानीच्या त्या शहरी ब्रिटिश तुकड्या व हिज हायनेस व-हाडचे राजे यांच्याकडील सर्व सैन्य यामध्ये मागील महिन्याच्या २६ व २७ या तारखांस निर्णायक व अत्यंत तेजस्वी चकमक झाली.

ज्यांच्याबरोबर आमचे अगोदर लेफ्टनंट कर्नल स्कॉट यांच्या आज्ञेखाली असलेल्या तुकडीत एकंदर लहान-मोठे सैनिक १,३५० पेक्षा अधिक नव्हते. एवढा लहान व शूर समूह असतानाही मित्रत्वाच्या सलोख्याचे संबंध होते अशा एका प्रमुखाने विश्वासघाती हल्ला करण्या अगोदर अठरा तास सतत चाललेल्या युद्धात ज्या प्रमाणात चिकाटी, निश्चयाचे धैर्य, व अजिंक्य शौर्य कायम राखण्यात आले त्याला कोणत्याही प्रसंगी (इतिहासात) तोड नाही.

लेफ्टनंट कर्नल स्कॉट, त्यांचे अधिकारी आणि त्यांच्या तुकडीचे शिपाई यांच्या या संस्मरणीय प्रसंगीच्या उत्कृष्ट वर्तनाबद्दल आपली अत्यंत कृतज्ञतादर्शक निःशंक स्तुती आणि कौतुक व्यक्त करण्याचे कर्तव्य करितांना सेनापतींना विशेष समाधान होत आहे. यापेक्षा अधिक चांगल्या रीतीने मिळविलेली व अधिक समर्थन करण्यासारखे गुण असलेली स्तुती करण्याचा प्रसंग कधीही आलेला नाही असे सत्यतापूर्ण विधान हिज एक्सलन्सी करतीलही.

मद्रासच्या स्थानिक पायदळापैकी विसाव्या आणि चोविसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॉलियनची मिळून झालेली पायदळाची छोटी ब्रिगेड इस्पितळात आजारींच्या मोठ्या संख्येने कमी झाली (असली तरी) तिने वीरतापूर्ण चिकाटीने व निष्ठापूर्ण धैर्याने ज्येष्ठांच्या स्तुतीस व सैनिक बंधूच्या कौतुकास मत्सर वाटावा अशा स्थानी सैन्यास नेले आहे.

हल्याचा आघात २४ व्या स्थानिक पायदळाच्या पहिल्या बटॅलियनने सहन केला, तिच्या शौर्याची, उद्योगशीलतेची व स्थिरतेची अत्यंत मनमोकळी स्तुती घोषित करितांना हिज एक्सलन्सीना असाधारण अभिमान आणि समाधान वाटत आहे.

मद्रासच्या अंगरक्षकांच्या एका लहानशा भागाची जोड मिळवून दिलेल्या कॅप्टन फिट्झेराल्डच्या हाताखालील बंगाल घोडदळाच्या सहाव्या रेजिमेंटच्या तीन ट्रूप्सनी मोठ्या स्तुतीवर हक्क स्थापित केला आहे. हल्ल्यासाठी योग्य क्षण निवडण्यात कॅप्टन फिट्झेराल्ड यानी दाखविलेली निर्णयशक्ती व विवेकबुद्धि ही या अधिकाऱ्याच्या व्यावसायिक नैपुण्याची व सामर्थ्याची उच्च दर्जाची स्तुतीच होय. या लहान पण भयावह तुकडीच्या शौर्याने व चिकाटीने तिचे गुण आणि सेवा याना अत्यंत नैपुण्याच्या श्रेणीत नेऊन बसविले आहे. ही निकराची झुंज पायदळाच्या चिवट शौर्याच्या जोरावर अठरा तास चालविली, आणि कॅप्टन फिट्झेराल्डच्या नेतृत्वाने या शूर तुकडीने शिस्त व उद्योग यांच्या बळावर तिचा निर्णय लावला हे सांगण्याची विशेष आवश्यकता नाही.

मद्रासचा तोफखाना व पायोनियर्स यांच्या छोट्या तुकडीचे वर्तन विशेष उठावदार होते. त्यानी आपल्या सैन्याच्या तुकडीच्या उत्तम रीतीने मिळविलेल्या धैर्य व शिस्त याबद्दलच्या कीर्तीच्या आणखी एका उदाहरणाची भर घातली आहे.

या युद्धातील महत्त्वाचे निकाल त्यात गुंतलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याची आणि शिपायाची जोरदार स्तुती करीत आहे; आणि सेनापतींना तर असे वाटते की त्यांच्या कृतज्ञतापूर्ण स्तुतीवर सर्वांचा सारखाच हक्क आहे. परंतु युद्धातील दैवाचा भाग पुष्कळ वेळा विशेष नैपुण्यावर हक्क सांगण्याची संधी देत असतो. हिज एक्सलन्सी पुढील अधिकाऱ्यांची नावे उल्लेखिणे अवश्य कर्तव्य मानतात. अत्यंत उदात्त कोटीतील उत्साहाने या कष्टमय संघर्षात आलेल्या अनुकूल प्रसंगांचा फायदा करून घेण्याचे सद्भाग्य त्यांनी मिळविले आहे.

मेजर जॉन मॅकेन्झी, मद्रासच्या स्थानिक पायदळाच्या विसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॉलियनचे अधिकारी, कॅप्टन लॉइड्, बंगालचे पायदळ, रेसिडेंटच्या सुरक्षा दलाचे अधिकारी, कॅप्टन फिट्झेराल्ड, बंगालच्या सहाव्या घोडदळ तुकडीचे

अधिकारी, कॅप्टन चार्ल्सवर्थ्, मद्रासच्या स्थानिक पायदळ २४ व्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॉलियनचे अधिकारी,

लेफ्टनंट जेन्किन्स्, बंगाल ठाणे, नागपूर बटॉलियनचे अधिकारी, लेफ्टनंट मॅक्स्वेल, मद्रासच्या तोफखाना तुकडीचे अधिकारी, कॉर्नेट् स्मिथ्, बंगाल घोडदळ.

लेफ्टनंट जनरल सर टी हिस्लॉप याना या शूर तुकडीबद्दलच्या आपल्या गुणग्रहणाच्या व आभाराच्या भावना व्यक्त करण्याचे आनंददायक कर्तव्य पार पाडीत असतानाच, या संस्मरणीय प्रसंगी तेजस्वीरीत्या पतन झालेल्यांच्या स्मृतीस योग्य असलेली श्रद्धांजली वाहण्याचे दुःखद कर्तव्यही करावे लागत आहे. मृत व जखमींचे भयानक नुकसान हा गहन पश्चात्तापाचा विषय आहे; परंतु त्या शूर शिपायांनी देशाचा हितार्थ व देशाच्या पराक्रमाची कीर्ती व्हावी यासाठी अत्यंत निष्ठावंतपणे स्वाभिमानपूर्ण युद्धात मरण पत्करले याची आठवण जागृत करण्याने त्यांच्या नातेवाईकांना व मित्राना बरेच सांत्वन मिळेल, आणि त्यांची स्मृती मानाने आणि कृतज्ञ आदराने पुढील पिढीपर्यंत नेली जाईल.

पतन पावलेल्या अधिका-यांची नावे पुढीलप्रमाणे आहेतः कॅप्टन सॅडलर, मद्रासच्या स्थानिक पायदळापैकी २५ व्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॉलियनचे अधिकारी; लेफ्टनंट आणि ॲड्जूटंट ग्रँट, २४ व्या रेजिमेंटची पहिली बटॉलियन; लेफ्टनंट क्लार्क, २० व्या रेजिमेंटची पहिली बटॉलियन; असिस्टंट सर्जन नीवेन स्वतंत्र युद्धामध्ये स्थानिक तुकडीच्या कुटुंबीयांचे दुःख अपरिहार्यपणे जास्त होते. अशी दाट भीती आहे की, उघडे पडल्यामुळे आणि शत्रूच्या भयानक क्रौर्यामुळे पुष्कळ कुटुंबीय नष्ट झाले असावेत. सेनापतीना या करुण घटनेबद्दल तीव्र दुःख होत आहे. ते स्थानिक सैन्याला आश्वासन देत आहेत की, विधवा आणि अनाथ झालेली बालके यांकडे ते ताबडतोब लक्ष देतील व विचार करतील, तसेच ते सरकारच्या उदार संरक्षणासाठी त्यांची प्रभावी शब्दांनी शिफारस करतील. सरकार गुणांचे चीज करण्याकडे आणि आपल्या निष्ठावंत सैनिकांच्या गरजा आणि दुःखे कमी करण्याकडे सतत लक्ष देऊन आहे. निवृत्ती वेतनाचा हक्क असलेल्या व्यक्ती निश्चित करण्यासाठी अनुभवी अधिका-यांची

एखादी समिती लगेच तयार करण्यास लेफ्टनंट कर्नल स्कॉट यांना आनंद वाटेल, आणि ते सैन्याच्या ॲड्जूटंट जनरलकडे समितीचे कार्यवृत्त पाठविण्यास वेळ लावणार नाहीत.

(सही)
**श्री. टी. एच्. एस्. कॉन्वे,**
सैन्याचे ॲड्जूटंट जनरल.

## हिज एक्सलन्सी गव्हर्नर-जनरल यांचे सर्वसाधारण आदेश

नागपूरच्या ब्रिटिश सैन्याकडून नागपूरच्या राजेसाहेबांच्या पुष्कळच प्रमाणात श्रेष्ठ असलेल्या सैन्याला परतवून लावून संपूर्ण पराभव झाल्याचे जाहीर करिताना गव्हर्नर-जनरलना अतीव उत्साह व आनंद अनुभवाला येत आहे. शत्रुत्वाचे अगोदर कोणतेही प्रकटीकरण न करिता, किंवा आमच्या सरकारकडून किंवा सैन्याकडून आगळिकीचे थोडेसेही निमित्त नसताना त्यांच्यावर राजेसाहेबांच्या सैन्याने हल्ला केला होता.

राजेसाहेबांच्या वर्तनाने त्यांच्या दुष्ट बेताच्या निश्चित सूचना मिळाल्यामुळे ब्रिटिश सैन्याच्या तुकडीने २५ नोव्हेंबर रोजी रेसिडेन्सीवर आपल्या जागेचा ताबा घेतला व त्या दिवशी आणि नंतरच्या दिवशी आपले स्थान पक्के करण्याचे कामी त्यांनी स्वतःहास जुंपून घेतले. या तुकडीत मद्रासच्या स्थानिक पायदळापैकी विसाव्या रेजिमेंटची पहिली बटॉलियन व चोवीसाव्याची पहिली अशी एक व स्थानिक घोडदळाच्या सहाव्या रेजिमेंटच्या तीन ट्रूप्स् असून सर्व मिळून बाराशेपेक्षा अधिक लढाऊ शिपाई नव्हते. २६ तारखेच्या सायंकाळी शत्रूने त्यांच्यावर वीस हजार पेक्षा जास्तच गणले जातील इतक्या शिपायांच्या जोरावर हल्ला केला; त्यांनी घोडदळ, पायदळ, आणि तोफखाना यासह अनेक स्थानांवर चाल केली. ही चकमक अठरा तास चालू राहिली, शत्रूचे वारंवार होणारे हे हल्ले आमच्या ट्रूप्सनी अतिशय शौर्याने आणि चिकाटीने लढविले, आणि अत्यंत त्वेषपूर्ण लढतीनंतर त्यांच्या आठ तोफा घेण्यात, ब-याच नुकसानीसह व शत्रूला

पूर्णपणे परतवून लावून पराजित करण्यात यश मिळविले. बंगालच्या सहाव्या स्थानिक घोडदळाचे कॅप्टन फिट्झेराल्ड यांनी तर शत्रूच्या घोडदळाविरूद्ध, त्यांच्या चार तोफा हस्तगत करून आणि त्या त्वरित शत्रूविरूद्ध निश्चितरीत्या आणि परिणामकारकपणे उलटवून, अत्यंत तेजस्वी हल्ला करण्यात कौशल्य दाखविले असे सांगतात. याच सुमारास एका गाड्यावर स्फोट झाल्यामुळे शत्रु गोंधळात पडल्याचे दिसले. हा फायद्याचा क्षण उमदेपणाने (नेमका) पकडला गेला, आमच्या सैन्याने हल्ला केला आणि शत्रूचा पाडाव करून आपल्याबाजूला त्या दिवसाचा निर्णय पूर्णपणे निश्चित होईपर्यंत यशाचा पाठलाग केला. आमच्याकडील हानी मोठी होती, पण तिचे परिमाण तंतोतंत निश्चित झालेले नाही. युद्धानंतर राजानी शत्रुत्व थांबविण्याची विनंती करण्यासाठी वकील पाठविले. परंतु सर्व सैन्य रेसिडेन्सीज जवळून काढून घेतल्याखेरीज त्यांच्याशी बोलण्यास रेसिडेंट श्री. जेंन्किन्स् यांनी नकार दिला, त्याप्रमाणे करण्यात आलेही. निरनिराळ्या दिशांनी नागपूरकडे मदतीसाठी येणारे सैन्य कूच करीत आहे, आणि बरेचसे ब्रिटिश सैन्य त्या ठिकाणी लौकरच एकत्र जमेल.

हिज एक्सलन्सी सेनापती यांना तोफखान्याच्या जागेपासून एक शाही सलामी ठोकण्याविषयी निर्देश देण्यास विनंती करण्यात येत आहे. हिज एक्सलन्सी गव्हर्नर-जनरल-साहेबांच्या आदेशानुसार.

(सही)

**जे. अडॅम्स्,**

गव्हर्नर-जनरलांचे सचिव,

निकोल.

सैन्याचे ॲड्जूटंट-जनरल.

लेफ्टनंट कर्नल स्कॉट वगैरे यांसी,

महोदय,

२६ आणि २७ तारखांना झालेल्या मोठ्या संघर्षपूर्ण आणि परिणामी ब्रिटिशांच्या नावाला गौरवास्पद झालेल्या युद्धानंतर त्या संस्मरणीय दिवशी घडलेल्या घटनांना मी ज्या अतिशय कौतुकाने साक्षीदार झालो ते आपणास व्यक्त करून दाखविले नाही तर त्या माझ्या स्वतःच्या भावनांना आणि मी ज्या पदावर आहे त्या पदालाही न्याय केला नाही असे होईल.

नागपूर राज्याची सर्व लष्करी सत्ता मूठभर लोकांच्या विरोधात असताना, अधिकारी आणि शिपाई या दोघांच्याही अत्यंत निष्ठावंत धैर्यशाली वर्तनाखेरीज दुस-या कशानेही त्यांच्या प्रयत्नांना आनंददायी यश मिळाले तसे मिळाले नसते. कौतुक करण्यासारखे इतके सर्व असताना, आणि स्तुतीसाठी इतका सार्वत्रिक हक्क शाबीत झाला असताना, गर्व्हनर-जनरलांच्या नावाने माझे अत्यंत हार्दिक आभार व्यक्तिशः आणि सामूहिकरीत्या आपणाला आणि सर्व अधिकारी व शिपाई यांना देण्यापेक्षा मी अधिक काही बोलण्याची मुळीच आवश्यकता नाही. परंतु ज्या क्षणी हे घडून आले त्या निकराच्या युद्धाच्या नशिबाचा निर्णय घेऊन यश मिळाले असे म्हणता येईल अशा, कॅप्टन फिट्झेराल्ड् यांच्या हाताखाली सहाव्या बंगाली घोडदळाच्या तीन तुकड्यांनी पायदळ आणि तोफा यांच्या सहाय्याने इतक्या मोठ्या घोडदळाच्या समूहावर हल्ला करण्याच्या त्यांच्या शौर्याबद्दल माझे लपून न राहिलेले कौतुकही व्यक्तविल्याशिवाय मला राहवत नाही.

(सही)

नागपूर : **आर. जेंकिंस्,**

३० नोव्हेंबर, १८१७. रेसिडेंट.

**२६ नोव्हेंबर १८१७ रोजी नागपूरला असलेल्या ट्रूप्सची वर्तमान स्थिती**

हे सर्व धडधाकट आहेत. सर्व रुग्ण, शस्त्रहीन असे भरती झालेले, आणि नवीन आलेले शिपाई यातून कटाक्षाने वगळले आहेत.

| पलटण | युरोपियन अधिकारी | स्थानिक अधिकारी | इतर वर्ग | सशस्त्र भरती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| सहावे बंगाली स्थानिक घोडदळ (तीन तुकड्या) | ५ | ९ | २८६ | .. | ३०० |
| मद्रास अंगरक्षक (वेगळी तुकडी) | .. | १ | १७ | .. | १८ |
| मद्रास पायदळी तोफखाना | १ | २ | ५३ | .. | ५६ |
| मद्रास स्थानिक पायदळ २० वी (रेजिमेंट) पहिली बटॉलियन | १२ | ११ | ४२९ | ८० | ५३२ |
| मद्रास स्थानिक पायदळ २४ वी (रेजिमेंट) पहिली बटॉलियन | ९ | १३ | ५१० | ८० | ६१२ |
| रेसिडेंटचा संरक्षक लवाजमा | ३ | ३ | १७३ | .. | १७९ |
| नागपूर बटॉलियन | ४ | ११ | १३ | ७० | ९८ |
| एकूण .. | ३४ | ५० | १४८१ | २३० | १,७९५ |

## सीताबर्डीच्या लढाईतील अपघातग्रस्तांचा हिशोब, २६ व २७ नोव्हेंबर १८१७

| पलटण | मारले गेले | जखमी | बेपत्ता | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| सहावे बंगाली स्थानिक घोडदळ (तीन तुकड्या) | २३ | २४ | . . | ४७ | स्थानिक घोडदळाच्या |
| मद्रास अंगरक्षक | . . | . . | . . | . . | सहाव्या |
| मद्रास पायदळी तोफखाना | ५ | १६ | . . | २१ | बटॉलियनचे |
| मद्रास स्थानिक पायदळाची २० वी (रेजिमेंट) पहिली तुकडी | १६ | ४९ | . . | ६५ | याशिवाय ४५ घोडे, |
| मद्रास स्थानिक पायदळाची २४ वी (रेजिमेंट) पहिली तुकडी | ५९ | १०२ | . . | १६१ | मृत, जखमी, आणि बेपत्ता |
| रेसिडेंटचा संरक्षक लवाजमा | १० | ३३ | ४ | ४७ | झाल्यामुळे |
| नागपूर बटॉलियन | ८ | १५ | . . | २३ | नुकसान |
| स्वतंत्र | १ | . . | . . | . . | झाले. |
| एकूण . . | १२२ | २३९ | ४ | ३६४ | |

## रॉयल स्कॉट्स्च्या रेजिमेंटमधील नोंदीतील उतारे (लोथियन रेजिमेंट) नागपूरची लढाई, डिसेंबर १८१७

सर्व्हिसेस्–तथापि नागपूरला आमच्या सैन्याच्या काही भागाला मिळालेल्या उलट तडाख्याच्या परिणामी जनरल डोव्ह्टनची डिव्हिजन त्या ठिकाणाकडे वेगाने कूच करीत निघाली. त्यांचे मुख्यालय अद्यापि जाफिराबाद येथेच होते. २९ तारखेला ते एलिचपूरवर गेले आणि त्यांनी शाही सैन्याला मिळण्याचा आदेश दिला. त्यांनी ७ डिसेंबरला अमरावतीला त्याप्रमाणे आदेशाचे पालन केले व दुस-या दिवशी ते शेवरगावला पोचले. १२ तारखेला नागपूरला ('२३० मैल बारा तासात') पोचले, आणि रेसिडेन्सी व नाग नदी यांच्या पिछाडीस स्थान ग्रहण केले. १३ तारखेस लेफ्टनंट कर्नल मॅक्केलर यांच्या हाताखाली मागची डिव्हिजन मुख्यालयाला पुनः मिळाली.

कूच करण्यात सैन्याने सहन केलेल्या आत्यंतिक परिश्रमामुळे कोणतेही श्रमाचे काम हाती घेण्यापूर्वी काही दिवसांची विश्रांति आवश्यक झाली.

१५ तारखेला सकाळ पासून सैन्य सज्ज झाले आणि त्याने रेसिडेन्सीच्या उजव्या बाजूला, शत्रूच्या समोर स्थान ग्रहण केले. शत्रूचे सर्वात पुढे असलेले स्थान सुमारे दीड मैल अंतरावर होते.

दक्षिणेच्या सैन्याच्या या (दुस-या) डिव्हिजनला जोडलेले शाही सैन्य एवढेच या वेळी (निव्वळ) युरोपियन सैन्य होते.

पायदळाची विभागणी तीन ब्रिगेड्स्मध्ये झाली होती. पहिल्याचा अधिकारी लेफ्टनंट कर्नल नॉर्मन मॅक्लिऑड् असून त्याच्याकडे शाही सैन्याच्या पाच कंपन्या होत्या; दुस-याचा अधिकारी लेफ्टनंट कर्नल एन्. मॅक्केलर् हा असून त्याच्याकडे शाही सैन्याची एक कंपनी होती; तिस-याचा अधिकारी लेफ्टनंट कर्नल स्कॉट् असून त्याच्याहीकडे शाही सैन्याची एक कंपनी होती.

सकाळी ९ वाजता डावीकडील ब्रिगेडच्या १४ तोफांचा तोफखाना घेऊन केलेल्या आगीच्या वर्षावाने लढाईला सुरूवात झाली.

मॅक्लीआड् आणि मॅक्केलर या दोघा लेफ्टनंट कर्नलांच्या ब्रिगेड्स्ना शत्रूच्या उजव्या बाजूकडील तोफखान्यावर हल्ला करण्याचा आदेश झाला, आणि त्यांनी शौर्याने व यशस्वीपणे आदेश पाळून नंतर शत्रूच्या उजव्या बाजूविरुद्ध प्रयाण केले व शत्रु त्यांच्या समोरच माघारी परतला. एव्हाना दीड वाजला होता. शत्रु त्याच्या सर्व स्थानांवरून हाकलला गेला होता. त्यांनी छावणी सोडली व चाळीस हत्ती आणि तोफखान्यापैकी एकेचाळीस तोफा यासह ते उभे राहिले.

आज चौसष्ट तोफा घेतल्या गेल्या.

सैन्याने नाग नदीच्या काठावर, नदीच्या आणि नागपूर शहराच्या समोर छावणी टाकली.

रेजिमेंटचे २ सार्जंट आणि सर्व दर्जाचे ३६ मृत व जखमी इतके नुकसान झाले.

सहा हजार अरबांच्या जथ्थ्याने शहरात चौक्या लावल्यामुळे त्यांना हुसकणे आवश्यक होऊन घेरा लावण्याचे काम हाती घेण्यात आले.

२४ डिसेंबरच्या सकाळी फळी फोडणे व्यवहार्य आहे असे वाटल्याने लेफ्टनंट बेलीच्या हाताखाली शाही सैन्याच्या एका कंपनीच्या पुढाकाराने एका तुकडीने त्या ठिकाणावर हल्ला केला. हल्ला अयशस्वी झाला, कारण पुढे असलेली (पायोनियर) तुकडी चौकी बसविण्यासाठी सामान घेऊन जाताना गोंधळली.

अरब मोठ्या संख्येने लवकरच एकत्र आले आणि काही वेळ भगदाडाच्या टोकावर राहिल्यानंतर ब-याच नुकसानीसह माघार घेऊन त्यानी शिपायांच्या रांगांवर अनुग्रह केला. या वेध घेण्यात लेफ्टनंट बेली मारला गेला.

नियुक्त झालेली कंपनी चोवीस तास कर्तव्य करीत राहिली, संपूर्ण थंड रात्रभर ओल्या खंदकात जोरदार पावसात उघड्यावर राहिली, आणि बरीच थकून गेली.

लेफ्टनंट बेलीच्या शौर्याने अपयशाची उदात्तपणे भरपाई केली; शत्रूनेही बेलीची थोर शब्दात स्तुति केली व आपल्या शक्तीप्रमाणे त्यांनी तहाचे निशाण पाठवून भगदाडात उरलेले त्यांचे अवशेष नेता यावेत यासाठी दाखविता येण्यासारखा तेवढाच एक आदर दाखविला.

कंपनीने आपला एक अधिकारी, दोन सार्जंट, पाच कार्पोरल्स्, आणि चोपन्न खासगी व्यक्ति, मृत आणि जखमी गमावले.

## साधारण आदेश, मुख्यालय, मुक्काम उज्जैन, २७ जानेवारी १८१८

लेफ्टनंट जनरल सर थॉमस् हिस्लॉप यांना खालीलप्रमाणे ब्रिगेडियर जनरल डॉव्ह्टन् यांच्या पत्रातील उतारा प्रसिद्ध करण्यास आनंद होत आहे—

“माझ्या अधिकारातील दक्खन सैन्याच्या दुस-या डिव्हिजनच्या क्षेत्रात लढाई होत असता, लेफ्टनंट कर्नल फ्रेझर यांच्या निकट अधिपत्याखाली असलेल्या बादशाही रॉयल् स्कॉट्स्च्या दुस-या बटॉलियन्चे कार्य सतत माझी आत्यंतिक स्तुति व शाबासकी त्या महत्त्वाच्या तुकडीला मिळण्यास पात्र व्हावी असेच होते; विशेषतः गेल्या महिन्यातील सोळा तारखेला या ठिकाणी शत्रुसैन्याशी झालेल्या लढाईतील कार्य, त्यांचे शौर्य, स्थैर्य, आणि उत्तम वर्तन अतिशय उदाहरण घेण्यालायक होते.”

(गेल्या महिन्याच्या २४ तारखेस शहरातील हल्ल्यात मारला गेलेला लेफ्टनंट बेली हा) एक उमदा अधिकारी ज्यात हिरावून घेतला गेला, आणि ज्यात या तुकडीला पुष्कळच त्रास सहन करावा लागला, त्या नागपूरच्या संग्रामात रॉयल् स्कॉट्स् या दुस-या बटॉलियनने घेतलेला मानाचा हिस्सा अशा रीतीने नोंदवीत असतानाच, हिज् एक्सलन्सीना या प्रसिद्ध अधिका-याने आपल्या सेवेतील तुकडीच्या गुणांची अत्यंत स्तुत्य अशी दिलेली साक्ष पूर्णपणे कौतुकास्पद वाटत आहे. हे अधिकारी व शिपाई या (सर्वांना) खात्रीपूर्वक सांगण्याचे सर थॉमस हिस्लॉप यांना आनंददायक कर्तव्य वाटत आहे.

लेफ्टनंट जनरल सर थॉमस् हिस्लॉप, सरदार, यांच्या आदेशावरून.

**ई. आय्. मॅक्ग्रेगॉर-मुरे,**
लेफ्टनंट कर्नल,
सेनासहायकांचे प्रतिनिधि, शाही सेना.

चोवीसाव्या रेजिमेंटला निकटचे ध्येय साध्य करण्यात अपयश आले तरी ठाणेबंद तुकडीवर तिने दाखविलेल्या निर्धाराची गंभीर छाप पडली, आणि दुस-या दिवशी त्यांनी शहर रिकामे करून देण्याची तयारी दर्शविली, व तीस तारखेला ती अंमलात आणली.

# सोळा डिसेंबरसाठी जनरल डोव्हटन्चे आदेश

## नागपूर रेसिडेन्सीमध्ये सापडलेल्या दस्तऐवजावरून पुनर्मुद्रित

## शत्रूच्या हल्ल्यासंबंधी ब्रिगेडियर्सना आदेश

## आदेश

छावणी, सोमवार १५ डिसेंबर १८१७

शत्रूच्या छावणीवर आणि ठाण्यांवर हल्ल्यासाठी उद्या सकाळी चार वाजता ट्रुप्स आणि कंपन्या ओपन कॉलममध्ये अगदी समोर आणि उजवीकडून खाली दिल्याप्रमाणे परेड करतील—

### पहिली रांग

| | |
|---|---|
| लेफ्टनंट कर्नल गेहन यांच्या नेतृत्वाखाली | घोडदळाच्या तोफखान्याच्या दोन ब्रिगेड् आणि सहावे बंगाली घोडदळ, बंगाली घोडदळाची सहावी रेजिमेंट, आणि सागर तटावरील घोडदळाची सहावी रेजिमेंट यांचे घोडेस्वार. |
| लेफ्टनंट कर्नल मॅक्लिऑड यांच्या नेतृत्वाखाली | बाराव्या रेजिमेंटची किंवा वलजाबादच्या अर्धशस्त्र पायदळाची पहिली बटॉलियन,<br>बावीसाव्या बंगाली रेजिमेंटच्या स्थानिक पायदळाची पहिली बटॉलियन, आणि शाही रॉयल् स्कॉट्स्च्या सहा कंपन्या. |
| लेफ्टनंट कर्नल मॅक्केलर यांच्या नेतृत्वाखाली | शाही रॉयल स्कॉट्स्ची एक कंपनी,<br>चोवीसाव्या रेजिमेंट स्थानिक पायदळाची दुसरी बटॉलियन, आणि घोडदळाच्या तोफखान्याची एक ब्रिगेड. |
| लेफ्टनंट कर्नल स्कॉटच्या नेतृत्वाखाली | शाही सैन्य, रॉयल् स्कॉट्स्ची एक कंपनी,<br>अकराव्या रेजिमेंटच्या स्थानिक पायदळाची पहिली बटॉलियन,<br>सॅपर्स अँड मायनर्सची एक तुकडी, चार सहा पौंडी तोफा.<br>चाळीस युरोपियन तोफखान्याची तुकडी व त्या प्रमाणात भालाधारी शिपाई. |

मेजर ग्रॅहॅम यांची टेकडीवर आवश्यकता पडेपर्यंत ते या तोफदळावर अधिकारी राहतील.

लेफ्टनंट कर्नल क्रॉसडिल् यांच्या हाताखाली सहा पौंडी सहा तोफांची एक राखीव तुकडी रॉयल्स्‌च्या उजवीकडे पन्नास पावलांवर राहील; ट्रुप्स् समोर उजवीकडे ओपन कॉलममध्ये उभ्या राहतील, आणि नंतर त्या रांगेत वळतील तेव्हा त्यांच्या मागील बाजूला असतील.

दुसऱ्या खास रांगेत खाली दिल्याप्रमाणे सैन्याच्या तुकड्या असतील व त्याही ट्रुप्स् आणि कंपन्या यांना समांतर रांगेत पहिल्या रांगेच्या उजवीकडे शंभर पावलांवर उभ्या राहतील.

**दुसरी किंवा खास रांग**

| | |
|---|---|
| मद्रासी घोडदळाच्या सहाव्या रेजिमेंटच्या कॅप्टन स्मिथच्या नेतृत्वाखाली | सागर किनाऱ्यावरील घोडदळाच्या सहाव्या रेजिमेंटची घोडेस्वारांची ब्रिगेड.<br>बंगाली घोडदळाच्या सहाव्या रेजिमेंटची एक तुकडी.<br>सागर किनाऱ्यावरील घोडदळाच्या सहाव्या रेजिमेंटची एक स्क्वॉड्रन. |
| लेफ्टनंट कर्नल स्टीवर्टच्या नेतृत्वाखाली | दुसऱ्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॉलियनच्या बाजूच्या कंपन्या.<br>स्थानिक पायदळाच्या तेराव्या रेजिमेंटची दुसरी बटॉलियन. |
| मेजर पिटमनच्या नेतृत्वाखाली | हिज हायनेस निजामाच्या पायदळाची मेजर फ्रेजरची बटॉलियन.<br>हिज हायनेस निजामाच्या तोफखान्यापैकी चार सहा पौंडी.<br>विसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॉलियनच्या बाजूच्या कंपन्या.<br>चोवीसाव्या रेजिमेंटच्या पहिल्या बटॉलियनच्या बाजूच्या कंपन्या. |

अभिप्रेत असलेल्या रेषेत ट्रुप्स पोचल्यावर सर्वजण थांबतील, आणि आवश्यकतेनुसार काही तोफांच्या गोळीबाराच्या आवरणाखाली डावीकडे जाऊन रेषेत राहतील.

नंतर रांगेस पुढे जाण्याचा आदेश होईल व कर्नल स्कॉटच्या बाजूच्या राखीव कंपन्या डावीकडून हल्ल्याला आरंभ करतील आणि शत्रूला इमाम बाडीपासून हटवितील. यानंतर सॅपर्स व मायनर्सच्या तुकड्या राणीची रॉयल स्कॉट्स् कंपनी, आणि अकराव्या रेजिमेंटची पहिली बटॉलियन चार सहा पौंडी तोफांच्या सामग्रीबरोबर लेफ्टनंट कर्नल स्कॉटच्या आदेशाखाली लगेच पुढे होऊन डाव्या बाजूला हल्ला करतील, आणि इमामबाडीच्या समोर ठेवलेल्या शत्रूच्या तोफांचा ताबा घेतील. त्याच वेळी सैन्याचा एक भाग आपल्या स्थानावरच उजवीकडे धडक मारून सहकार्य करील. मेजर पिटमनच्या राखीव सैनिकानी पिछाडीच्या कॅप्टन पेड्लरच्या नवनिर्मित घोडदळाच्या ३०० जणांसह या हल्ल्याला साहाय्य करावयाचे आहे. कर्नल स्कॉट, इमामबाडी आणि शत्रूच्या तोफा घेऊन व दोन सहा पौंडी तोफा राखून सर्व किंवा योग्य वाटेल त्याप्रमाणे अगोदरच्या आपल्या 'बाजूच्या' कंपन्यांचा काही भाग (तेथेच) ठेवील.

त्या ठाण्याच्या समोरील शत्रूच्या तोफा हस्तगत केल्यानंतर त्या शिलकी तोफखान्यावरील शिपायांच्या सुपूर्द करण्यात येतील, आणि त्या समोरील रस्त्याकडे आणि शहराच्या उद्देशाने वळविण्यात येतील.

इतके झाल्यावर कर्नल स्कॉट तेथे(च) आपल्या स्थानावर राहतील आणि परिस्थितीच्या आवश्यकतेनुसार कार्य करतील. नंतर कदाचित् काही शत्रुसैन्य आलेच तर धावाधाव करण्यासाठी नवनिर्मित घोडदळाचा काही भाग ते मैदानात ठेवतील. त्याच वेळी लेफ्टनंट कर्नल मॅकेलियर सुद्धा तोफखानी घोडदळाची ब्रिगेड, रॉयल स्कॉट्स् कंपनी, आणि चोविसाव्या स्थानिक पायदळाची दुसरी तुकडी यासह पुढे जातील आणि डावीकडच्या समोरील बाजूस असलेल्या शत्रूच्या एका छोट्या समूहाला मैदानातून काढून लावून देवळाच्या परिसरावर हल्ला करून व डाव्या बाजूचे छोटे देऊळ सोडून समोर स्थान ग्रहण करण्यासाठी जातील, आणि जरूर वाटल्यास त्यांना उजवीकडील डिव्हिजनच्या एका तुकडीकडून साहाय्य केले जाईल.

त्यावर ताबा मिळविल्यानंतर लेफ्टनंट कर्नल त्या ठिकाणी आपली डिव्हिजन स्थापन करतील, तसेच शहराकडे जाणा-या रस्त्यावर अग्निवर्षाव सुरू करतील. ते सदैव ह्याचे अवधान ठेवतील की, लेफ्टनंट कर्नल स्कॉट यांची डिव्हिजन त्यांच्या डावीकडे आहे आणि त्या डिव्हिजनला अडथळा होणार नाही अशा रीतीने ते आपल्या तोफखान्याचा मारा नियंत्रित करितील.

जेव्हा ही स्थाने ग्रहण केली जातील तेव्हा ते लेफ्टनंट कर्नल स्कॉट यांच्या आदेशानुसार परस्पर सहकार्यासाठी नंतर आपली कार्ये करतील.

लेफ्टनंट कर्नल मॅक्लिऑड यांची डिव्हिजन आणि घोडदळाची ब्रिगेड वगैरेनी बनलेल्या तुकड्या मैदानाच्या टोकाला शत्रूच्या डावीकडील छावणीवर हल्ला करण्यासाठी एकाच वेळी रांगेत पुढे सरकतील आणि ते झाल्यावर तलाव डावीकडे ठेवून मैदानावर दिसेल अशा एखाद्या दुस-या तुकडीचा समाचार घेण्यासाठी सैन्य पुढे हलेल.

या डिव्हिजनला लेफ्टनंट कर्नल क्रॉस्डिल् यांच्या राखीव तोफखान्याची, आणि लेफ्टनंट कर्नल स्टीवर्ट यांच्या हाताखालील तेराव्या रेजिमेंटच्या दुस-या बटॉलियनसह दुस-या रेजिमेंटच्या पहिल्या बटॉलियनच्या बाजूच्या कंपन्यांची मदत मिळेल.

कॅप्टन पेड्लर्च्या सुधारित घोडदळाचा उरलेला भाग लेफ्टनंट कर्नल स्टीवर्टच्या राखीव रांगेच्या मागून पुढे जाऊ लागेल.

घोडदळी तोफखाना आणि घोडदळाची ब्रिगेड यांनी शत्रूच्या अगदी डावीकडील हल्ल्यात एकमेकांना मदत केल्यावर ते मैदानात ठाण मांडून बसलेले असतील अशा शत्रुसैन्याच्या दुस-या भागावर हल्ला करण्यासाठी झटक्यात पुढे होतील आणि अशी ठाणी नष्ट करतील, घोडदळाने या आणि पुढील हल्ल्यात शिस्त टिकविली पाहिजे, आणि शत्रूचा पूर्णपणे पराभव होईपर्यंत पाठलाग करण्याच्या आदेशापासून माघार घेऊ नये. त्याही स्थितीत घोडदळाचा राखीव भाग आणि घोडदळी तोफखाना, तसेच घोडेस्वार यांनी पुढे जाण्याच्या मार्गाला आधार म्हणून नित्याच्या शिस्तीत पुढे जाणे चालू ठेविले पाहिजे.

शत्रूला मैदानापासून पूर्णपणे हटविल्यानंतर त्याची अनेक ठाणी आपल्या सैन्याच्या ताब्यात आली म्हणजे मग सैन्याच्या रांगांना मैदानावरील त्यांची जागा घेऊन व शहराकडे तोंड करून (सज्ज राहण्याचा) आदेश दिला जाईल.

विसाव्या रेजिमेंटची पहिली आणि चोविसाव्या रेजिमेंटची पहिली, या बटॉलियन कंपन्या, मेजर इलियटच्या हाताखालच्या निजामाच्या सैन्याच्या बटॉलियनसह, सीताबर्डीच्या टेकडीवरील ठाणी व्यापतील, व सर्वजण मेजर मॅकेन्झीच्या आदेशाखाली राहतील. या जागेवरून पाच कंपन्या नंतर वेगळ्या करून, तोफखान्यावर राहून संरक्षण करण्याच्या हेतूने तोफखान्याचे मेजर गो-हॅम यांच्याकडे सुपूर्द केल्या जातील. मोठ्या तलावाच्या उजव्या तीरावरील प्रशस्त जागी शहरावर तोफांचा मारा करण्याच्या हेतूने आणि तलावाच्या खालच्या बाजूला शत्रूची एखादी फळी दिसली तर गोलंदाजी चालू ठेवण्यासाठी कॅप्टन डेव्हीज तीन लहान तोफा आणि दोन सहा पौंडी (त्या ठिकाणी) उभारतील. हे ठाणे अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे मेजर मॅकेन्झी त्याकडे विशेष लक्ष देतील, आणि आवश्यकतेनुसार, शत्रूचा पुनः ते घेण्याचा (प्रयत्न) दिसलाच तर त्याला टेकडीवरील तोफांच्या मा-याने प्रतिबंध करितील.

मेजर वेल्डन आवश्यक ठरवितील तितका शस्त्रागारातून बंदुका आणि पिस्तुले यांचा दारूसाठा नेतील आणि ते लेफ्टनंट कर्नल क्रॉसडिल् यांच्या हाताखाली असलेल्या राखीव तोफखान्याच्या पिछाडीस राहतील.

आताच कल्पना येणार नाही असे काही अडथळे अधिका-यांना आले तर त्या प्रसंगासाठी स्कॉट आणि मॅकेलर या लेफ्टनंट कर्नल्सच्या आदेशाप्रमाणे हल्ल्याचे वेळी भिंतीवर चढून जाता येण्यासारख्या शिड्यांसह पायोनियर्सची एक तुकडी बरोबर असली पाहिजे. राखीव दारूगोळा सैनिकांना देण्यात येईल तो त्यांच्या लगत मागे ठेवलेला असणे आवश्यक आहे. तो बैलांवर नेण्यात येऊन एका दक्ष स्थानिक अधिका-याच्या ताब्यात दिला जाईल, या अधिका-याजवळ तो नीट राखण्यासाठी एक छोटी पार्टी असेल. मेणे आणि पखाली राखीव सामानाच्या मागे असतील.

कोअर्स आणि ब्रिगेड्स् यांच्या मुख्य अधिका-यांनी आज संध्याकाळी साडेचार वाजता आपल्या सैन्याचे निरीक्षण करून त्यांच्या बंदुका ठीक आणि चांगल्या चकमकयुक्त असल्याची खात्री करून घ्यावी. शिपायांच्या पिशव्या दारू, छर्रे इत्यादीनी भरलेल्या असाव्या, त्यातील युद्धसामग्रीची व सामान्यतः त्यांच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीने आणखीही तपासणी करावी. प्रत्येक शिपायाजवळ शिलकी चकमक द्यावे, आणि अपघात होऊ न देता नेण्यासारखे असेल तर राखीव काडतुसांचे बंडलही द्यावे.

डेप्युटी क्वार्टर मास्टर जनरल डेप्युटी बॅगेज मास्टरला निर्देश देईल की, संध्याकाळी चार वाजता सैन्याचे सर्व सामान हलवावे, सीताबर्डी टेकडीवरील आपल्या ठाण्याच्या अलीकडे संरक्षणाखाली एकत्र करावे. सैन्याबरोबर कोणत्याही बिगर माणसाने बरोबर राहण्याचा प्रयत्न करू नये, तसे करिताना आढळल्यास त्यास लटकावण्याची शिक्षा होईल. अर्थात अधिका-यांचे घोडे सांभाळणारे, त्यांचे बरोबरचे घोडे, त्यांना सांभाळणारी व बांधणारी पोरे, तसेच घोडदळी तोफखान्याच्या आणि घोडदळाच्या रेजिमेंटस् मधील घोडे सांभळणारे यांचा आदेशाच्या या भागात समावेश होणार नाही. सैन्याबरोबर एका वेळेचे तयार अन्न असावे, पण त्यासाठी मोठाल्या पिशव्या नसाव्यात. परिस्थिती अनुकूल दिसताच शक्यतो लवकर त्यांच्या सुविधेसाठी आवश्यक असलेले सर्व काही सामानातून मागाविले जाईल. कोअर्सच्या कमांडिंग ऑफिसर्सनी आदेशांचा हा भाग आपापल्या शिपायांना समजावून देण्यासाठी अत्यंत दक्ष असले पाहिजे.

घोडदळ, पायदळ आणि तोफखाना यांच्या ब्रिगेडियर्सनी व्यक्तिशः आज संध्याकाळी सूर्यास्ताला ब्रिगेडियर-जनरलना आपापल्या ब्रिगेड्सच्या विविध तुकड्या सिद्ध असल्याची सूचना द्यावी.

सैन्य चालू लागल्यावर प्रत्येक तुकडीच्या मागे एक अधिकारी आपल्या मागून येणा-या तुकडीच्या फार पुढे आपली तुकडी जात नाही हे पाहण्यासाठी असावा, आणि जेव्हा एखादा आवाजी आदेश दिला जाईल तेव्हा तो तत्काळ पुढे पोचवून समोरच्या तुकडीनेही त्याचे पालन केले पाहिजे.

देवळावरील शत्रूच्या तोफा आणि ठाणी ताब्यात घेतल्यानंतर ब्रिगेडियर जनरलना आगाऊ लक्षात न आलेली परिस्थिती उद्‌भवल्यास लेफ्टनंट कर्नल स्कॉट व मॅकेलर हे अर्थातच एकमेकांशी पूर्ण संपर्क स्थापित होईपर्यंत आपला स्वतंत्र निर्णय देतील, आणि (संपर्कानंतर) मागे सांगितल्याप्रमाणे लेफ्टनंट कर्नल स्कॉट हेच सर्व ठाण्यांवर प्रमुख आदेशकारी म्हणून राहतील.

वरील आदेशाच्या मागील बाजूस असलेल्या पेन्सिलीच्या टिपणाची प्रत. माझे प्रिय जेन्किन्स्, प्रसंग पडल्यास अंमलात आणण्यासाठी माझ्या सर्व योजना आतील मजकूरा वरून तुम्हाला स्पष्ट होतील.

आपले सर्वाधिक विश्वासू ,

जे. डोव्हटन.

आर. जेन्किन्स् एस्क्वायर,

इ. इ.

रेसिडेन्सी

ता.क. हे आपणास सैनिकी पद्धतीने पाठवीत असल्याबद्दल क्षमस्व."

**ब्रिगेडियर-जनरल डोव्हटन यांचे दक्खन सैन्याच्या ॲड्‌जूटंट-जनरलना पत्र, मुक्काम नागपूर जवळ, १९ डिसेंबर, १८१७.**

**(पेंढारी आणि मराठा युद्ध यासंबधीचे कागद, पृष्ठ १४८)**

(सैन्याच्या क्वार्टर-मास्टर-जनरल द्वारा) हिज् एक्सलन्सी सेनापतीच्या माहितीसाठी हा अहवाल मी देत आहे. या ठिकाणी बारा तारखेला सकाळी अतिशय सुसज्ज अशा सैन्याच्या एका विभागाबरोबर मी आलो. उरलेले सैन्य दुस-या दिवशी मला येऊन मिळेल अशी माझी अपेक्षा होती.

तेरा तारखेला संध्याकाळी ते सैन्य मला येऊन मिळाले. राजाना ज्या शर्ती देण्याचे ठरले होते त्या रेसिडेंटकडून त्यांना कळविण्या अगोदर मी सैन्याला इतक्या दुरून आल्यावर झालेल्या श्रमांचा परिहार होऊ देण्यासाठी पुरेसा वेळ

मान्य करण्याचे ठरविले, या साठी की राजानी शर्ती मान्य केल्या नाहीत तर त्या परिस्थितीत सत्वर त्यांच्या सैन्यावर हल्ला चढविण्याची मजजवळ शक्ति असावी. त्याप्रमाणे, तेरा तारखेला दुपारी मी सर्व भांडारे आणि सैन्याचा सामान विभाग याना पुढे होऊन सीताबर्डी टेकडीखाली स्थान ग्रहण करण्यास आदेश दिला. त्या ठिकाणी विसाव्या रेजिमेंटची पहिली बटॅलियन, चोविसाव्या रेजिमेंटची पहिली बटॅलियन, आणि हिज् हायनेस् निजामाच्या पायदळाची एक बटॅलियन यांच्याकडून त्यांचे संरक्षण होणार होते. ज्या क्रमाने सैन्याने हल्ला करावयाचा माझा उद्देश होता त्या क्रमाने मी त्यांची स्थानिक आखणी केली होती. राजाचा निश्चय समजण्याच्या वेळेपूर्वी दुस-या दिवशी पहाटे साडेचारला विरोध सुरू करण्याच्या तयारीने सर्वजण शस्त्रे घेऊनच झोपले. सकाळी लौकरच रेसिडेंटकडून मला माहिती मिळाली की हिज हायनेसनी पुढे केलेल्या शर्तीना संमति दिलेली आहे. आणि ते रेसिडेन्सीवर तासाभराने येण्याची अपेक्षा आहे. परंतु ठरलेली वेळ निघून गेली आणि रेसिडेंटना सांगण्यात आले की राजे लौकर उपस्थित झाले नाहीत तर सैन्याला आपल्या हालचालीत आणखी चालढकल करणे नीट शक्य होणार नाही, म्हणून त्यांच्या संमतीने मी त्यानंतर थोड्याच वेळात खाली आलो. सैन्याने ज्या ठिकाणावरून हल्ल्याला आरंभ करावा असे मला वाटले त्या ठिकाणी मी स्थिर झालो. मी तेथे पोचल्यावर लौकरच राजे रेसिडेन्सीवर पोचल्याची माहिती मला देण्यात आली. आपला सर्व तोफखाना बारा वाजेपर्यंत माझ्या ताब्यात ठेवण्याची आज्ञा देण्यात आली होती, आणि त्यासाठी त्यांच्याकडून दूत माझ्या छावणीवर येणार होता. त्याप्रमाणे मी दूताच्या आगमनाची वाट पाहिली, आणि त्याला बरोबर घेऊन, माझे सर्व सैन्य बटॅलियन्स्च्या रांगात विभागून, राखीव विभागांच्या रांगासह कूच केले.

पहिल्या तोफेजवळ मी पोचतो तोच आम्हाला विरोध करण्याच्या तयारीने दिशा वळवून ती उभी केली. परंतु जराशा अनपेक्षितपणेच तेथे आल्यामुळे शत्रूने तोफा सोडून माघार घेतली. त्यांचा ताबा घेतल्यावर आणि लेफ्टनंट कर्नल स्कॉटकडे डिव्हिजनची व्यवस्था सोपविल्यावर, त्याच क्रमाने मी माझे प्रगमन चालू ठेविले. त्यानंतर काही वेळातच सक्करदरी बागेत ठेविलेल्या

सैन्याच्या मोठ्या जमावाने आमच्यावर जबरदस्त गोळीबार सुरू केला, व त्यानंतर त्यांच्या सर्व तोफानी सर्रास मारा आरंभिला. पायदळात मॅक्लिऑड् आणि मॅकेलर या लेफ्टनंट-कर्नलांच्या डिव्हिजन्स होत्या. त्यांना लेफ्टनंट-कर्नल क्रॉस्डिल् यांचे राखीव पायदळ आणि एक तोफ यांची मदत होती. लेफ्टनंट-कर्नल स्टीवर्ट यांच्याही राखीव पायदळाने पुढे जाणे चालू ठेविले आणि सैन्याच्या रांगा व्यूह करून पुढे असलेल्या शत्रूच्या तोफा अत्यंत बहादुरीने संगिनीच्या टोकावर घेतल्या.

लेफ्टनंट पोगनपोल यांचा घोडदळी तोफखाना, लेफ्टनंट-कर्नल गेहन यांच्या डिव्हिजन्सच्या रेजिमेण्टल रांगाना समांतर घोडदळ, आणि त्यांच्या मदतीस असलेले राखीव घोडेस्वार आणि कॅप्टन स्मिथचे घोडदळ, यांच्यावर एकाच वेळी गोळीबार झाला. सक्करदरी बागेच्या समोर लागून असलेल्या तलावाच्या भोवती वळसा घेऊन अत्यंत धडाक्याने त्यांच्या विरोधात तोफा झपाट्याने हलविल्या आणि मारा केला गेला. त्याच वेळी त्यांच्या पुढे शत्रूच्या घोडदळाचा प्रचंड समूह आणला गेला. तो त्यानी नष्ट केला आणि त्याना सतावण्याची शेवटची संधी असेपर्यंत त्यांचा पाठलाग केला.

घोडदळाने ज्यांच्यावर मारा केला होता परंतु ज्यांनी उलट त्यांच्यावरच पुनः अग्निवर्षाव आरंभिला अशा काही शत्रूच्या तोफा शत्रूचा पाठलाग करीत पुढे जात असताना दारूगोळ्याने भरल्या आणि पुनः राखीव पाच कंपन्यानी लेफ्टनंट-कर्नल स्टीवर्टच्या आदेशाखाली, राखीव तोफदळाने आणि कॅप्टन पेड्लर्च्या हाताखालच्या सुधारित घोडदळाच्या तुकडीने अत्यंत हिमंतीने चालविल्या व त्या प्रसंगी बरेच नैपुण्य प्रकट केले. दीड वाजेपर्यंत शत्रूच्या तोफा आणि छावणीतील सर्व सामान आमच्या ताब्यात आले होते, चाळीसाच्या वर हत्ती सुद्धा.

हिज एक्सलन्सी सरसेनापतीना मृत आणि जखमींची सोबत जोडलेली यादी पाहून समाधान होईल की, शत्रूचा तोफखाना बराच वरचढ असल्याने जितके नुकसान होण्याचा अंदाज करता आला असता तितके नुकसान झालेले नाही. जखमा मुख्यतः तोफांच्या गोळ्यांनी झालेल्या असल्यामुळे साधारणतः गंभीरच आहेत हे मात्र सांगताना विषाद वाटतो.

हिज एक्सलन्सी सरसेनापतीना हे आश्वासन देताना मला बरेच समाधान मिळत आहे की, सर्व तुकड्याना या प्रसंगी कार्य करण्याचे सौभाग्य लाभले व त्यांनी अत्यंत शौर्याचे वर्तन केले, आणि माझ्या आदेशाखाली असलेल्या डिव्हिजनच्या अधिका-यांच्या आणि शिपायांच्या गुणांविषयी सर्वसाधारण रीत्या इतकी साक्ष दिल्यानंतर मला हिज एक्सलन्सींच्या माहितीसाठी व्यक्तिशः अधिक निर्देश करिताना आनंद होत आहे, ते लेफ्टनंट-कर्नल्स् गेहन, मॅक्लिऑड्, स्कॉट्, मॅकेलर, आणि क्रॉस्डिल्, तसेच घोडदळ, पायदळ, आणि तोफखाना यांवरील ब्रिगेड्सचे मुख्याधिकारी, घोडदळी तुकड्यांचे अधिकारी मेजर मंक आणि कॅप्टन वेस्टर्न, लेफ्टनंट-कर्नल्स् स्टीवर्ट व फ्रेझर, मेजर्स परेरा, पोलक, मॅक्डोवाल, विल्डन, मॅ्कबियन् आणि गार्नर हे पायदळ व तोफखाना यावरील तुकड्यांचे प्रमुख. हिज एक्सलन्सींच्या अनुकूल मतासाठी मला लक्ष वेधणे आवश्यक आहे ते (अधिका-यांच्या) गुणांकडे-लेफ्टनंट पोगनपोल, घोडदळी तोफखान्याचे प्रमुख; त्याच तुकडीचे लेफ्टनंट हंटर, हे मी ज्या ठिकाणी होतो त्याच रांगेत असल्यामुळे मला त्यांचे असाधारण परिश्रम व्यक्तिशः पाहण्याची संधि मिळाली; ज्यांच्या विषयी माझ्या ऋणाच्या भावना असून त्या मी कशा व्यक्त कराव्या हे समजत नाही ते मेजर मॅक्लिऑड् आणि जनरल स्टाफचे अधिकारी, आणि माझ्या व्यक्तिगत सेवकवर्गापैकी कॅप्टन्स् मॉर्गन आणि एड्मंड्स्; तसेच रणक्षेत्रावरील ज्येष्ठ अभियंते लेफ्टनंट डेव्हिस् यांचा सर्व हालचालीतील असामान्य उत्साह आणि कृतिशीलता हीही मला वगळता येत नाही, त्याचप्रमाणे मी कॅप्टन्स् ल्युकास, ग्रँट, आणि निक्सन, लेफ्टनंट्स् डेव्हिडसन्, फेनव्हिक् आणि शेरीफ् यानी या प्रसंगी आपल्या सेवा स्वेच्छेने दिल्या त्यांचाही मी ऋणी आहे. मेजर ॲडिसन यांची मूल्यवान् सेवा दुर्दैवाने त्यांच्या बलवान् अस्वास्थ्यामुळे मला मिळू शकली नाही.

हे पत्र पुरे करण्यापूर्वी हिज एक्सलन्सींच्या आणखी माहितीसाठी मी हाही निर्देश करण्याची अनुज्ञा घेतो की, पूर्वीच रेसिडेंटनी आपला भाऊ मेजर जेंकिन्स्, राजांच्या परिवारातील पायदळाचे मुख्य, यानी या प्रसंगी मला जादा सहायक म्हणून मिळावे अशी विनंती रेसिडेंटना केली होती; या अधिका-याचे विशेष परिश्रमांविषयी मी अत्यंत ऋणी आहे हे व्यक्त करणे हा माझ्या कर्तव्याचाच एक

आनंददायी भाग आहे. नागपूरच्या परिवारास संलग्न असलेले लेफ्टनंट बेली यांनी २६ तारखेच्या हल्यात झालेल्या तीव्र जखमेने त्रस्त असताही आपली सेवा देऊ केली, ते आपल्या स्थानिक परिचयामुळे माझ्या अतिशय उपयोगी पडले, त्यांचे गुणही न उल्लेखिता पुढे जाता येंणार नाही.

मेजर पिटमन यांच्या आदेशाखाली असलेले हिज हायनेस निजामाचे सैन्य अगोदर भांडाराकडे आणण्यासाठी वेगळे केलेले होते. ते युद्धामध्ये उपस्थित होण्यास प्रतिबंध झालेला होता, परंतु मला पूर्णपणे खात्री पटली आहे की जर वेगळा आदेश असता तर त्यानीही इतर सैन्याबरोबर तितक्याच प्रमाणात नैपुण्य दाखविले असते. मला ज्या डिव्हिजन्स्वर प्रमुख होण्याचा मान मिळाला त्यापैकी, आणि शत्रूकडून पकडलेल्या लष्करी साहित्य विभागापैकी मृत, जखमी, आणि हरवलेल्यांची यादी हिज एक्सलन्सींच्या माहितीसाठी सोबत जोडीत आहे.

---

## ३० डिसेंबर, १८१७ च्या नागपूरहून पाठविलेल्या पत्रातील उतारा

## (पेंढारी आणि मराठा युद्ध यासंबंधीचे कागद, पृष्ठ १५८)

१८ रोजी आमच्या तोफा शहराविरुद्ध चालू झाल्या, आणि आमचा गोळीबार राजाच्या तोफा-बारुदीबरोबर उत्तम चालू राहिला. परंतु आम्ही अपेक्षिलेला परिणाम मात्र झाला नाही. घरे उंच आणि पक्की आहेत, रस्ते अरुंद, आणि अरबानी तर भगदाडातून व खिडक्यातून सतत आणि अत्यंत चीड आणणारा गोळीबार चालू ठेविला होता. तेथून ते आम्हाला दिसतही नव्हते. २४ रोजी शहरावर हल्ला करावा असा जनरलने आदेश दिला. सैनिक पुढे गेले, त्याना मॅचलॉक्स्, जिंजाल्स् यांच्या अत्यंत विनाशकारी वर्षावाला तोंड द्यावे लागले, आणि मृत किंवा जखमी अशा तीनशे जणांच्या नुकसानीसह माघार घेणे भाग पडले. रॉयलपैकी लेफ्टनंट बेली मारले गेले. मेजर्स मॅक्लिऑड आणि ईलियट, लेफ्टनंट्स् कॅमेरॉन, काउल आणि डेव्हिस जखमी झाले, पण कोणीही धोक्यात नाही. आम्हाला तोफांचा तांडा मागविण्याशिवाय काहीच करण्यासारखे नव्हते. तो आठ दिवसात येऊन पोचेल. राजांच्या तोफा भेद करू शकणार नाहीत. अरब मात्र घाबरले होते; २६ ला त्यानी वकील पाठविले. त्याना अशा अटी घातल्या

आहेत—शस्त्रे, कुटुंबकबिला, आणि सामान यासह आज बारा वाजेपर्यंत शहर सोडून जावे; मलकापूर पर्यंत त्यांच्याबरोबर एक युरोपियन अधिकारी राहील, नंतर त्यानी इच्छेप्रमाणे कोठेही जावे. आपली अत्यंत आदरार्ह माणसे त्यानी ओलीस दिली आहेत. हे पत्र संपविण्यापूर्वीच ब्रिटिशांचे निशाण नागपूरच्या राजवाड्यावर लागल्याचे आपणास सांगता येण्याची मला आशा आहे.

राजे आमच्या छावणीत आहेत. त्यांना गादीवर बसविले जाईल, पण त्यांचे हात चांगले बांधलेले असतील. त्यानी आपला सर्व अधिकार गमविला आहे असे दिसते. त्यांचे शिलेदार देश लुटीत आहेत. पण लौकरच त्याना पांगापांग करण्याची पाळी येईल; कारण आता आमच्याजवळ घोडदळाच्या दोन रेजिमेंट्स आणि सुधारित पैकी सातशे घोडेस्वार असून सुधारित एक हजारापेक्षा अधिकची आणखी एक रेजिमेंट येत आहे.

**दुपारी दोन वाजता—**अरबानी शहर सोडले आहे. आपण नागपूरचे स्वामी झालो आहोत, आणि मला वाटते या राज्याबरोबरचे युद्ध संपले आहे असे मी यालाच जोडून म्हणू शकतो.

---

## ब्रिगेडियर-जनरल डोव्हटन यांच्याकडून ॲड्जूटंट-जनरलना पत्र

### मुक्काम नागपूर, २६ डिसेंबर १८१७

### (पेंढारी आणि मराठा युद्धांच्या संबंधीचे कागद, पृष्ठ १७३)

राजांच्या राजवाड्यावर तळ देऊन बसलेल्या अरबांच्या व इतर सैन्याच्या विरोधात व नागपूर शहरातील इतर मजबूत दगडी इमारतीना न जुमानता पुढे चाललेल्या कार्याविषयी हिज एक्सलन्सी सेनापतींच्या माहितीसाठी मी अहवाल देतो की शहराला अत्यंत जवळ आणि जुम्मा दरवाज्यापासून अडीचशे यार्डांच्या आतच असलेल्या जुम्मा तलावाच्या काठावर हुकमतीची परिस्थिति मिळविण्यात यश आल्यानंतर त्या ठिकाणी युद्धातील ज्येष्ठ अभियंते कॅप्टन डेव्हिस यांच्या अथक परिश्रमानी लौकरच एक तोफखाना उभारला गेला, आणि तोफखान्यावरील अधिकारी लेफ्टनंट कर्नल क्रॉसडिल याना उपयोगी पडण्याच्या दृष्टीने पुरेशी

शक्ति असलेल्या अशा शत्रूकडून घेतलेल्या ज्या तोफा महत्त्वाच्या वाटल्या त्या त्यावर बसविल्यानंतर २१ च्या सकाळी शक्य तर जुन्या राजवाड्याच्या भिंतीमध्ये भगदाड पाडण्याच्या दृष्टीने तोफा डागल्या गेल्या. परंतु त्या दिवसाच्या मा-याने माझी खात्री झाली की, तेवढ्या दारूगोळ्याने हा उद्देश साधणार नाही. शुक्रवार दरवाजा उघडण्याच्या दृष्टीने त्यावर मारा वळविला, जेणेकरून मला पुढे आलेल्या स्थितीत सैन्य ठेवता यावे.

याच महिन्याच्या २३ तारखेस संध्याकाळी मुख्य अभियंता आणि तोफखान्यावरील अधिकारी यानी मला त्यांच्या विचारांची माहिती दिली की दृष्टीपुढे असलेले लक्ष्य थोड्या नुकसानीवर किंवा नुकसान न होताही साध्य होणे शक्य होईल इतका परिणाम अग्निवर्षावाने निर्माण केला आहे, आणि मला जितकी मिळविता आली त्या सर्व माहितीने यास दुजोरा मिळाला, तेव्हा मी लगेच दरवाज्यावर तसेच तुळशीबागेवर एकदमच हल्ला करण्यासाठी, आणि कित्येक ठाण्याना बदली साहाय्य देण्यासाठी सकाळी जादा सैन्य येणार होते तेव्हा दुस-या दिवशीच्या सकाळी (शत्रूला घेराव घालण्याच्या दृष्टीने) आणखी पुढची जागा घेण्यासाठी आवश्यक ते आदेश दिले.

जुम्मा दरवाज्यावरील हल्ला माझ्या नजरेखालीच झाला. तुळशीबागेवरील हल्ला लेफ्टनंट कर्नल स्कॉटने केला. निजामी सैन्याने दुसरी पुढची जागा पकडली ती मेजर पिटमनच्या आदेशाखाली. सवा आठ वाजण्याच्या सुमाराला सैन्य अगोदर ठरलेल्या संकेताप्रमाणे तोफखान्यापासून धावून गेले. दुसरे दोन्ही हल्लेही असेच झाले. परंतु हिज एक्सलन्सींच्या माहितीसाठी हे कळविताना मला चिंता वाटते की पुढील तुकडी दरवाज्यावर पोचली तेव्हा काही सैन्य तरी लगेच आत शिरू शकेल इतके पुरेसे रूंद विवर आढळले नाही. त्याच्या दोन्ही बाजूना कित्येक दगडी घराना आणि दरवाज्याकडे जाणा-या (परंतु तोफखान्यापासून दिसू न शकणा-या) रस्त्याला लागून आमच्या तोफांच्या मा-यापासून पूर्णपणे सुरक्षित असलेल्या अरबांच्या कित्येक तुकड्या रांगेत खड्या करण्याची काळजी अगोदरच शत्रूने घेतलेली होती. काही काळ जबरदस्त मा-याच्या तडाख्यात सापडल्यावर सैन्याला जवळच्या आवारात आश्रय घेणे भाग पडले व तेथूनच त्याने प्रयत्न चालू ठेविला. परंतु त्याना दरवाज्यावर ताबा मिळविण्यासारखी

थोडीही किंवा मुळीच संभवनीयता न दिसल्याने मी सैन्याला तोफखान्याकडे परतण्याचा आदेश दिला, तो सावकाश व योग्य प्रकारे अंमलात आणला गेला.

लेफ्टनंट कर्नल स्कॉट आणि मेजर पिटमन यांचे हल्ले मात्र अधिक यशस्वी झाले. स्कॉट याना बगीचाचा ताबा तर मिळाला, पण मिळालेल्या माहितीच्या उलट बगीचा खूप विस्तीर्ण वाटला, व तो शहराच्या भिंतीतून येणा-या मा-याच्या जागेत असल्याने टिकवून धरावयाचा तर फार मोठी किंमत द्यावी लागली असती. मुख्य दरवाज्यावरील हल्लाही यशस्वी झाला नव्हता. तेव्हा मी लेफ्टनंट कर्नल स्कॉटना मूळ जागी येण्याचा निर्देश दिला, तोही अतिशय सावकाशीनेच अंमलात आला. मेजर पिटमन यांच्या स्थानाला आता फारसे किंवा मुळीच महत्त्व नव्हते, म्हणून त्यानाही तसेच हलण्याचा आदेश दिला व त्यानी तितक्याच स्तुत्यपणे ते कार्य केले. या प्रसंगी जरी सैन्याला यश मिळण्यात आकस्मिक आणि दुर्लंघ्य अडचणी आड आल्या तरी हिज एक्सलन्सींच्या माहितीसाठी हे निवेदन करिताना मला बराच आनंद होत आहे की अधिकारी आणि शिपाई यानी नेहमीचे शौर्य दाखविले. या प्रसंगी मला जो आदेश देणे योग्य वाटले त्या आदेशाची एक प्रत यासोबत जोडण्याची मी परवानगी घेतो.

सोबतच्या यादीवरून हिज एक्सलन्सींच्या लक्षात येईल की कित्येक बहुमोल अधिकारी जखमी झाले आहेत. (देश एका होतकरू अधिका-याला, बादशहांच्या रॉयल स्कॉट्स्चे लेफ्टनंट बेली याना मुकला आहे). परंतु क्वॉर्टर मास्टर जनरलच्या विभागातील लेफ्टनंट कॅमेरॉन आणि तोफखान्यातील लेफ्टनंट काउल यांचा अपवाद धरता कोणालाही गंभीर इजा झाली नाही हे सांगण्यास समाधान वाटते.

या प्रसंगी आमचे नुकसान सैन्याच्या यशाला विरोधक अशा अज्ञात अडचणीवरून अपेक्षा करावी इतके जास्त झालेले नाही, आणि अकोल्याहून मागविलेल्या साहित्य सामग्रीची गाडी येईपर्यंत मला वाट पाहणे भाग पडले याखेरीज दुसरा कोणताही परिणाम घडण्यासारखे हे नुकसान नाही.

शहरातील मजबूत इमारतीची मालकी असलेल्या अरबांची संख्या हिंदुस्थानी आणि इतर सैन्य वगळता तीन हजाराच्या जवळ असेल असे समजले जात आहे.

## ब्रिगेडियर-जनरल डोव्हटन यांचे ॲड्जूटंट जनरलना पत्र

### नागपूर, दिनांक ३० डिसेंबर, १८१७

### (पेंढारी आणि मराठा युद्धे यासंबंधीचे कागद, पृष्ठ १७५)

या ठिकाणी माझे प्रतिवृत्त पुढे चालू करिताना हिज एक्सलन्सी सेनापतींच्या माहितीसाठी हे कळवितो की २४ तारखेच्या हल्ल्यानंतर नागपूर शहरातील अरबांच्या पुढा-यानी काही शर्ती मंजूर केल्या गेल्या तर शहर सोडून जाण्यास तयारी असल्याचे कळविले. दुस-या दिवशी सकाळी त्यानी आपला मुख्य पुढारी पीरजादा याला तडजोड करण्यासाठी पाठविल्यानंतर, हिज एक्सलन्सीना हे कळविण्यास मला आनंद वाटतो की रेसिडेंट, अरब पुढारी, आणि मी स्वतः यामध्ये सर्व मुद्दे समाधानकारकपणे ठरल्यानंतर त्यानी आणि त्यांच्या सैनिकानी आज दुपारी शहर रिकामे करून दिले. आमच्या सैन्याने पुढे जाऊन त्याचा ताबा घेतला, आणि आता जुन्या राजवाड्यावर ब्रिटिशांचा ध्वज फडकत आहे.

या अनुकूल शेवटासाठी हिज एक्सलन्सी सेनापति याना माझे अभिनंदन कळविण्याची परवानगी घेतो. हा शेवट अत्यंत सन्मानाचा तर आहेच, पण मला खात्री आहे की तितकाच तो सध्याच्या बिकट कार्यात सार्वजनिक हितालाही अत्यंत उपकारक आहे. हिज एक्सलन्सींच्या आदेशांच्या पुढील कार्यवाहीसाठी मी माझी डिव्हिजन ठेवीत आहे. परंतु बरेच दिवस या ठिकाणाहून माझे प्रगमन मी चालू ठेवू शकणार नाही, कारण अलीकडील घटनांच्या दणक्यांमुळे ब्रिटिश रेसिडेंट यांच्या आणि माझ्या स्वतःच्याही मताने काही काळ आणखी हुकमती सैन्याची उपस्थिती निकडीने आवश्यक आहे.

**ताजा कलम**–राजाच्या शहरातील हिंदुस्थानी आणि इतर सैन्याची संख्या पाच हजारावर आहे, तर अरबांची तीन हजारापर्यंत. शहर ब्रिटिश रेसिडेंटच्या ताब्यात दिले गेले आहे आणि त्यांच्या हवाल्यावर सोपविले आहे.

## रेसिडेंट श्री. जेन्किन्स् यांच्याकडून शासकीय सचिवास पत्र

### नागपूर, दिनांक ३० डिसेंबर, १८१७

### (पेंढारी आणि मराठा युद्धे यासंबंधीचे कागद, पृष्ठ १७६)

अत्यंत उदारधी गव्हर्नर-जनरल यांच्या माहितीसाठी मी आपणास कळवितो की अरब आणि इतर सैन्य येथे होते त्यांनी आज रोजी नागपूर शहर त्यांनी विनंती केलेल्या शर्तीवर रिकामे करून दिले, आणि दुपारी अडीचच्या सुमारास ब्रिटिश सैन्याने ताबा घेतला. त्यावेळी राजवाड्यावर चढविलेल्या ब्रिटिश ध्वजाला तोफखान्याच्या २१ तोफांची सलामी दिली गेली.

या घटनेने या बाजूच्या लष्करी चढायांची पूर्णता झाली असे समजले तरी चालेल. कदाचित थोड्याशा लहान घोडदळी तुकड्या विखरून ठेवाव्या लागतील इतकेच. पुष्कळसे मुख्य लोक अगोदरच रेसिडेन्सीत आलेले आहेत, आणि इतरांचीही आता रीघ लागली आहे. राजांच्या आणि माझ्या स्वतःचाही नावाने देशभर घोषणा जारी झाल्या आहेत, त्याने सर्व काही शांत होईल या विषयी मला संशय नाही.

• • •

शामुना—वाय-४६१-समरासासंमंमुं-१०-२००८-११६० पुस्तके-पीअे-५*



**महामहोपाध्याय विद्यावाचस्पति**

**(डॉ.) स. मो. अयाचित**

(पूर्व हस्तलिखिताधिकारी)

**जन्म** : वर्षप्रतिपदा शके १८५१, नाशिक, १०-४-१९२९

**शिक्षण** : स. प. फर्ग्युसन, डेक्कन महाविद्यालयात एम. ए. (संस्कृत/पालि); पीएच्. डी. (भाषाविज्ञान); वेदान्त विशारद (टि.म.वि.);

**संशोधन** : गणपाठ परंपरांची ऐतिहासिक संहिता; पाठचिकित्सा / हस्तलिखितविद्या; प्रामाण्यवाद; प्राभाकर मीमांसा; हेडगेवार चरितम्; गीता-आशय आणि विचार; समर्थ आणि दासबोध; Aspects of Religion; Cultural Heritage; Ramblings in Indology.

**संपादन** : सिन्दूरगिरिमाहात्म्य; रसकदम्बकल्लोलिनी; Problems of Sanskrit Education; Post-Independence Sanskrit Literature; निगमागम समन्वय; इत्यादि ९ ग्रंथ.

**अनुवाद** : व्यथा शरयूची; चन्द्रिकासक्षसम्; काश्यपीय कृषिसूक्ति; शिवलीलार्णव महाकाव्य; इत्यादि १७ ग्रंथ.

**इतर** : स्नातकोत्तर अध्यापन; १५,००० हस्तलिखितांची प्राप्ति; संस्कृत प्रचार; राष्ट्रिय संमेलनात सहभाग; नियतकालिकांचे संपादन; सामाजिक कार्यात सहभाग; इ.

**मान्यता** : शासकीय सन्मान; पुरुषोत्तम पुरस्कार.